AVAGAMNIYA PUNARJANMA

आवागमनीय पुनर्जन्म

* संकलन *

डॉ. मुहम्मद अहमद

* अनुवादक *

डॉ. उमर कहाडे

अनुक्रमणिका

''अल्लाह, असीम, दयावंत व कृपावंतच्या नावाने''

प्रस्तावना

'आवागमनीय पुनर्जन्म एक तथ्यपरक विश्लेषण' वास्तविक हा एक प्रश्नोत्तर संच आहे जो पुस्तकाच्या रूपात वाचकांच्या सेवेत प्रस्तुत करण्यात येत आहे. अंबाला छावनी (हरियाणा) चे सुप्रसिध्द हिन्दी साहित्यकार डॉ. महाराज जैन यांनी 'आवागमन आणि पुनर्जन्म' च्या अस्तित्वावर आधारित १५ जुन १९९८ च्या 'हिन्दुस्तान टाइम्स' मधे प्रकाशित लेखाची कात्रणे पाठवुन या महत्वपुर्ण विषयाकडे आमचे लक्ष वेधले. वृत्तपत्राच्या कात्रण सोबत डॉ. साहेबांनी आपले विचार लिहीलेत की, 'अधिकतर तर्क आणि तर्का पेक्षाही जास्त साक्ष पुनर्जन्माच्या पक्षात आहे.' 'कान्ति' मासिक च्या एका अंकात प्रकाशित लेखतात 'आवागमनीय पुनर्जन्म' वर टिप्पणी अगर टीका डॉ. जैन यांना आवडली नाही म्हणुन त्यांनी आपले मत उपरोक्त वृत्त पत्राच्या कात्रण सोबत प्रकट केले.

'कान्ति' मासिक सप्टेंबर १९९९ च्या अंकात डॉ. जैन यांच्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर देण्यात आले. यामधे आवागमन आणि पुनर्जन्म च्या विभीन्न दृष्टिकोनाचे तथ्यपरक विश्लेषण प्रस्तुत करण्यात आले. या विश्लेषणाला पाठकांनी पसंत केले आणि आपल्या मौल्यवान विचारांनी आम्हाला अवगत केले. यापैकीच काही महत्वपूर्ण विचार पुस्तकाच्या शेवटी एका अध्यायाच्या रूपात प्रस्तुत करण्यात आले आहे. या कालावधीत विचारांचे आदान-प्रदान आणि शोध यामुळे तथ्य-विश्लेषण सामुग्री मधे जे परिवर्तन झाले त्यालाही या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहे.

वास्तविकतेचे संशोधन, यथार्थ-दर्शन आणि चिन्तन-मनन नंतर आम्ही ज्या निष्कर्षावर पोहोचलो त्याच्याशी आपण सहमत होणे आवश्यक नाही परंतु हे मात्र सत्य आहे की, सर्व तथ्य, तर्क आणि साक्ष आवागमनीय पुनर्जन्माच्या अगदी विरोधात जातात. वास्तविक हा विषय इतका गुंता-गुंतीचा आणि भ्रामक बनविला गेला की, यथार्थ पर्यंत पोहचणे त्या लोकांनाही कठीण आहे जे शिक्षीत आणि विचारक आहेत. आमचा प्रयत्न हा आहे की अवास्तविकतेचे आवरण बाजुला सारून सत्य प्रकट व्हावे. या प्रयत्नात आम्हाला कीतपत यश लाभले याचा निर्णय आपणास करावयाचा आहे. या पुस्तकात उपलब्ध ज्ञान सामग्री विषयी आमचे हे स्पष्ट मत आहे की या मागील उद्देश केवळ वास्तविकता बोध होय. कोणत्याही व्यक्ति अगर समुदाय विशेष वर आक्षेप किंवा टीका करणे अथवा कुणाच्याही भावना दुखविणे कदापिही नाही. यासाठीच आम्ही वस्तुनिष्ठ अध्ययनचा प्रयास केला आहे. तरी सुध्दा कोणतेही तथ्य दुरुस्ती अयोग्य वाटत असेल तर स्पष्ट प्रमाण उपलब्ध करून आमचे सहकार्य करावे. पुस्तकाच्या पुढच्या संस्करण (आवृत्ती) मधे आपल्या सप्राण विचारांना समाविष्ट करण्यात येईल.

नवी दिल्ली
१ मार्च २००० ईसवी

डॉ. मुहम्मद अहमद
संपादक
'कान्ति' (साप्ताहिक/मासिक)

भाषांतरकाराचे मनोगत

प्रश्नोत्तराच्या माध्यमातून तयार झालेले "आवागमनीय पुनर्जन्म" हे पुस्तक अतिशय ज्ञानवर्धक तसेच मनुष्याला सत्कर्मास प्रवृत्त करणारे आहे. लेखकाने उत्कृष्ट परंतु अगदी स्पष्ट भाषेत भारतीय धर्मशास्त्राच्या परिप्रेक्षाणात आवागमनीय पुनर्जन्माचे असत्य होणे सिध्द केले आहे. भारतीय समाजाची आवागमनीय पुनर्जन्मावर असलेली अटळ श्रध्दा बघुन नेहमी वाटत असे की समाजातील हा भेदभाव काय केवळ यामुळे आहे ? मग एक दुराचारी धनाड्य आणि विलासी जीवन जगतो तर एक सत्कर्मी कष्टाचे व हाल-अपेष्टेत जीवन जगतो शेवटी हा कसला परिणाम असावा १ दंड भोगत असलेल्या लोकांना हे माहीत नाही की कोणत्या कृत्याचे हे फळ आहे ? जर प्रत्येक कार्य पुर्व-जन्मीचे फळ आहे तर मग दुराचारी व्यक्तीला दोष देण्यात काय अर्थ आहे? कारण हे कार्य तो कुठे करतो आहे उलट तो पुर्व-जन्मीच्या परिणामामुळे ते करण्यास बाध्य आहे. म्हणजे आचरणाचे त्याला कोणतेही स्वातंत्र्य येथे नाही. जी दुराचारी व्यक्ती जनावराच्या योनित जन्म घेते व मग तीची कत्तल होते ती सुध्दा अनुचित कशी ठरेल ? कारण त्याची कत्तल पुर्व-जन्मीच्या कर्माचा परिणाम होय. ही आणि अशी अनेक संदेहास्पद प्रश्न नेहमी विचलीत करायची. वास्तविक हिन्दु-धर्मात वारंवार आणि ८४ लक्ष योनित भ्रमण करण्याची धारणा अतिशय खोलपर्यंत रूजलेली असताना मानवाचे विभाजन (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र यांची उत्पत्ती ब्रम्हाच्या भिन्न अवयवापासुन झालेली) कसे आणि याला कोणता शास्त्रोक्त आधार हे कळेनासे झाले. जेंव्हा इस्लामचे अध्ययन केले तेंव्हा अगदी शास्त्रोक्त आधारावर पुनरूज्जीवनाची कल्पना बघुन मनातील सर्व शंका-कुशंकाचे निवारण झाले. परंतु एकट्याच्या शंका निवारणाने मन शांत झाले नाही तर पुर्ण भारतीय समाजा समोर पडलेला अगर हेतु-पुरस्सर निर्माण करण्यात आलेला अज्ञानाचा पडदा कसा दूर होईल या चिंतेने मन अस्वस्थ झाले. जेंव्हा डॉ. मुहम्मद अहमद साहेबांचे उपरोक्त पुस्तक बघितले तेंव्हा अत्यंत आनंद झाला. खरोखरच कीती कष्ट घेतलेत त्यांनी ज्ञान-ज्योत भारतीयांपर्यंत पोहचविण्यास ! हिन्दू-धर्मशास्त्र, विद्धान पंडीत आणि विचारक समेत वैज्ञानिक, संशोधक, मानसशास्त्रज्ञ या सर्वांची मते एकत्र करून आवागमनीय पुनर्जन्माच्या धारणेला असत्य सिध्द करून खरोखर आम्हा भारतीयांवर उपकारच केले म्हणावे लागेल. अर्थातच त्यांच्या निष्कर्षाशी असहमती असु शकते. परंतु त्यांचा हा प्रयत्न निश्चीतच मानविय अखंडताच नव्हे तर एका एका मनुष्याचे इहलोक व परलोक

यशस्वी होण्यास उपयुक्त ठरू शकते यात दुमत नाही. मला सत्याची ज्ञानरूपी ही गंगा जी भगीरथ प्रयत्न करून डॉ. अहमद साहेबांनी प्रवाहित केली ती फक्त मराठी भाषिकां पर्यंत पोहचवायची होती. कारण या साठीच तर माझे मन विचलित होते. इस्लामिक मराठी पब्लीकेशनच्या द्वारे मला ही संधी लाभली त्या बद्दल मी अल्लाहचे जितके आभार मानावे कमी आहे. मी मराठीचा साहित्यिक किंवा लेखक नाही तसेच भाषेवर माझे प्रभुत्व नाही परंतु महाराष्ट्राचा नागरीक या नात्याने माझ्या मराठी भाषिक बांधावांच्या प्रेमाने ही प्रेरणा मिळाली. भाषेच्या चुका असु शकतात परंतु माझ्या अंतकरणातील प्रेमात कोणतीही चुक अगर स्वार्थ नाही. म्हणतात अंतकरणापासुन निघालेले शब्द हृदयात प्रवेश करतात मग शुध्दलेखनाची चूक असो किंवा अलंकाराची केवळ याच कल्पनेने या पुस्तकाचे भाषांतर केले आहे. आशा आहे पाठकांना समजण्यास कठीण जाणार नाही. अल्लाह या प्रयत्नाबद्दल डॉ. मुहम्मद अहमद साहेबांना उत्कृष्ट मोबदला देवो, तसेच मराठी भाषीकांना सन्मार्ग व सत्यावर आधारित न्याय मार्ग प्रदान करो या प्राथनेसह.

आपला हितचिंतक,
डॉ. एम. यु. कहाळे
आकोला (महा.)
२० जानेवारी २००६

आवगमनीय पुनर्जन्माची वास्तविकता

वर्तमान काळात भारताव्यतिरिक्त जगात कुठेही आवागमनीय पुनर्जन्माची धारणा अस्तित्वात नाही. यूनान, मिस्त्र आणि रोमच्या लोकांमधे काही प्रमाणात याला मान्यता होती परंतु आधुनिक सांस्कृतिक प्रगति सोबत ती ही नष्ट झाली. केवळ काही काव्यात्मक रचना या धारणेला प्रमाणित करू शकत नाही कारण काव्य-रचना काल्पनिक विचारांच्या जास्त निकट असतात.

वैदिक काळात पुनर्जन्माची (Rebirth) धारणा अस्तित्वात नव्हती. वेदा ग्रंथात मात्र निश्चितच एका जीवनाची (पुनर्जन्म) स्पष्ट धारणा आढळून येते. वैदिक काळातील लोकांचे कर्माच्या (आचरणाच्या) या संकल्पनेत विश्वास होता की, जे लोक सत्कर्मी आणि सुमार्गी आहेत त्यांना दुसऱ्या दुनियेत सुवर्ग (स्वर्ग) प्राप्त होईल व जे लोक दुष्कर्मी व कुमार्गी आहेत त्यांना 'दुवर्ग' (नर्क) प्राप्त होईल. सांगितले की, "स्वर्गे लोक किंचन भयं नास्ति" स्वर्ग लोकात मुळीच भय नसते. 'शोकातिग: मोदते' तेथे दुखाचे कारण नसते 'न जरा' वृध्दावस्था नसते. 'अशनायपिपासे उभे तीर्त्वा' तेथे भुक आणि तहाण यांचा लवलेश नसतो. कारण खाद्यान्नाचा अति उत्तम प्रतिचा प्रबंध असतो. मनात इच्छा निर्माण होताच तो पदार्थ उपलब्ध होतो. या विपरीत नर्क हे भयंकर दुखाचे आणि कष्टाचे स्थान आहे. वेदांमधे स्वर्ग आणि नर्का विषयी अनेक मंत्र आहेत जे याचे स्पष्टीकरण करण्यास पर्याप्त आहेत.

कालांतराने ही मौलिक धारणा क्षीण होत गेली. आणि पुनर्जन्माच्या प्रचलित संकल्पनेनें त्याचे स्थान घेतले. महा पंडित राहुल सांकृत्यायन लिहितात की, "वैदिक ऋृषिंचा एका दुसऱ्या जगावर विश्वास होता जेथे सुकर्मी मृत्युनंतर सुख-संपन्न जीवन व्यतित करतात. तसेच एक जग दुष्कर्मि लोकांना यातना व कष्ट देण्यासाठी आहे. वैदिक ऋृषि पुनर्जन्मात (Rebirth) विश्वास ठेवत नव्हते. पुनर्जन्माचा हा सिध्दांत तर कालांतराने धार्मिक शिक्षकांना त्यावेळी घडला जेंव्हा लोकात स्वर्ग आणि नर्काची संकल्पना क्षीण पडली होती."

(Perspectives of the world - by - Rahul sankityayan page 552)

वेदांमधे आवागमनाच्या संदर्भात पुनर्जन्माचा उल्लेख नाही. यामधे पुनर्जन्माचा जो उल्लेख सापडतो तो केवळ एकमात्र पुनर्जन्माच्या अर्थात आहे. यालाच "दिव्याय जन्मने" (दिव्य-जीवन) म्हटले आहे. वेदामधे परलोकाची संकल्पना प्रबळ आहे. ब्राम्हण काळातील वैदिक साहित्यात 'पितृ-लोकांची' जी धारणा आहे त्यात आवगमनीय पुनर्जन्माचा लवलेश ही नाही. त्या काळात ही मान्यता होती की मृत्युनंतर सुकर्मी आपल्या कर्माचा मोबदला किंवा बक्षीसाचा उपभोग घेण्यास लोकांतरात जातात. यालाच पितृयान (पितरांचा मार्ग) सुध्दा म्हटले आहे. *(छांदोग्य उपनिषद २:१०३ - १- ६)*

विद्वानांचे विचार

अनेक विद्वान आणि संशोधकांचे अगदी स्पष्ट मत आहे की आवागमनीय पुनर्जन्म कल्पना निव्वळ काल्पनिक आहे.

पूर्व राष्ट्रपति आणि हिन्दु धर्माचे महान विचारक सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन म्हणतात "वेदांमधे आवागमनचा सिध्दांत सापडत नाही." *(Indian Philosophy, Pat I Pp. 112-116)*

प्रसिध्द विद्वान श्री सत्यकाम विद्यालंकार लिहतात की,

"वेदांमधे आवागमन नाही आणि या गोष्टीवर मी पैज लावू शकतो."

(आवागमन पृ. १०४)

पंडित दुर्गाशंकर महिमवत् सत्यार्थी आपल्या 'वेद आणि पुर्नजीवन' या संशोधक लेखात लिहतात की, "पुनर्जीवनाची समस्या केवळ कांही लोकांची नव्हे तर ती संपुर्ण हिन्दू-जातिची समस्या आहे. ते पुनर्जन्माच्या आवागमनीय कल्पनेवरच विश्वास ठेवतात परंतु वेद त्यांच्या या कल्पनेचे कसे जोरदार खंडण करते हे या लेखात दाखविण्यात येत आहे. "हा आहे ऋग्वेदच्या प्रथम मंडळाचा ४७ वा सूक्त ! या सूक्तामधे चांगल्या लोकांना चांगल्या मोबदल्याची हमी देण्यात आली आहे. जसे अमृत, रत्न, सुख इत्यादि तसेच वाईट लोकांना कठोर दंडाची धमकी देण्यात आली आहे. जसे -शेराच्या झाडाचे दुध भयंकर आग इत्यादि. पुढे ते लिहतात की कुरआन मजीद द्वारा प्रस्तुत आखिरत (अंतिम हिशोबाचा दिवस) च्या संकल्पनेशी या अंतिम दिवसाच्या उलेखात कांहीही अंतर तुम्हाला आढळून येणार नाही. याच प्रकारे यातनेची व कठोर दंडाची धमकी कुरआन मजीद मधे सुध्दा आहे. शक्येच नव्हे तर प्रस्तुतिकरणाची शैलीतही साम्य आढळून येते.

वेदांमधे आखिरत (मृत्यु पश्चात जीवन, परलोक) आहे किंवा नाही हा प्रश्नच मुळात विचीत्र आहे. हा प्रश्न अगदी असाच आहे की, कोणी विचारावे मनुष्यात आत्मा आहे किंवा नाही ? वास्तविकता ही आहे की पूर्णच्या -पूर्ण वेद 'आखिरत' ची पुष्टी करतात, विस्ताराच्या भितीने येथे केवळ १७ श्लोक दाखविले आहेत. परंतु वेदाद्वारे आखिरत चे प्रमाण द्यायचे असल्यास एक मोठे पुस्तक केवळ प्रमाणाचे होईल. मला तर आश्चर्य वाटते की लोक वेदाद्वारे आवागमनची कल्पना कशा प्रकारे सिध्द करतात. वास्तविक मृत्युनंतरचा अंतिम दिवस तर ईश्वरीय धर्माचा प्रमुख सिध्दांत आहे. वेद पूर्णपणे याची साक्ष देतात. काही श्लोक याच्या ग्वाहीसाठी प्रस्तुत करणे अगदी सोपे आहे. वेदही कुरआन प्रमाणे तीन मुळ सिध्दांतांना धर्माची आधारशिला मानतात. १) एकेश्वरवाद २) ईशदूतत्व ३) अंतिम दिवस"

(वेद और कुरआन, संस्करण १९८९ पृ. ३१, ३८, ३९)

वेदांचे प्रमाण

''विश्व संस्कृत प्रतिष्ठानम्'' च्या हरियाणा शाखेचे अध्यक्ष तसेच एम. एल. एन. कॉलेज यमुनानगर (हरियाणा) येथे तब्बल २३ वर्षे अध्यापन केलेले संस्कृतचे प्रतिष्ठित विद्वान डॉ. सत्यदेव वर्मा यांनी वर्षानु-वर्षे कठीण परिश्रम करून कुरआनचे संस्कृत भाषेत अनुवाद केले. याचे विधीवत संस्करण 'संस्कृत कुराणम्' या नावाने १९९० मधे? पब्लीकेशन दरियागंज नवी दिल्ली येथुन प्रकाशित झाले. यामधे डॉ. वर्मा साहेबांनी इस्लामच्या मुळ तत्वांना हिन्दु धार्मिक साहित्यात शोधण्याचा प्रयत्न केला. यांनी इस्लाम धर्माच्या पुनर्जीवन च्या मान्यतेला हिन्दू ग्रन्थात शोधले. इस्लाम विशुध्द सनातन धर्म आहे अर्थात मानविय जीवनाच्या अगदी आरंभापासुन म्हणजेच अगदी अनादिकाळापासून हाच धर्म प्रचलित आहे. जेंव्हा-जेंव्हा ह्याची शिकवण विकृत होत गेली अल्लाहने आपल्या प्रेषितांद्वारे याला पुन्हा-पुन्हा प्रस्तुत केली आणि हा क्रम प्रेषित मुहम्मद (स) यांचे वर समाप्त करण्यात आला. जेंव्हा प्रलयापर्यंत (कीयामत) इस्लामच्या शिकवणीच्या सुरक्षिततेचा योग्य आणि विशेष प्रबंध केल्यावर प्रेषित किंवा नबी पाठविण्याची आवश्यकता राहीलीच नाही. अत: इस्लामच्या अनेक शिकवणीं दुसऱ्या धर्माच्या पुस्तकात आढळणे अगदी संभव आहे. परंतु दुर्भाग्याने काही दुराचारी असेही आहेत जे शिकवणीतील समानता नष्ट करण्याच्या उद्देशाने तसेच हितसंबंधी भावनेने वशीभूत होवून आपल्या ग्रंथात हेरफेर करतात अथवा चुकीचा भावार्थ ग्रहण करतात. अशाप्रकारे अनेक असत्य तथ्यांचा समावेश होतो. याचाच परिणाम की, पुनर्जन्माला अनेक जन्माची धारणा बनवुन आवागमनच्या सिध्दांताशी त्याला अनिवार्य करून दिले. अशा प्रकारे अधिकतम जनतेला जन्म-जन्मांतरच्या भोवऱ्यात टाकले. यानंतरही ही आनंदाची बाब आहे की आमच्या देशात आजही सत्यवेदी विद्वान आणि विचारक विद्यमान आहेत जे जन-सामान्याला वास्तविकतेचे ज्ञान करून देत असतात. यापैकी एक नाव डॉ. सत्यवेद वर्मा यांचेही आहे ज्यांनी मौलाना सैय्यद अबुल-आला मौदुदी (रह.) यांच्या सदिच्छेला पुर्ण करीत प. कुरआनला संस्कृत भाषेत अनुवादीत केले. डॉ. वर्मा साहेबांनी प्रस्तावनेत याचा उल्लेख केला की, मौलाना मौदुदी साहेबांनी कुरआनचे अनेक भाषेत भाषांतराची आवश्यकता आहे असे सांगितले म्हणुनच हा प्रयास त्यांनी केला. अल्लाह डॉ. वर्मा साहेबांना त्याच्या या सत्कार्याचा उत्कृष्ट मोबदला देवो.

डॉ. वर्मा यांच्या निष्कर्षा मधे पुनर्जन्म संबंधी मान्यता सुध्दा आहे. या विषयी दिव्य कुरआनच्या शिकवणीचा भावार्थ हिन्दु धार्मिक ग्रंथात त्यांना आढळून आला. या पैकीच कांही तथ्य येथे प्रस्तुत करण्यात येत आहेत.

डॉ. वर्मा यांनी सर्व प्रथम दिव्य कुरआनच्या सूरह ''अल-आराफ'' च्या २९ व्या आयातीचा उल्लेख केला. या आयातीत म्हटले आहे की, ''जसे त्याने (अल्लाह) तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले तसेच तुम्ही पुन्हा निर्माण व्हाल.'' डॉ. वर्मा यांचे अनुसार ही शिकवण वेदातही आढळते.

असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसाबृता: ।
तांस्ते प्रेत्यापि गच्छान्ति इत्यादि: ।[१] *(यजुर्वेद ४०.३)*

अनुवाद :- बळा (इंद्रिय, शरीर बळ) साठी प्रसिध्द ते लोक गाढ अंधकाराने व्याप्त आहेत. ते मृत्युनंतर त्यात प्रवेश करतात जे आत्मघाती लोक आहेत.

(अनुवादक - पदमभुषण डॉ. पं. श्रीपाद दामोदर सातवलेकर, यजुर्वेद सुबोध भाष्य पृ. ६३४)

पुनर्मन: पुनरायुर्म आगन् पुन: प्राण पुनरात्मेत्यादि: ।[२] *(यजुर्वेद ४,१५)*

अनुवाद :- मला मन पुन्हा प्राप्त झाले, मला आयु पुन्हा, प्राण सुध्दा पुन्हा प्राप्त झाले. मला आत्मा पुन्हा प्राप्त झाला, डोळे, कान सुध्दा पुन्हा प्राप्त झाले. मला आत्मा पुन्हा प्राप्त झाला, डोळे, कान, सुध्दा पुन्हा प्राप्त झाले. विश्वाचा नायक, न दबणारा, शरीर रक्षक अग्नि निंदनीय पापापासून आमची रक्षा करो.

(अनुवादक : पं. श्रीपाद दामोदर सातवलेकर यजुर्वेद सुबोध भाष्य पृ.९८)

उपरोक्त मंत्राची व्याख्या करीत पंडीत सातवलेकर लिहतात झोप (निद्रा) समाप्त होवुन जागृती प्राप्त होताच पुर्ववत माझे मन, आयु, प्राण, आत्मा चक्षु, श्रोत इत्यादि सर्वांची शक्ती अगदी पुर्वी प्रमाणेच पुन्हा प्राप्त झाली. यामधे कोणताही फेर-बदल झाला नाही. गाढ निद्रेत (मृत्यु पश्चातची स्थिती) या सर्वांचा बोध मला नव्हता. परंतु जाग येताच मी चांगल्या प्रकारे ओळखतो की माझी सर्व इंद्रिये व अवयव अगदी पुर्वी प्रमाणेच आजही आहेत. येथे 'आयु' चा अर्थ 'जीवन' आणि 'आत्माचा' अर्थ 'जीवभाव' असा आहे. 'जठराग्नि' (तनुपा) अग्नि माझा रक्षक आहे. तोच पापा-पासून वाचवितो.

ज्या प्रमाणे निद्रे नंतर पहिल्या दिवसाचे इंद्रिय व दिवस प्राप्त होते याला दैनिक पुनर्जन्म म्हणतात. त्याचप्रमाणे 'महानिद्रा' म्हणजे मृत्यु पश्चात पुनर्जन्मातही पूर्ववत सर्व इंद्रिये व शक्ती पुन्हा प्राप्त होते. *(वली पृ.९८)*

स्पष्ट आहे की, वेदामधे पुनर्जीवनाचे जे विवेचन आले आहे त्याचा निष्कर्ष एका अजुन जीवनाशी आहे. वेदामधे आवागमन आणि पुनर्जन्म आढळत नाही.

डॉ. वर्मा यांनी यजुर्वेदाच्या उपरोक्त (४,१५) मंत्राची तुलना करीत पवित्र कुरआनची आयत १०:४ प्रस्तुत केली.

---

१) डॉ. सत्यदेव वर्मा ने 'सांस्कृतं कुराणम्' मधे दिलेला मंत्र येथे शब्दश: प्रस्तुत करण्यात आला आहे. परंतु पं. सातवलेकरांनी मंत्रात 'गच्छान्ति' नंतर 'इत्यादि' ऐवजी 'ये के चात्महनो जना:' लिहले आहे. या पैकी मुळ मंत्र कोणता हे ठरविणे कठीण आहे परंतु भावार्थापर्यंत पोहचण्यास कठीण नाही. डॉ. सुरेन्द्रकुमार शर्मा 'अज्ञात' (बंगा, पंजाब) यांनी कळविले की यजुर्वेदीय मंत्रात 'इत्यादि' शब्द येत नाही.

२) पं. सातवलेकरांनी मंत्राचा बाकी भाग अशाप्रकारे लिहला आहे. "पुनरात्माम आडगन पुनश्चक्षु: पुन: श्रोतंम आडगन। वैश्वानरो अदब्धस्तनूपा अग्नि: पातु दुरितादवद्यात्।"

"त्याच्या कडेच तुम्हा सर्वांना पलटुन जायचे आहे. हा अल्लाहचा पक्का वादा आहे. निसंशय तोच पहिल्यांदा निर्माण करतो. तोच पुन्हा दुसऱ्यांदा निर्माण करेल जेणेकरून ज्या लोकांनी इमान धारण करून चांगले कर्म केले आहे त्यांना न्यायपूर्वक मोबदला देईल."

कुरानोक्ती (७:५७) मधे आहे "आणि तोच आहे जो आपल्या कृपेने आधी शुभ-सुचना देणारी हवा पाठवितो. येथपर्यंत की ती ढगांना उचलुन धरते व आम्ही तीला एखाद्या निर्जीव भूमिकडे नेतो व मग त्यातून वर्षा करतो. मग जमीनीतून प्रत्येक प्रकारची फळे काढतो. याच प्रकारे आम्ही मृत्यू पावलेल्यांना मृतावस्थेतून काढणार याकरीता तुम्ही लक्ष द्या."

याच प्रकारचे विचार ऋग्वेदच्या या मंत्रातही दिसून येतात,

'पुनर्नो असुं पृथिवी ददातु पुनर्द्यौर्देवी पुनरन्तरिक्षम्।

पुनर्नस्सोमस्तन्वं ददातु पुनः पूषा पथ्यां या स्वस्तिः। *(ऋग्वेद १०-५९-७)*

अनुवाद : मृत्यु पश्चात जन्मात देवी भूमि आम्हाला पुन्हा प्राणशक्ती देते, द्युलोक पुन्हा प्राणशक्ति देतो आणि पुन्हा प्राणशक्ति देतो अंतरिक्ष सुध्दा. परमेश्वर आम्हाला पुन्हा शरीर देतो, सर्वांचे पोषण करणारा वायु आम्हाला वृध्दि देतो. जो वाग् आम्हाला वाणी प्रदान करतो. *(अनुवादक : वैद्यनाथ शास्त्री ऋग्वेद, हिन्दी भाष्य, सार्व देशिक आर्य प्रतिनिधी सभा संस्करण १९७६ पृ. ७०४)*

ब्राम्हण ग्रंथामधे ही प्रचलित पुनर्जन्म नाही.

वैदिक काळातील ऋषिंनी हा मौलिक निष्कर्ष काढला की सृष्टी नियम बाह्य नाही. तिच्यात सामंजस्य (अनुकुलता) आणि समन्वय आहे. त्यात असा कायदा प्रचलित आहे ज्या द्वारे ऋतू बदलतात आणि दिवस व रात्र होत राहते. त्याकाळच्या लोकांमधे स्वर्ग व नरकाची धारणा (संकल्पना) होती तसेच स्वर्गा प्रति जास्त लोभ होता.

रामधारी सिंह दिनकरजी आपले प्रसिध्द पुस्तक 'संस्कृति के चार अध्याय' मधे लिहितात.

"मंत्र युगा नंतर ब्राह्मण युग येते. पुनर्जन्म आणि कर्माचे फळा-विषयी प्रत्यक्षपणे विवरण ब्राह्मण ग्रंथात उपलब्ध नाही. परंतु ब्राम्हणांपासुन या गोष्टीचे ज्ञान मिळते की तात्कालीन समाज या गोष्टीला मान्य करीत होता की मृत्युनंतर 'जीव' 'आत्मा' परलोकात वास करतो आणि या लोकात जसे कर्म करेल परलोकात त्याला तसाच मोबदला मिळेल."

(संस्करण : १९९८ पृ. १३३)

दिनकरजी पुढे लिहतात की, "उपनिषदांनी मानवाला कोरून कोरून अशी प्रश्ने त्याच्या मन-मस्तिष्का मधे निर्माण केलीत ज्यांची अंतिम उत्तरे आज-पर्यंत त्याला मिळाली नाही." *(पृ. १३५)*

श्री रामदासजी गौर आपले प्रसिध्द पुस्तक 'हिन्दुला' च्या पान नं. ५६५ वर लिहतात.

"सनत्सुजातच्या प्राचीन वृतांतात वेदान्त-तत्व प्रतिपादित आहे. ज्ञाना-पासुनच मोक्ष मिळतो हा सिध्दांत उपनिषदचाच आहे. तसेच जीवात्मा आणि परमात्मा एकच आहे हा सिध्दांत सुध्दा तेथुनच आला आहे. प्रमाद (अंर्तआत्माच्या चुकीने) मुळे मृत्यु येतो म्हणजे परमात्म-स्वरूप विसरल्या मुळेच आत्मा मरण पावतो. हे एक नवीन तत्व होय."

काही असेही विद्वान आहेत जे आत्मा आणि ईश्वर यांची एकता वेदांद्वारे सिध्द करण्याचा प्रयत्न करतात. डॉ. विष्णुदेव उपाध्याय यांनी "भारतीय दर्शन मुलान्वेषण" या पुस्तकात लिहले की, "वेदा नुसार आत्म्याचा जनक परमात्मा आहे. तो अशाप्रकारे की, जीवात्मा परमात्मा पासुन वेगळा नाही.

डॉ. उपाध्यायच्या विचाराला सत्य मानले तर मग हे मान्य करावे लागेल की जो ज्या वस्तुचा निर्माता आहे त्याचा त्या वस्तुत समावेश होतो. हे कीती हास्यास्पद व तर्कहीन मत आहे.

शोषणाचे शस्त्र

पुनर्जन्म आणि आवागमन दोन्ही वेगळे वेगळे आहेत. वेदांमधे पुनर्जन्म आहे ज्याचा अर्थ आपल्या कर्माच्या फळासाठी (मोबदला) एक वेळ जन्म घेणे होय. तसेच आवागमनचा अर्थ मोक्ष प्राप्ती पर्यंत कर्मानुसार ८४ लक्ष योनिमधे वारंवार जन्म घेणे होय. उपनिषद काळात या दोहोंना म्हणजे पुनर्जन्म आणि आवागमनला एकत्र करून टाकले. याच्या अहीत उद्देशाला स्पष्ट करीत महापंडित राहुल सांकृत्यायन लिहतात.

"भारतीय प्राचीन साहित्यामधे छान्दोग्य उपनिषदाने सर्व-प्रथम पुनर्जन्माची कल्पना प्रस्तुत केली. हा पुनर्जन्म केवळ परलोकाचा नव्हे तर या लोकातही प्राणी आपल्या कर्मानुसार जन्म घेतात. या कल्पनेचे त्या काळचे प्रथम प्रचारकांनी हा विचार केला नसावा की हा सिध्दांत पुढे कीती घातक सिध्द होईल आणि परिस्थिती नुसार परिवर्तनाची क्षमता-शक्तीला कुंठीत (बोथट) करून समाजाला प्रवाहशुन्य नदीचे घाण पाणी बनवून सोडेल.

या लोकात पुन्हा पुन्हा जन्म घेणे पिडीत लोकांसाठी घातक वस्तु होय. यामधे केवळ इतकेच नाही की आजच्या दु:खांना विसरून जा तर हे सुध्दा सांगितले की सामाकिड विषमता न्याय आहे. कारण हे प्रतिफळ आहे तुमच्या मागच्या जन्माच्या तपस्येचे व कर्माचे या विषमते विना तुम्ही आजच्या कष्टाचे पारितोषिक प्राप्त करू शकत नाही. पुर्नजन्मा विषयीचे हे कथन सर्वात पुरातन आहे.

'तर जे येथे चांगल्या आचरणावाले आहेत (त्यांचेसाठी) हे आवश्यक आहे की, ते सुंदर योनि-ब्राह्मण योनि अथवा क्षत्रिय योनि किंवा वैश्य योनित जन्माला येवोत. आणि जे वाईट आचरणावाले आहेत, हे आवश्यक आहे की त्यांना वाईट योनि - कुत्रा योनि, सुकर (डुक्कर) योनि किंवा चांडाल योनि प्राप्त होवो."

(छांदोग्य ५-१०-७) (पं. राहुल सांकृत्यायन, दर्शन दिग्दर्शन, कीताब महल, संस्करण : १९९२ पृ. ४०३-४०४)

पंडीत सांकृत्यायन छांदोग्य उपनिषदच्या उपरोक्त श्लोकाचे औचित्य (उपयुक्तता) स्पष्ट करुन लिहतात.

'ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांना मनुष्य-योनि (जात) अंतर्गत मान्य न करता त्यांना स्वतंत्र योनिचा दर्जा देण्यात आला. कारण मनुष्य योनि मान्य केले तर समानतेचा प्रश्न उपस्थित होवु शकतो. ॠग्वेद १०-९०-१२ मधील पुरुष सुक्ताचे कथन 'एकाच शरीराचे भिन्न-भिन्न अंग' याचा येथे विसर पडला आहे. कारण ही कल्पना सुध्दा जरी सामाकिड अत्याचारावर आवरण टाकण्यासाठीच घडण्यात आली होती परंतु ती त्या दर्जापर्यंत पोहचत नव्हती. ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य यांनी स्वतंत्र योनिचा दर्जा यासाठी देण्यात आला की, संपत्तीचे स्वामी असलेल्या या तीन्ही वर्णांची वैयक्तिक संपत्ती आणि अधिकाराला धर्माद्वारे (कर्मफळ) न्यायिक ठरविण्यात यावे, तसेच व्यक्तिगत संपत्तीचे संरक्षक राज्याच्या हाताला धर्माद्वारे दृढ केले जावे.' *(उक्त, पृ. ४०४)*

प्रसिध्द विचारवंत डॉ. मानवेन्द्रनाथ राय जन्म-जन्मांतर च्या पुनर्जन्माचे (आवागमनीय पुनर्जन्म) जोरदार खंडण करतात. ते पुनर्जन्माच्या या सिध्दांताला शासक वर्गाच्या समर्थक पुरोहितांची चातुर्यपूर्ण कल्पना मानतात. ते म्हणतात समाजात त्यांची स्थिती श्रेष्ठ व उच्च असावी यासाठी याची रचना करण्यात आली. त्यांच्या मते पुनर्जन्माचा हा सिध्दांत दैववादाला जन्म देतो जो मनुष्याला निष्क्रिय तसेच पौरूषहीन बनवितो.

(Indian Message, M.N. Roy PP. 14, 151)

'आत्मा और पुनर्जन्म' या पुस्तकाची लेखिका सोमा सबलोक म्हणते की, 'पुर्वजन्माच्या कर्माचे फळ' हा सिध्दान्त धनवान लोक आणि धर्माचे ठेकेदार लोकांच्या त्या दलालांनी घडला आहे जे गरीब व भोळ्या जनतेला लुबाडुन त्यांना त्यांच्या गरीबीत संतुष्ट ठेवु इच्छित होते. *(पृ. १२)*

पुनर्जन्माचा विस्तार

पुराण, धर्मशास्त्रे इत्यादि मधे

पुनर्जन्माच्या 'पुन:' या प्रारंभी शब्दाचा अर्थ होतो 'पुन्हा' परंतु तरीही जबरीने या शब्दाचा अर्थ 'पुन्हा-पुन्हा' (वारंवार) असा स्वीकार करून रीतसरपणे उपनिषदांद्वारे त्याची स्थापना केली आणि पुराण, रामायण, महाभारत तसेच धमशास्त्रे इत्यादि मधे त्याला जास्त फैलविण्यात आले. यामधे श्राध्द-सिध्दांत अर्थात मृताच्या आत्म्याला शांती पोहचविण्यास कर्मकांड ही उपलब्ध आहे, जो पुनर्जन्माच्या पुर्णत: विपरीत आहे. तरी सुध्दा ही विरोधाभासी मान्यता (विपरीत कल्पना) हिन्दु धार्मिक ग्रंथात उपलब्ध आहे. डॉ. पांडुरंग वामन काणे लिहतात. कर्म आणि पुनर्जन्माच्या सिध्दांताशी श्राध्द सिध्दांताची जोड घालणे अतिशय कठीण आहे.

(धर्मशास्त्र का इतिहास, पंचम भाग, उ. प्र. हिन्दी संस्थान, द्वितीय संस्करण (आवृत्ती) १९८४ इसवी पृ. ३८४)

याच कारणांमुळे आर्यसमाज श्राध्द प्रथेचा विरोध करतो परंतु ते सुध्दा सुतर्क प्रस्तुत करण्यास सक्षम नाहीत.

वेदांना सोडुन इतर धर्मग्रंथात आवागमनीय पुनर्जन्म उपलब्ध आहे. त्या नुसार ८४ लक्ष योनित जीव (आत्मा) भ्रमण करतो. या जीवात्मांना मानव-दानव (राक्षस), पशु-पक्षी, कृमि-कीट, (शुद्रकीअ-कीटक) गिरि-कानन, (जंगलाचा कुडा) तरू-तृण (झाड-गवत) इत्यादि सर्व रूपे धारण करावी लागतात. पुराणामधे सुध्दा याचे सविस्तर वर्णन मिळते. पुराणांनी सुध्दा चांगल्या आणि वाईट कर्माची महत्ता अवैदिक पुनर्जन्म मान्यते-नुसार वर्णिली आहे. त्यांच्या मते सत्कर्म आणि दुष्कर्माचे फळ कर्माचा नाश होई-पर्यंत भोगावेच लागते. नारदीय पुराणात (उत्तर भाग २९-१८) आहे की, "शेकडो जीवनानंतर ही कर्माचा नाश (नष्ट) होत नाही."

पद्म पुराण स्पष्ट पणे नमुद करतो की, "कर्माचे फळ भोगल्या शिवाय कर्माचा नाश होत नाही. भूत-काळातील जीवनाचे कर्मापासुन उत्पन्न बंधनाला कुणीही हरवु शकत नाही." (२-८१-४८ आणि ९४-११८) याच पुराणाच्या (२-९-१३,१५) श्लोकात म्हटले आहे की, "मनुष्य आपल्या कर्मा-द्वारे देव बनु शकतो किंवा मानव, पशु-पक्षी अथवा शुद्र जीव अगर स्थावर (झाड-झुडपे किंवा दगडाचा तुकडा) बनु शकतो. स्वबळाने किंवा संततीच्या उत्पत्तीच्या माध्यमातून कोणताही व्यक्ति आपल्या पूर्व जन्मीच्या कर्माच्या प्रभावाला दूर करू शकत नाही."

विष्णु पुराण (४४-४५), गरुड-पुराण (२-२-८९) मधे उल्लेख आहे की, चोरी केल्यामुळे पापी ठरविण्यात आलेल्या स्त्रीया पुढच्या जन्मात चोराच्या पत्नी होतात. मनु-स्मृति (१२-६९) मधे सुध्दा हीच गोष्ट सांगितली आहे. तात्पर्य हेच की मानव योनिचे परिवर्तन होणार नाही.

मार्कण्डेय पुराण (१५-१,४१), ब्रम्ह पुराण (२१७,३७,११०), गरूड पुराण (प्रेत खंड २,६०-८८), वराह-पुराण (२०३-२१), वामन पुराण (अध्याय १२) इत्यादि मधे मनुष्याला कर्माचे काय फळ मिळते आणि आवागमनच्या चक्र-व्यूह मधे तो कीती फसतो हे सांगण्यात आले आहे.

पौराणिक कथा

पुराणामधे पुनर्जन्मावर आधारित अनेक कथा अस्तित्वात आहेत. यापैकी एक-दोन कथा येथे प्रस्तुत करणे उचित होईल. यामुळे पुनर्जन्माला आवागमनीय रूप द्यायच्या सीमेचे आकलन करण्यास सोइस्कर होईल. प्रथम मार्कण्डेय पुराणात वर्णित चार पक्षाच्या गोष्टीची चर्चा करतो. - कथा अशाप्रकारे आहे,

एक वेळ महर्षि जैमिनि मार्कण्डेय मुनि जवळ गेले आणि महाभारता विषयी काही संदेह (शंका) उपस्थित केले. संध्या-वंदनाची वेळ असल्यामुळे मार्कण्डेय मुनिने त्यांना विन्ध्य पर्वताच्या गुहेत वास्तव्य करीत असलेल्या चार पक्षाकडे पाठविले. महर्षि जैमिनि यांनी पक्षाविषयी विचारले असता मार्कण्डेय मुनी म्हणाले की ते पक्षी मुनिवर समीक यांचे पाळीव आहेत. एक वेळची गोष्ट आहे की, दुर्वासाजीच्या शापाने वपु नामी अप्सराने गुरूडवंशीय कंधर नावाच्या पक्षीची पत्नी मदनिकाच्या गर्भातून तार्क्षी पक्षिणीच्या रूपात अवतार घेतला. या तार्क्षीचे द्रोण नामक एका ब्राह्मणांशी लग्न झाले. द्रोणापासून गर्भधारणा झाल्यावर साडेतीन महीन्यांनी उडत असता महाभारताचे युध्द सुरू असलेल्या हद्दीत आली. येथे ती अर्जुनच्या बाणाने घायल झाली आणि गर्भस्थ अंडे खाली पाडून मृत्यु पावली. संयोगाने याचवेळी भगदत्ताचा सुप्रवीक नामी गजराजचा महान गलघंट ही बाण लागल्याने तुटून पडला आणि त्याने अंड्याला झाकले. युध्द समाप्ती नंतर शिष्यांसोबत भ्रमण करीत समीक मुनि आले व त्यांना घेवून गेले. आश्रमात परिपक्व झाल्यावर एक दिवस ते पक्षी मनुष्य वाणीत गुरूला प्रणाम करू लागले. मुनिवर समीक आश्चर्य चकीत झाले व त्यांना पुर्व-जन्माचा वृतान्त विचारला. त्या पक्षांनी (मनुष्य वाणीत) सांगितले की आम्ही चारही भाऊ पूर्वजन्मात सुक्रष नावाच्या ब्राम्हणाचे ज्ञानी पुत्र होतो. एके दिवशी आम्ही पिताच्या आज्ञेचे उलंघन केले त्यांनी आम्हाला तिर्थक योनित जाण्याचा शाप दिला. तरी हे गुरूवर्य ! आम्ही तेच चार ब्राम्हण पुत्र आहोत. आता आम्ही पक्षी होवून तार्क्षीच्या गर्भातून जन्माला आलो.

पुराणामधे एक जडभरतची प्रसिध्द कथा आहे. श्रीमद् भागवत पुराणात आहे की ऋषभदेवांचे पुत्र राजाधिराज भरत त्यांनी बराच काळ सत्ता-सुखाचा उपभोग घेतल्या नंतर आपल्या पुत्रांना राज्याची धुरा सोपवून स्वत: वानप्रस्थ नियम घेवून शाल-ग्राम क्षेत्रात वास्तव्य करू लागले. तेथे महायोगाचा आश्रय घेवूनही शेवटी ते एका मृगछौनाच्या (हरीणाचा छावा) प्रेमात गुंतले. ममतावश देह-त्याग (मृत्यु) समयी ते मृगछौनाचेच ध्यान करीत होते. यामुळे त्यांची मुक्ति झाली नाही आणि मृगयोनीत पुनर्जन्म झाला. परंतु त्यांची पुर्वस्मृति नष्ट झाली नव्हती. अत: (त्यामुळे) त्यांनी दुसऱ्या हरीणांची संगत सोडली आणि इकडे-तिकडे गवताच्या काड्या चरत-चरत गंडकी नदी मधे अर्धे शरीर बुडवून तपश्चर्या करीत प्राण लागला. यानंतर पुन्हा ते एका श्रेष्ठ ब्राह्मणाच्या घरी जन्माला आले. परंतु येथेही पुर्वस्मृतिने त्यांची साथ सोडली नव्हती ह्यामुळे ते अचेतन, आंधळे व बहिऱ्या प्रमाणे आचरण करायचे. पिताने शिकविल्या नंतरही ते विद्या प्राप्त करू शकले नाही. वडीलांनी त्यांना शेताच्या रखवाली साठी नियुक्त केले. तेथे ते परब्रह्माचे चिंतन करीत काळाची प्रतिक्षा करीत राहीले. शेवटी त्यांना मुक्ति प्राप्त झाली. (नारद पुराणच्या पूर्व-भाग-द्वितीय पाद मधे सुध्दा जडभरतची कहानी मिळते.)

पदम् पुराणच्या उत्तर खंडातील अध्याय १७४, ५ मधे प्रल्हादच्या पूर्वजन्माचा उलेख मिळतो. या कथे नुसार ते पुर्वजन्मात शिवशर्माचे पुत्र सोमशर्मा होते. मृत्यु पश्चात दानव

शरीरात प्रविष्ट होवून प्रल्हाद बनले. श्रीमद् भागवत पुराण (७.१५, ६९-७३) मधे नारदाच्या पूर्वजन्माचा उल्लेख आहे. याच पुराणात त्यांच्या अनेक पूर्वजन्माचा उल्लेख केला आहे. या विवरणामधे त्यांचे ब्रह्माच्या हृदयात प्रविष्ट होण्याचे वर्णन सुध्दा आहे.

स्कन्द पुराणानुसार राजा बलि पूर्वजन्मात देव ब्राह्मण नियत नामी जुगारी होता. केवळ जुगारीच नव्हे तर तो महापापी व्यभिचारी आणि अनेक दुष्कृत्यात होता. त्याने आपली सर्व सामग्री शिवलिंगाला अर्पित केली त्यामुळे तो पुनर्जन्मात राजा झाला. परंतु जर त्याची मुक्ति (मोक्ष) झाली असती तर तो राजा झाला नसता.

शिवपुराण (शतरूद्र संहिता २८ वा अध्याय) नल-दमयन्तीच्या पूर्वजन्माची कथा सांगतो. या कथेनुसार दोघेही आधी आहुक नामक भील व आहुआ नामी भिल्लीण होते. शंकरजी त्यांचे येथे यति रूप धारण करून आले आणि रात्री त्यांचेकडे झोपण्याचा आग्रह केला. भील दारात झोपला व भिल्लीण आणि यति घराच्या आत झोपले. बाहेर हिंसक पशुंनी भीलला मारून टाकले. सती होण्यापूर्वी भिल्लीणला शंकारांनी मोक्ष प्राप्ती ऐवजी पुढील जन्मात दोघेही राजा राणी होतील असे वरदान दिले. पुराणामध्ये प्रद्युम्नला कामदेवचा तर क्रृभला ब्रम्हा-पुत्र नारदांचा तसेच पूतनाला बलि-पुत्री रत्नमालाचा आणि जरासंघाला हिरण्याकश्यपु यांचा पुनर्जन्म म्हटले आहे. या शिवाय ही अनेक पुनर्जन्माच्या कहान्या (कथा) पुराणात वर्णिल्या आहेत.

महाभारता मधे पुनर्जन्म

महाभारतामधे सुध्दा आवागमनीय पुनर्जन्माला मान्यता प्राप्त आहे. या अनुषंगाने त्यात अनेक कथा आणि उपदेश उपलब्ध आहेत. महाभारतातील अनुशासन पर्वा मधे अतिशय मनोहर कथा वर्णिली आहे.

बाणांच्या बिछाण्यावर पडलेले भीष्म युध्दिष्ठिरांना म्हणाले हे राजन ! प्राचीन काळची गोष्ट आहे. एक वेळ भगवान व्यासजी कुठेतरी जात होते. रस्त्यात त्यांची दृष्टी एका कीड्यावर केंद्रित झाली जो गाडीच्या सोबत मोठ्या वेगाने धावत होता. कीड्या-जवळ जाऊन व्यासजीनी त्याला विचारले, 'कीट ! तू का बरे इतक्या शिघ्रतेने पळत आहेस ? आज तुझ्यावर कोणते संकट ओढवले ? कीडा बोलता झाला. 'भगवंत ! बघा ना ही बैलगाडी कीती वेगाने येत आहे. मला भिती वाटतय की ही गाडी मला ठेचून टाकेल.' यावर व्यासजी म्हणाले

'कीट ! (कीडा) तू तर अधम तिर्थक योनित जन्माला आला आहे तुझे तर मरणेच जास्त बरे आहे. सांग-पाहू कोणत्या पापामुळे तुला तिर्थक योनि प्राप्त झाली ? कीट म्हणाला 'भगवंत ! मी पूर्वजन्मात एक धनवान शुद्र होतो. मी नेहमी ब्राह्मणांचा अपमान करीत असे. सर्व वर्णांच्या प्रिय वस्तुंचे अपहरण करीत होतो. मी अतिशय कंजुस आणि अतिशय व्याज घेत होतो. मी कधी दान-धर्म आणि सत्कर्म केले नाही. मांस व भात माझे खाद्य होते. परंतु मी माझ्या वयोवृध्द आईची सेवा करीत असे. तसेच एक वेळ घरी आलेल्या पाहुण्याचा सत्कार सुध्दा केला होता. केवळ याच पुण्यकर्मामुळे माझी पूर्व स्मृति माझ्या सोबत आहे.''

कीड्याची कहानी ऐकून व्यासजी म्हणाले "हे कीट ! आज तुला माझे दर्शन झाले आहे. अत: आज पासुन दहा (१०) जन्मानंतर मी तुला माझ्या तप-शक्तीने परम पद-मोक्ष प्राप्त करवून देईल. एका जागी अत्यंत कर्मनिष्ठ ब्राह्मण राहतात तू त्यांचा पुत्र होवून माझ्या कृपेने मोक्षाला प्राप्त होशील."

इतके बोलून व्यासजी निघून गेले. याचवेळी बैलगाडी आली व तीच्या खाली दबून कीट ने (कीड्याने) प्राण त्यागले. या नंतर हा कीडा गाढव झाला, नंतर डुक्कर आणि कुत्रा झाला. यानंतर तो कोल्हा व चाण्डाल रूपात जन्माला आला. तदनंतर सत शुद्र आणि वैश्य योनिला प्राप्त झाला. तत्पश्चात हा कीडा राजपुत्र होवुन व्यासजी कडे गेला आणि त्यांना विनंती केली की मला दासत्व उपदेश द्या. शेवटी तपस्या करीत प्राण त्यागले. यानंतर तो ब्राम्हण पुत्र झाला. तेव्हा व्यासजीने त्याला दर्शन दिले व त्यांच्याच कृपेने त्याची मुक्ति झाली.

महाभारतातील अनुशाशन-पर्वामधे एका शुद्र तपस्वीची ही कथा नमुद आहे. या शुद्राने एकवेळ आपल्या ब्राम्हण तपस्वी मित्रा द्वारे आपल्या पूर्वजांचे श्राध्द संपन्न करविले. याच्या फळाने तो तापसी शुद्र पुनर्जन्मात राजा झाला आणि तो तपस्वी ब्राम्हण त्याचा पुरोहित. राजा नेहमी पुरोहिताला बघुन हसायचा एक दिवस पुरोहिताने राजाला एकांतात बोलावून हासण्याचे कारण विचारले. राजाने आपल्या पूर्व स्मृतिच्या बळावर पुरोहितला सर्व वृतान्त सांगितला. राजाची गोष्ट ऐकून पुरोहित तपस्या करण्यास गेला आणि कठीण तपस्येने मोक्ष प्राप्त केला.

या कथे-व्यतिरिक्त महाभारतात अनेक पुनर्जन्माच्या कथा (कहाण्या) आहेत. यांची प्रकट विशेषता प्रामुख्याने ही आहे की, या मधे हिन्दू बांधवांची उच्च-जाती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात समाविष्ट आहे, जणु त्यांच्या-शिवाय कथा होवूच शकत नाही. या शिवाय हे एक उलेखनिय तथ्य आहे की, पुनर्जन्मा विषयी पौराणिक कथा उपलब्ध अवश्य आहेत परंतु १९३० इसवी सना पूर्वी अशा प्रकारच्या ऐतिहासिक घटनांचा दावा केला गेला नाही. १९३० इसवी सनाच्या जवळील काळात ज्या पुनर्जन्माची घटना प्रस्तुत केली किंवा करविल्या गेली ती एक ब्राह्मण कन्या शान्ति देवीशी जुळलेली आहे.

या घटनेची सत्यता आज-पर्यंत सिध्द केली गेली नाही. शांति देवी ने आपल्या पूर्व-पतीचे नाव सांगितले नाही तसेच मथुरा मधे त्यांच्या पतिचे नाव माहीत होवू शकले नाही. असे सांगण्यात येते की, शान्ति देवी नुसार त्यांचे पति कापडाचे व्यापारी होते. शान्तिदेवीचे पूर्व जन्मीचे नाव सुध्दा माहीत होवू शकले नाही. तसेच त्यांच्या मुलाचे नावही कळू शकले नाही. कथा सांगते की त्यांचा मुलगा जन्मानंतर मथुरा येथील एका रूग्णालयात (ज्याचे नाव माहीत नाही) मृत्यु पावला. त्याची मृत्यु आणि शान्ति देवीच्या रूपात त्याचा जन्म यामधे बरेच समयान्तर दिसून आले. अशा प्रकारे त्यांच्या संस्कृत अध्यापक पिता द्वारे प्रस्तुत या कथे विषयी अनेक शंका कुशंकानी जन्म घेतला.

गीता आणि आवागमन

गीता महाभारताच्या भीष्म-पर्वाचा भाग आहे. श्रीमद् भागवत गीतेची काही श्लोक आवागमनीय पुनर्जन्माच्या पुराव्यात प्रस्तुत केले जातात. प्राथमिक प्रमाण म्हणून हा श्लोक प्रस्तुत केला जातो.

वासांसि जिर्णानि यथा विहाय
नवनि गृहणाति नरोडपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णा
न्यन्यानि संयति नवानि देही। **(२:२२)**

अनुवाद : ज्या प्रमाणे जुन्या वस्त्रांचा त्याग करून नविन वस्त्र धारण करतो, त्याच प्रमाणे आत्मा जुन्या जीर्ण शरीराचा त्याग करून नविन शरीर ग्रहण करतो.

(अनुवादक : स्वामी प्रभुपाद, श्रीमद भगवदगीता यथारूप पृ. ७८)

उपरोक्त श्लोकावर जर बुध्दि संगत दृष्टिपात टाकला व विचार केला तर कळून येईल की, ज्या श्लोकाला आवागमनचा आधार ठरविण्यात आला आहे ते वास्तविकतेच्या अगदी विपरीत आहे. शरीरावरून जुने कपडे काढून त्यापेक्षा निम्न दर्जाचे अगर खराब कपडे पुन्हा शरीरावर घालणे हे मानविय स्वभावाच्या अगदी विपरीत आहे आणि व्यावहारिक रूपात तो तसे करीत ही नाही. जुने कापड कधी फेकायचे हे सर्वस्वी मनुष्याच्या मनावर अवलंबून असते. सहसा तो अगदी खराब होईपर्यंत त्याला घालतो. मनुष्याचा कपडे बदलण्याचा क्रम हा सुरूच असतो. कधी-कधी तर तो दिवसातून एका पेक्षा जास्त वेळा कपडे बदलतो. इतकेच नव्हे तर कधी तो जुने कपडे घालतो तर कधी नविन ! जे कपडे अगदी पूर्णपणे खराब झाले नाहीत त्यांना तो अधुन-मधुन घालत असतो. हे कार्य पूर्णपणे त्याच्या इच्छेवर विसंबून आहे.

आवागमन आणि पुनर्जन्माचा जो सिध्दांत सांगण्यात आला आहे त्यावर कपडे बदलण्याची जी उपमा सांगितली ती अयोग्य आणि तर्कहीन आहे. या मान्यते-नुसार पुनर्जन्मात मनुष्याच्या इच्छेला कोणतेही स्थान नाही. प्रत्येक वाईट कृत्य करणारा दुराचारी मनुष्य सुध्दा आपले भावी जीवन उत्तम दर्जाचे होवो हीच इच्छा बाळगतो. परंतु या सिध्दांताची मान्यता या इच्छेला लाथाडते. अत: कपडे बदलण्याची उपमा आवागमनीय मान्यतेशी सुसंगत नाही.

उपर्युक्त श्लोकाच्या पुर्वी सुध्दा आवागमनच्या सिध्दांताला सिध्द करण्यास दिलेल्या श्लोकातही उचित उपमा देण्यात आली नाही. बघा श्लोक असा आहे.

देहिनोऽ स्मिन्यथा देहे कौमार यौवनं जरा।
तथा देहान्तर प्राप्ति र्थीरस्तत्र न मुहयति॥ **(२-१३)**

(अनुवाद : जसे जीवात्माच्या देहात बालपण, तारूण्य आणि वृध्दावस्था असते.

त्याचप्रमाणे (मृत्यु नंतर) अन्य शरीराची प्राप्ती होते. या विषयात संयमी पुरुष मोहित होत नाही.) *(अनुवादक जयदयाल गोयन्दका, गीता तत्वविवेचनी टीका पृ. ६७)*

आवगमनच्या मान्यते नुसार आत्म्याला एकाच शरीराच्या तीन अवस्थेतून निर्वाह करावा लागत नाही तर, त्याला विभीन्न प्रकारच्या पशु, पक्षी, कीडे, वृक्ष इत्यादि रूपात स्थानान्तरित व्हावे लागते. जर एकाच शरीराच्या अवस्थेला त्याग करणे मान्य केले तर आवागमन कुठे झाले? अत: बालपण, तारूण्य व वृध्दावस्थाची उपमा असंगत व चुकीची आहे.

आवागमनीय पुनर्जन्माचे समर्थक खाली दिलेल्या दोन (२) श्लोकांनाही प्रस्तुत करतात.

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम ॥ (२-१२)

(अनुवाद : (श्रीकृष्ण सांगतात) असे कदापिही नाही की कोणत्याही एका काळात मी नव्हतो, तू नव्हता किंवा हे सर्व राजे नव्हते ! आणि असे ही नाही की, यापुढे आम्ही राहणार नाही.) *(अनुवादक - स्वामी प्रभुपाद, श्रीमद् भगवतगीता यथारूप पृ. ६६)*

बहुनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ (४-५)

(अनुवाद : हे परंतप अर्जुन ! माझे आणि तुझे अनेक जन्म होवुन गेलेत त्या सर्वांना तु जाणत नाही परंतु मी जाणतो.)

(अनुवाद - जयदयाल गोयंका, गीता तत्व विवेचिनी टीका पृ. १७४)

उपरोक्त दोन्ही श्लोकाने ही गोष्ट स्पष्ट होते की, मनुष्याला सार्वकालिक मान्य केले गेले आहे. गोयंका यांनी हे लिहले की, कृष्णजी म्हणतात - "आम्ही लोक अनादि आणि नेहमी आहोत." जर या श्लोकांचा अर्थ आणि भावार्थ हाच आहे तर हा बोध होतो की, मनुष्याची वर्तमान संख्या सार्वकालिक आहे जी विभिन्न शरीर व आकृतित परिवर्तित होवूनही मोक्षाला प्राप्त झाली नाही आणि पुढेही मोक्ष प्राप्त होणार नाही. कारण श्लोकाचा अनुवाद साक्ष आहे की, यापुढे सुध्दा आम्ही राहणार ! सर्व लोक आवागमच्या चक्रीत चिरडत राहतील. या श्लोकान्वे सर्व मनुष्य अनादि झालेत तेंव्हा कुणाचाही अंत बरे कसा होईल ? हे सर्व श्लोक निश्चीतपणे आवागमनीय पुनर्जन्माची अक्षरश: खिल्ली उडवतात. तरीही पुन्हा पुन्हा यानांच प्रमाणा-खातर प्रस्तुत करण्यात येते. खरोखर कीती बुध्दिहीनता आहे ही ! गीता कर्मावर (कार्यावर) तर भर देते परंतु त्याच्या फळावर तीचा विश्वास नाही. निष्फळ अथवा निष्काम कर्माने मनुष्याला कर्महीन बनविले तर त्यात कोणतेही आश्चर्य नाही. स्वामी विवेकानंद गीतेच्या उपदेशात्मक परिस्थितीवर प्रकाश टाकीत सांगतात की, "ज्ञान, भक्ति आणि योग यांची समीक्षा युध्दस्थळा वर कशी झाली असेल?

जेव्हा सैन्य एक दुसऱ्याशी युध्दास सुसज्य उभे आहेत. काय कृष्ण-अर्जुन यांच्या संवादाचा शब्दन्-शब्द लिहणारा शार्टहँड लेखक उपस्थित होता? हे युध्द तर प्रतिक आहे त्या संर्घषाचे जे मनुष्याच्या हृदयात चांगल्या आणि वाईट विचारामधे निरंतर होत असते. कुरूक्षेत्र युध्दाचे कोणतेही प्रमाण प्रस्तुत केले जाऊ शकत नाही. अर्जुन आणि अन्य लोकांच्या ऐतिहासिकते विषयी संदेहास पुर्ण वाव आहे.''

(स्वामी विवेकानंद यांचा पुर्ण लेखन, भाग ४)

रामायणामधे पुनर्जन्माला मान्यता

रामायण मधे सुध्दा आवागमनीय कर्म आणि पुनर्जन्माचे अंश मिळतात. राजा दशरथांचे अंतिम पत्नी कैकेयी त्यांची सर्वात प्रिय रानी होती. कैकेयीच्या वचनात बंधक दशरथांनी तीच्या वरदानाला स्वीकारून रामाला १४ वर्षाचा वनवास दिला तेव्हा रामाची आई कौशल्या शोकाकूल होते व म्हणते की, ''माझा विश्वास आहे की मी पूर्व-जन्मात पुष्कळशा लोकांना त्यांच्या पुत्रा-पासुन विभक्त केले असेल, अथवा जीवंत-जीवांना कष्ट दिले असावे (किंवा त्यांना मारले असावे) यामुळेच हे दु:ख माझ्यावर येवुन पडले. मी निसंशय हे मानते की मी पूर्व जन्मात त्या गाईचे (अथवा आईचे) स्तनाना कापले असावे ज्यांची वासरे आपल्या आईचे दुध पीण्यास इच्छुक होते.''

श्रीमद् वाल्मीकीय रामायणच्या उत्तरकांड (प्रक्षिप्त वर्ग १) मधे रामचंद्रांनी आवागमनीय पुनर्जन्माच्या आधारावरच एका कुत्र्याला न्याय प्रदान करीत त्याला मारणाऱ्या ब्राम्हणाला कालंजरचा मठाधीष बनविले. या घटनेचा वृतान्त असा आहे की, श्रीरामाच्या दरबारात कोणी तक्रार घेवुन आला नाही. लक्ष्मणाला एक कुत्रा उभा असलेला दिसला, त्यांनी कुत्र्याला सांगितले तुम्हाला काही सांगावयाचे असेल तर राजाला जाऊन सांगा. कुत्र्याने श्रीराम जवळ ब्राह्मणा-विषयी तक्रार केली की त्याच्या मारण्याने माझे डोके फुटले. श्रीरामाने ब्राम्हणाला बोलावुन मारण्याचे कारण विचारले असता ब्राम्हण म्हणाला 'मी उपाशी होतो. मी भीक मागण्यास निघालो असता हा कुत्रा माझा मार्ग रोखुन उभा होता. मी याला हटण्यास सांगितले परंतु तो बाजुला झाला नाही. भुक आणि कुत्र्याचा हट्ठ बघुन माझा राग अनावर झाला आणि मी याला मारले.' श्रीरामाने ब्राम्हणाला कालंजरचा मठाधीश बनविले. कुत्रा सांगतो की मी पुर्व-जन्मात कालंजरचा मठाधीश होतो. त्यामुळे मला या जन्मात कुत्रा व्हावे लागले. या वृतांतामधे कर्माला कोणतेही महत्व नाही. मठाधीश कीतीही चांगले कार्य करो त्याला कुत्राच व्हावे लागेल. या घटनेत आवागमनीय पुर्नजन्माची कल्पना (धारणा) छिन्न-भिन्न होते.

गोस्वामी तुलसीदासजी यांची काव्य-कृति 'रामचरित मानस' तर आवागमन धारणेने परिपूर्ण आहे. लपुन बालीला बाण मारल्या नंतर बाण मारणाऱ्या रामाला तो सांगतो,

''जेहि जोनि जन्मौ कर्म बस तहं राम पाद अनुरागङ्ं।'' (४-९-२ छ.)

पुर्नजन्मात श्रापचा प्रभाव सुध्दा पडतो. येथे कर्म गौण होते. नारदच्या श्रापामुळे रामाला मनुष्य शरीर धारण करावे लागले आणि प्रियतमा वियोग सहन करावा लागला. शंकराच्या गणांना रावण आणि कुम्भकर्ण यांच्या रूपात जन्म घ्यावा लागला. तेजस्वी राजा प्रतापभानुला ब्राम्हणाच्या श्रापामुळे आपला भाऊ, सहकारी, सेवक आणि सैन्यासह सर्वांना राक्षस रूपात जन्म घ्यावा लागला. (रामचरित मानस १-१७५ - १ ते ३) अगस्त्य मुनीच्या श्रापामुळे रावणचा राक्षस दुव शुक मुनि पासुन निश्चित रूपाला प्राप्त झाला होता. *(मानस ५-५६-६)*

धर्मशास्त्रात कर्म आणि पुर्नजन्म

स्मृति मधे कर्म आणि पुर्नजन्म याचे सविस्तर वर्णन उपलब्ध आहे. मनुस्मृति (१२.५४-६९) मधे आहे,

महापाप करणारे लोक पुष्कळ वर्षापर्यंत भयंकर नरकात राहून निम्नलिखित जन्म प्राप्त करतात. ब्रम्ह हत्यारा (ब्राम्हणाची हत्या करणारा) कुत्रा, डुक्कर, उंट, गाढव, कावळा (किंवा बैल), बकरी, मेंढा, हरीण, पक्षी, चांडाल (राक्षस) आणि पुक्कस या जन्मातुन निर्वाह करतो. मद्य प्राशन करणारा ब्राम्हण कीडे-मकोडे, पतंगे (कीटक), विष्टा खाणारे पक्षी, मांस खाणारे पशु यांचे विभीन्न जन्म प्राप्त करतो. बाम्हणाच्या सोन्याला चोरणारा ब्राम्हण लहान कीडे, सर्प, पाल, पाण्यातील जंतु, नाशक निशचर यांच्या योनित हजारो वेळा जन्म घेतो. गुरूवर्याच्या पत्नीचे अपहरण करणारा गवत, वेला, मांसभक्षी पशु, सर्प आणि वाघा सारख्या क्रुर पशुंच्या योनित शेकडो वेळा जन्म घेतो. जो व्यक्ति लोकांना मारतो तो कच्चे मांस खाणाऱ्याच्या योनित जन्म घेतो. निषीध्द (वर्ज्य) केलेले भोजन ग्रहण करणारा कीडा होतो. चोरी करणारे आपल्याच जातीच्या जीवांना खाणाऱ्या जीवाच्या योनित येतात (जसे मासोळी). जे लोक नीच जातीच्या स्त्रियांशी संभोग करतात ते प्रेत होतात. जो व्यक्ति बहिष्कृत लोकांसोबत एका विशिष्ट काळापर्यंत राहतो, जो दुसऱ्याच्या पत्नीशी संभोग करतो. जो ब्राम्हणाची संपत्ती (सोन्या व्यतिरिक्त) हिसकून घेतो तो ब्रह्म राक्षस होतो. जो व्यक्ति लोभवश रत्ने, मोती, मुंगे (प्रबाळ) या सारखे बहुमुल्य दगड चोरतो तो सोनार जातीत जन्माला येतो. धान्य चोरणारा ब्राह्मण उंदीर होतो. कांसा (पेला) चोरणारा व्यक्ती हंस पक्षांच्या रूपात जन्म घेतो. दुसऱ्याला पाण्यापासुन वंचित करणारा प्लव नामक पक्षी बनतो. मध चोर डंक मारणारा जीव बनतो. गोड रस (उस इत्यादि) चोरल्यास कुत्रा होतो. मांसाची चोरी करणारा चील (घार) बनतो. तेल चोरणारा तेलचट्टा कीडा तर मीठ चोरणारा झिली जीव आणि दही चोरणारा बगुला (बगळा) पक्षी बनतो. तागाचे वस्त्र, रेशम व कापसाचे वस्त्र चोरणारा क्रमानुसार तित्तर, बेडुक, क्रौंच पक्षीच्या रूपात जन्माला येतो. गाय चोरल्यावर गाढव, काकवी (चोटा) चोरल्यावर चमगादड (वटवाघुळ),

सुगंध चोरणारा चिचुंद्री, पाले-भाजी चोरणारा मोर, फळे व कन्दमुळे चोरणार वानर, भिन्न-भिन्न परिपक्क धान्य चोर साळू-तर कच्चे खाद्यान्न चोरणाऱ्याला शस्त्र (झाडीत राहणारा विशेष कीडा) च्या रूपात जन्म घ्यावा लागतो. आग चोरल्या नंतर बगळा, भांडी चोर गांधिलमाशी, हत्ती चोरणारा कोल्हा तर घोडा चोरणारा वाघ आणि स्त्री चोराला अस्वलच्या रूपात जन्म घ्यावा लागतो. पेयजल चोरी करणाऱ्याला चक्रवाक (चातक), वाहन चोराला उंट, पाळीव पशु चोराला बोकूड जन्म प्राप्त होतो. जो व्यक्ति दुसऱ्याची संपत्ती शक्तीने बळकावली किंवा जो त्या यज्ञ सामुग्रीला खातो जी अज्ञाप यज्ञात वापरण्यात आली नाही तो नीच योनिचा पशु होतो. ज्या स्त्रिया वर उल्लेखित चोरी करतात त्या सुध्दा महा-पापी असतात आणि त्यांना उपर्युक्त जीवांच्या पत्नीच्या रूपात जन्म घेतात.

मनुस्मृतिच्या या विवेचनापैकी अनेक गोष्टीचे समर्थन याज्ञव एकत्र स्मृति (३.२०६-२०८) सुध्दा करते. आवागमनचे समर्थक बहुधा या प्रमाणांना प्रस्तुत करतात. हिन्दीचे सन्माननिय साहित्यकार पंडीत अयोध्या सिंह उपाध्याय 'हरिऔध' यांनी 'सरस्वती' (अलाहाबाद) मधे या विषयावर क्रमवार लेख लिहलेत. स्मृतिंचे हे विवेचन सुध्दा बुध्दि आणि न्याय यांच्या कसोटीवर खरे उतरत नाही. जसे यात सांगितलेल्या सर्व शिक्षा नरकात राहुन प्राप्त होतील असा उल्लेख आहे. परंतु हा नरक नेमला कुठे आहे या बद्दल कोणतेही स्पष्टीकरण नाही. या दंडात जागतिक देहान्तर आहे. वाघ, ब्रम्हराक्षस, उंट, अस्वल, हंस पक्षी इत्यादि देहान्तरांचा नरकाशी काय संबंध ? या प्रकारच्या गोष्टी संदेहात्मक आहेत. अन्य प्रावधानही सुसंगत नाही. सोना चोरण्याचे अपराध करणाऱ्याला हजारो वेळा जन्म घेण्याची शिक्षा आहे परंतु सोन्याची कीती मात्रा असावी हे मात्र सांगण्यात आले नाही. दुसरीकडे गुरू-पत्नीच्या अपहरणाची शिक्षा शेकडो जन्मापर्यंत मर्यादित आहे. धर्मशास्त्रात या पापांच्या परिणामापासून बचावासाठी प्रायश्चित कर्म सांगण्यात आले. प्रायश्चित संभव आहे परंतु त्याची आवागमनीय पुनर्जन्माशी अनुकूलता सिध्द होत नाही. धर्मशास्त्रात पुनर्जन्मा विषयी प्रस्तुत प्रावधाना मधे एकरूपता आढळून येत नाही.

रोग आणि अपंगत्व पूर्व-जन्माचे फळ होय?

धर्मशास्त्र आणि आयुर्वेद चिकीत्सा ग्रन्थात रोग आणि अपंगत्वाला पूर्व जन्मीच्या पापाचे फळ म्हटले आहे. परंतु वेदाने याचीं पुष्टी होत नाही. अथर्ववेदच्या ८-७-३ या मंत्रात आहे की पापामुळे निर्मीत रोगाने ग्रस्त व्यक्तीच्या शरीराच्या प्रत्येक अंगाचे रोग वेल-गुल्मा द्वारे कापण्यात आले आहे.

डॉ. पांडुरंग वामन काणे लिहतात.

"मनु (९.४९-५२), वसिष्ठ (२०.४४), याज्ञ (३.२०९-२११), विष्णु (अ-४५), शातातप (१३-११ आणि २.१-३०,३२,४७), गौतम (अ.२०, पद्य), गौतम

(गद्य, मिता. याज्ञ. ३.२१६), स्मृत्यर्थ सार (पृ.९९,१००) यामधे त्या रोगाचे तसेच शारीरिक अवगुणांचे वर्णन आहे. ज्यामुळे पापी व्यक्ती मनुष्य-रूपात जन्माला आल्यावर ग्रस्त होतो. चरक-संहिता सारख्या वैद्यकीय ग्रंथाने सुध्दा हा विश्वास व्यक्त केला की, रोग पूर्वजन्मी केलेल्या. दुष्कर्माचे फळ होय. *(सुत्रस्थान, अध्याय १.११६)*

रोग किंवा शारीरिक अवगुण यांनी जे भिन्न-भिन्न दर्जाचे पापी लोक बाधीत होतात त्यांच्या विषयी स्मृति मधे पूर्णपणे एकमत नाही. "वसिष्ठ (२४.४४) आणि शंख (मिताक्षरा, याज्ञ ३.२१६) यांच्या मतानुसार ब्रह्म (ब्राह्मण) घातक कोढी होती. तर मनु (९-४९), याज्ञ. (३.२०९), विष्णु (४५.३) यांनी त्याला क्षय रोगाने (टी.बी.) पीडित होतो."

(धर्मशास्त्राचा इतिहास भाग ३ पृ. ११०८)

मनुस्मृति (५.१.६४.१६६) मधे आहे की, 'पति सोबत खोटा व्यवहार करून (कोणा दुसऱ्या सोबत व्यभिचार करणे) पत्नी या जीवनात तर निंदा व नालस्ती सोसते आणि (मृत्यु नंतर) कोल्ह्याच्या योनित जन्माला येते व कोढ सारख्या भयंकर रोगाने बाधित होते.

यांच्या शमनाचे उपायही धर्मशास्त्रात सांगितले आहे. यामधे कदली दान (सोन्याचे कदली वृक्ष तयार करून ब्राम्हणाला दान करणे) इत्यादि रोग आणि शारीरिक अपंगत्व यांच्या उत्पतीच्या या मान्यतेचे सहजच काही प्रश्न उपस्थित होतात. कर्म आणि पुनर्जन्माच्या या सिध्दांतावर विश्वास बाळगल्याने लोक मानवीय दु:खा विषयी निष्ठुर होतील आणि दीन-दुखी असहाय, रोगी आणि अपंग लोकांना सहकार्यास उत्सुक राहणार नाही. कारण दुख, समस्या विपत्ती हे तर पूर्व जन्माचे फळ आहे म्हणुन दुखी व्यक्तीला हे कष्ट भोगलेच पाहीजे. संभवत: याच मान्यतेला ओळखून महाभारत (शांती पर्व ३६.३८.३९) मधे स्पष्ट शब्दात सांगितले की, "मुका, कोड फुटलेला (बदरंग), अपंग, बुटका मनुष्य, नीच जातीचे लोक आणि जनेऊ (जानवे) धारण न करणाऱ्या व्यक्तीला दान देवु नये. अशिक्षीत ब्राम्हणालाही दान देणे अनुचित आहे. अयोग्य पध्दतीने केलेले दान आणि अयोग्य रूपाने घेतलेले दान हे देणाऱ्या व घेणाऱ्या दोहोसाठी घातक आणि विपत्तीपूर्ण आहे."

राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे सर संघचालक कु. सी. सुदर्शन म्हणतात की, लोकांचे कष्ट आणि पीडा बघुनच शुभ संकल्प (कार्य करण्याची इच्छा) निर्माण होते आणि मोठ्यात-मोठे कार्य साकार होते." *(नवभारत टाइम्स, नवी दिल्ली २२ आगस्ट १९९९)*

सुदर्शनांच्या या कथनाचा उद्देश (अभिप्रेत) काय असा आहे की, मोठ्यात मोठे कार्य करण्यासाठी लोकांचे दुख, दर्द कायम ठेवायला पाहीजे?

पं. माधवाचार्य शास्त्री आपल्या १४०० पानावर विस्तारीत 'धर्मविज्ञ दर्शन' या पुस्तकात लिहतात की, "मुस्लिम, ईसाई पुनर्जन्मात विश्वास न बाळगणाऱ्या व्यक्तीशी

वार्तालाप झाल्यावर जेंव्हा आम्ही त्याला हे विचारले की, जन्मजात आंधळा बाळ आम्ही बघितला. सनातन धर्मानुसार तर त्याचे अंधत्व पूर्व जन्मीच्या पापाचे फळ होय. परंतु पुनर्जन्म न मानणाऱ्या लोकांजवळ याला ईश्वराची चुक किंवा अन्याय या शिवाय दुसरे कोणते उत्तर होवु शकते तेव्हा मोठे-मोठे पादरी व मौलाना निसटण्याचा प्रयत्न करतात (अनुतरीत होतात)."

मजेदार गोष्ट तर ही आहे की पंडीतजी स्वताच आपल्या पुस्तकात उपरोक्त स्वकथित गोष्टीचे खंडण करतात. ते सांगतात बाळाची व्याधी ही मनुष्याच्या हलगर्जीपणाचा परिणाम होय. आजच्या वैज्ञानिक युगात हे तथ्य जास्त मजबुत होते. कुणाला कसा जन्म द्यावा व त्याची परीक्षा घ्यावी हे सर्वस्वी सर्व शक्तिमान ईश्वराच्या इच्छेवर अवलंबून आहे.

जैन धर्मात कर्म आणि पुनर्जन्म

जैन दर्शन कर्माला 'अणुंचा गोळा' मानतो. त्यांच्या नुसार जीवांच्या विविधतेचे मूळ कारण हेच कर्म होय. आत्मा (जीव) आणि कर्म यांचा संबंध अनादि आहे. कर्माचे नाते (संबंध) व्यक्तिचे शरीर, मन व आत्मा यांचेशी आहे. जीव आपल्या जुन्या कर्माला क्षय (नष्ट) करीत नविन कर्माची प्राप्ती करत असतो. जो पर्यंत प्राण्याचे पूर्व प्राप्त सर्व कर्म नष्ट होत नाही आणि नविन कर्माचे आगमन बंद होत नाही तो पर्यंत त्याची सांसारिक बंधनातून मुक्ति होत नाही. एक वेळ सर्व कर्म नष्ट झाल्यावर पुन्हा कर्म उत्पत्ती होत नाही. कारण या अवस्थेमधे कर्म-बंधनाचे कारण विद्यमान नसते. आत्माच्या या अवस्थेला कैवल्य अथवा मोक्ष म्हणतात. आचार्य उमास्वामी कैवल्या विषयी सांगतात की,

'सम्यग्दर्शन ज्ञान चरित्राणि मोक्षमार्ग' (तत्वार्थ सूत्र १-१)

अर्थात - सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, सम्यक चरित्र हीच मोक्षाची साधने होय.

जैन दर्शनानुसार कर्म आणि पुनर्जन्माचे अखंड नाते आहे. कर्माचे अस्तित्व मान्य केल्यावर त्याच्या फळस्वरूप परलोक अथवा पुनर्जन्माचे अस्तित्व स्वीकार करावेच लागते. जैन धर्म आत्माच्या आवागमनला मान्य करतो.

आचार्य कुन्दकुन्द यांनी 'पञ्चास्ति काय' नामक ग्रंथात सांगितले -

जो खलु संसारत्यो जीवो तत्तो दुहोदि परिणामो।
परिणामादो कम्मं कम्मादो होदि गदिसु गहि ॥२८॥
गदिमधिगदस्य देही देहादो इंदियाणि जायंते।
तेहिंदु विसयगहणं तत्तो रागो व दोसो वा॥२९॥
जायदि जीवस्सेंव भावो संसार चक्कवालम्मि।
इदि जिणवेदहि भणिदो अणादिणिधणो सणिधणतो वा॥३०॥

अर्थ - जो जीव संसारात स्थित आहे अर्थात जन्म आणि मरणाच्या चक्रात पडलेला आहे त्याचे राग रूपक आणि द्वेष रूपक परिणाम होतात. या फळाशी (परिणामाशी) नविन कर्म बांधले जातात. कर्मामुळे पुनर्जन्म घ्यावा लागतो. जन्म घेतल्याने शरीर मिळते. शरीरात इंद्रिये असतात. इंद्रियामुळे ज्ञानेंद्रियाचे ज्ञान होते. ज्ञानेंद्रियांचे ज्ञान झाल्याने इष्ट विषयांशी राग आणि अनिष्ट विषयप्रती द्वेष होतो. अशाप्रकारे संसाररूपी चक्रव्युहात पडलेल्या जीवात्माच्या भावाने कर्माचे बन्ध आणि कर्मबन्धाने राग-द्वेष रूपक भाव होत राहतात. हे चक्र अभव्यजीवाच्या तुलनेने अनादि अनंत आहे आणि भव्य जीवाच्या अपेक्षेने सान्त आहे.

(जैन धर्म, भारत वर्षीय दिगंबर जैन संघ, चौरासी मथुरा, सहावे संस्करण (आवृत्ती) पृष्ठ १५२-१५३)

जैन धर्माची ही मान्यता आहे की ज्या कर्माचे फळ एका जन्मात प्राप्त होत नाही त्या कर्माचे फळ पुनर्जन्मात भोगावे लागते. परंतु हे सत्य आहे की, जैन धर्मात हिन्दू आणि बौध्द धर्माप्रमाणे आवागमन व पुनर्जन्माची धारणा प्रबळ नाही.,

जैन कर्म साहित्या मधे सर्व जीवांचा समावेश चार स्वरूपात करण्यात आला आहे. १) मनुष्य २) तिर्थच ३) नरक ४) देव. मृत्यु नंतर प्राणी आपल्या कर्मानुसार या चार गति पैकी एका गतित जाऊन जन्म घेतो. (उत्तराध्ययन-सूत्र (सैक्रेड बुकआफ दि ईष्ट, भाग ४५ पृ. ९३-९७) तसेच सूलकृतांड़ मधे नरकाचा व त्यांच्या कष्टाचा उल्लेख आहे. जैन धर्म एक आचार (व्यवहार) प्रधान धर्म आहे.

जैन आगम ग्रन्थ आणि महापुराण इत्यादि चरित्र-गाथा मधे पुनर्जन्माचे अनेक लेख आहेत. आगमनच्या ६ व्या आणि ११ व्या अंगातील कथेत आहे की, मनुष्याच्या पुर्वजन्माच्या पापांचे प्रायश्चित अनेक भावी जन्मात करावे लागते. जैन अति नगण्य पाप-कर्माला सुध्दा मोठ्या अपराधाचे कारण मान्य करून कर्म दोषाच्या निवारण हेतु जीवातमाचे अनेक योनित जन्म घेणे मान्य करतात. पुष्पदंतच्या 'जंसहर चरिउ' मधे महाराज जसहर ची आई चंद्रमती द्वारे पीठाच्या कोंबड्याची बलि देण्याच्या फळस्वरूप उत्पन्न हिंसाभाव मुळे त्या दोघांना मोर, कुत्रा, मुंगुस, बकरी, मासोळी, रेडा, कोंबडा इत्यादि अनेक योनित जन्म घेवून नाना प्रकारचे कष्ट सहन करावे लागले, असे वर्णित आहे.

बौध्द धर्मात पुनर्जन्म

बौध्द धर्मात सुध्दा कर्म आणि पुनर्जन्माची कल्पना मिळते परंतु ती हिन्दु धर्मापेक्षा भिन्न आहे. बौध्द धर्माने योग द्वारे (परिणाम) पुनर्जन्म आणि कर्म-फळ च्या सिध्दांताला घेतले. आचार्य नरेन्द्र देव आपल्या प्रसिध्द 'बौध्द धर्म दर्शन' मधे लिहतात.

बौध्दांचा विश्वास आहे की सत्व (प्राण) अनेक जन्मात संसरण (विचरण करून) आपल्या कर्माचे फळ भोगतो, आणि तो अभिसभ्य द्वारा मुक्त होतो. बौध्द विश्वासाची ही मुळ भित्ति आहे.

कर्म गतिंचे आपेक्षक आहे. प्रत्येक जीव आपले मन: कर्म, चेतना आणि काय-वाक् यांचा परिणाम आहे. प्राण्यांचे सामुदायिक कर्म संवर्त-कल्पाच्या अनंतर (निकटस्थ) लोकाचे भ्रमण (विवर्तन) करते. कर्मच 'गृहकारक' आहे. कर्म आणि त्याच्या फळाचा निषेध करणे असत्य वृत्ति होय. प्रत्येक जीव आपल्या कर्माचा उत्तरदायी आहे. संसरण (संसार) संबंधी बौध्दांचा हा सिध्दांत आहे.

उपनिषद अनुसार आत्मा नित्य आणि लोकोत्तर आहे. बौध्द धर्म आत्म्याचा निषेध (खंडण) करतो. बौध्द धर्माची ही विचित्रता आहे की तो आगम कर्म आणि कर्म फळ यांचा स्वीकार करतो परंतु कारकचा (कर्त्या) निषेध करतो. *(पृ. २८४-२८६)*

बौध्द धर्म ईश्वर अस्तित्वाला नाकारतो. तो दुख, दुख समुदय, दुख निरोध आणि दुख निरोध मार्ग या चार सत्यांना प्राधान्य देतो. हिन्दु धर्मात असे नाही. तो ईश्वरवादी व अवतारवादी धर्म आहे. बौध्द धर्म आत्म्याचे अस्तित्व मान्य करीत नाही तर हिन्दु धर्म आत्मा अजर-अमर आहे असे मान्य करतो. बौध्द धर्मात केवळ मनुष्य योनितच पुनर्जन्माचे प्रावधान आहे. तो कर्माला पुर्व जन्माचे फळ मानीत नाही. त्याच्या दृष्टीत जीव-जगत पुर्व जन्माचे प्रतिफळ नाही.

तथागत बुध्दाने म्हटले "या शरीराला बनविणाऱ्याला शोधण्यास मला अनेक जन्म घ्यावे लागले कारण त्याचा पत्ता लागला नाही. आणि वारंवार जन्म घेणे दुखदायी आहे. परंतु हे शरीरकर्ता ! आता तुला बघितले. तु आता या शरीराला पुन्हा नाही बनवु शकणार ! शरीराची पुर्ण हाडे मोडलीत. जाडजूड वासा (शहतीर) तुटला आहे. मन (चित्त) निर्वाण (मोक्ष) च्या निकट पोहचू सर्व इच्छांना (वासना) नष्ट करून टाकले." *(धम्मपद १५३, १५४)*

'जातक कथा' मधे गौतम बुध्दाच्या ५५० जन्माची कहानीचे वर्णन आहे. बौध्द धर्मात स्वर्ग आणि नरक यांचा स्पष्ट उल्लेख आहे. हिन्दू धर्मातही ही संकल्पना आहे परंतु पशु, पक्षी, वृक्ष इत्यादिच्या स्वरुपात पुनर्जन्माचा आवागमनीय सिध्दांतावर इतका भर देण्यात आला की स्वर्ग व नरकाची संकल्पना झाकली गेली. गौतम बुध्द म्हणतात "चांगला मनुष्य या संसारातही आनंदी राहतो व परलोकातही सुखी होतो. त्याला दोन्ही लोकाचे सुख मिळते." *(धम्मपद १८)*

"कीत्येक लोक पुन्हा जन्म घेतात. पापी नरकात जातात तर सत्कर्मी स्वर्गात जे सांसारिक बाधापासून मुक्त आहेत ते निर्वाण पद प्राप्त करतात" *(धम्मपद १२६)*

'बौध्द धर्म दर्शन' सांगतो,

"जो दुख, दुखायतन आणि दुखानुषक्त यांना बघतो की हे सर्व दुख आहेत (सर्व मिंद दु:घ मिति पश्यति) तो दुखाची परीज्ञा करतो. परिज्ञात दुख प्रहीण असतो. अशा प्रकारे तो अवगुणांना आणि कर्माला दुख हेतुच्या रूपात बघतो आणि अवगुणांचे प्रहाण करतो. अवगुणांचे प्रहीण झाल्यावर पुनर्जन्माची प्रवृत्ती होत नाही." *(पृ. २२२)*

'मिलिंन्द प्रश्न' या बौध्द ग्रंथात मानवाचा मानवाच्या रूपात पुनर्जन्म कसा होतो याचे स्पष्टीकरण आहे. बौध्द धर्मानुसार जेंव्हा मनुष्य मृत होतो तेव्हा आत्मा सारखी कोणतीही वस्तु नाही जी शरीरातून निघुन दुसरा जन्म धारण करेल. जेव्हा मृत्यु होतो तेव्हा येथील पंचस्कन्ध येथेच राहतात आणि कर्मामुळे दुसरी प्रतिसान्धि होते. 'मिलिन्द प्रश्नात' याला स्पष्ट करीत जे विवरण आले आहे ते अशाप्रकारे आहे,

(तथागत बुध्दांने सांगितले) 'भन्ते ! असा जीव आहे काय जो या शरीरातून निघून दुसऱ्यात प्रवेश करेल?''

'नाही, महाराज.'

'भन्ते ! जर या शरीरातून निघुन दुसऱ्या शरीरात जाणारा कोणी नाही तर मग तो आपल्या पाप कर्मापासुन मुक्त झाला?'

होय महाराज ! जर त्यांचा जन्म झाला नाही तर तो अवश्य आपल्या पाप-कर्मा पासुन मुक्त झाला परंतु जर तो तरीही जन्माला आला तर तो मुक्त नाही झाला. जसे - महाराज, जर एखाद्या व्यक्तिने दुसऱ्याचा आंबा चोरला तर तो दंडाला पात्र होईल किंवा नाही?'

'होय, भन्ते ! होईल.'

'महाराज त्या आंब्याचे रोप तर त्याने लावले नव्हते ज्याला त्याने घेतले मग तो शिक्षेस पात्र कसा होईल?'

'भन्ते त्याच्या रोवलेल्या आंब्या पासुनच चोर ला-ही उत्पन्न झाला म्हणुन तो शिक्षेस पात्र होईल.'

'महाराज याच प्रमाणे एक पुरुष या शरीराने सत्कर्म आणि दुष्कर्म करतो. त्या कर्माच्या प्रभावाने दुसरे शरीर जन्म घेते म्हणुन तो आपल्या पापकर्मा पासुन मुक्त झाला नाही. जसे महाराज कोणी एका वातीशी दुसरी वात पेटविली तर काय येथे एक वात दुसरीशी संक्रमण (गमन) करते ?'

'नाही, भन्ते !'

'महाराज, याचप्रमाणे एका शरीरातून दुसऱ्या शरीरात काही न जाता पुनर्जन्म होतो. महाराज काय आपल्याला एखादा असा श्लोक आठवतो, जो आपण आपल्या गुरुवाणी ने शिकलात?'

'होय, आठवतो.'

'महाराज काय तो श्लोक आचार्याच्या मुखातुन निघुन आपल्यात घुसला?'

'नाही, भन्ते!'

'महाराज, याच प्रमाणे एका शरीरातून दुसऱ्या शरीरात काही न जाता पुनर्जन्म होतो.'

(पान ८९-९०)

कर्म आणि पुनर्जन्माचे धोरण तो पर्यंत कायम राहते जो पर्यंत निर्वाणचा साक्षात्कार होत नाही. परंतु जेंव्हा निर्वाणचा साक्षात्कार होतो तेव्हा कर्म आणि पुनर्जन्म थांबतात. जेंव्हा मोह-माया (मिथ्याज्ञान) नष्ट होते तेव्हा कर्म नष्ट होते. आणि पुर्नजन्मीचा परिणाम होणे बंद होते. आता पुनर्जन्म होत नाही. निर्वाण बौध्दधर्माचे अंतिम लक्ष आहे. अतिशय शांत व दुख-रोग रहित ही स्थिती आहे. (इतिवृत्तक, पान ३६), ही परम-सुखाची अवस्था आहे. (धम्मपद, १५, ८ (नित्वन परमं सुख) याला प्राप्त करून परम शांती होते. (थेरी गाथा १५) निर्वाण प्राप्त केल्याने आवागमन थांबते आणि जन्म-मृत्यु होत नाही. तेव्हा हे लोक व परलोक ही होत नाही. हेच दुखाचे अंत होय, (उदान पान१११), बौध्द धर्मात निर्वाण नंतर परिनिर्वाण विधान सुध्दा आहे. पंरतु हा निर्वाण, मोक्ष प्राप्ती सुकर (सोपी) नाही. स्त्रियासाठी तर ही अत्यंत कठीण आहे.

श्री रामधारी सिंह 'दिनकरजी' लिहतात - "केवळ बौध्दच नव्हे तर जैन धर्माचाही हाच विश्वास आहे की, मोक्ष सन्यासा नंतरच प्राप्त होवू शकते. हेच कारण आहे की, श्वेताम्बर पंन्था मंधे स्त्रिया भिक्षुणी होवू शकत होत्या. परंतु दिगम्बर-पन्थाच्या लोकांनी ही स्पष्ट घोषणा केली की, मुक्ति महीलांसाठी नाही. स्त्रियांनी मर्यादित धर्माचे पालन करावे म्हणजे पुढच्या जन्मात पुरुषाचा जन्म प्राप्त होवू शकेल. कारण मोक्ष प्राप्ती साठी किंवा मोक्ष लाभ निकट आल्यावर त्यांना पुरुष योनित जन्म घ्यावाच लागेल. सत्य गोष्ट ही आहे की, दिगंबर पंथात भिक्षुणीला नग्न रहावे लागते. या गोष्टीला दिगम्बर साधु सुध्दा उचित समजत नव्हते. परंतु मुक्ति सन्यासा द्वारेच मिळते हा उपदेश अत्यंत प्रभावी होता." *(संस्कृति के चार अध्याय पान १८१)*

सिख धर्मात आवागमन

भाई गुरुदासजी म्हणतात

पंच तत पंचीसि गुनि सत्रु मित्र मिलि देहि बणाई।
खाणी बाणी चलितु करि आवागउणु चरित दिखाई॥
चउरासीह लख जेनि उपाई ॥२॥

(जगत उतपत्ती, वारां ज्ञानरत्नावली, गुरुमुखी-नागरी लिपि. पुडी २)

या श्लोकाचा भावार्थ स्पष्ट करीत ते लिहतात,

"पाच तत्व आणि पंचवीस परस्पर विरोधी (शत्रु-मित्र) शरीराची रचना केली गेली आहे. चारही उत्पत्ती-स्त्रोतो (अंडज, जेरज, वाणी (परा, पश्यन्ति, मध्यमा, बैखरी) यांचा अन्तर्भुक्त करून आवाग प्रकारे ८४ लक्ष योनिज प्राण्यांची उत्पत्ती झाली ॥२॥" (हिन्दी

चौऱ्याऐंशी लक्ष योनिमधे मानव योनित जन्म घेणे उत्तम आहे.

(चउरासीह लख जोनि विचि उत्तमु जनमु सु माणसि देह' (भाई गुरुदासजी)

भाई गुरूदासजी म्हणतात शुरु शिवाय आवागमन पासुन मुक्ति होवू शकत नाही. बघा पउडी

''कीतडे अंन्हे आखीअनि केतडिआँ ही दिसन्नि काणे ।
केतडिआँ चुन्हे फिरनि कीतडे रतीआने उकताणे ।
कीतडे नकटे गुणगुणे कीतडे बोले बुचे लाणे ।
केतडिआँ गिल्हडगली अंगि रसडली वेणि विहाणे ।
दुंडे बाँडे केतड़े गंजे लुंजे कोढी जाणे ।
कीतड़े लूले पिंगुले कीतड़े कुब्बे होइ कुड़ाणे ।
कीतड़े खुसरे हीजड़े केतड़िआ गुंगे तुतलाणे ।
गुर पुरे विणु आवण जाणे ॥१८॥

(वारां ज्ञानरत्नावली, गुरुमुखी नागरी लिपि पउडी १८)

भावार्थ - ''कीती तरी आंधळे आहेत व कीतीतरी काने (तिरके) दिसतात. कीतीतरी मंद दृष्टीचे तर कीतीतरी रातआंधळे आहेत. कीतीतरी नकटे (नाक कापलेले), नाकात बोलणारे, बहेरे आणि कान रहित आहेत. कीत्येकांचे गळे सुजलेले आहेत आणि कीत्येकांच्या शरीरावर संधीस्थानावर गाठीचा रोग आहे. कीत्येक लोक लुळे, गंजे, हातरहित आणि कोढी आहेत. कीतीतरी लोक लुळे, कुबडे आणि फेंगडे आहेत जे कष्टात राहत आहेत. कीत्येक हिजडे तर कीत्येक गूंगे (मूके) आणि तोतरे बोलणारे आहेत. पूर्ण-गुरु च्या शिवाय हे सर्व आवागमच्या चक्रात पडलेले राहणार.'' *(अनुवाद डॉ. जोध सिंह)*

भाई गुरुदासजी यांच्या मतानुसार गुरु पुर्णब्रह्मची प्रतिमूर्ति अव्यक्त आणि अविनाशी आहे. गुरु शब्द (शरीर नाही) परब्रह्म आहे जो, सत्संगतिच्या जागी निवास करतो. जो सच्चा गुरुला बघतो त्याने जणु परमात्माला बघितले. गुरु ग्रन्थ साहिब मध्ये आहे.

'इक बिन दुसर सो न चिनार ॥'

अर्थ - ''एका परमेश्वरा शिवाय अन्य कोणालाही मान्य करू नये.''

''प्राज पाकीओ पाहिन कह परसत
कछु कर सिध न आई ॥१॥'' **(शब्द हजारे, पान १०)**

अर्थ - दगडांना स्पर्श करून-करून हात थकलेत
परंतु हाताला यश प्राप्त झाले नाही.

केवळ एकाच ईश्वराची आराधना आणि भक्ति ने आवागमनचा चक्रव्यूह समाप्त होवू शकतो आणि मनुष्याला मुक्ति मिळते.

गुरुनानकजी म्हणतात

प्रभु विष्णु दुजा को नहा...
मंधिरि प्रभु आराधणा
बहुड़िन जनमड़ी आह ॥१०॥ **(बारहमाहा मांझ)**

अर्थ - एकमात्र प्रभु शिवाय दुसरा अजुन कुणी नाही...

ज्यांनी त्या स्वामीची आराधना केली ते

(आत्मा) (पुनर्जन्मात) जन्मात पडली नाहीत.

प्रभु स्मरण शिवाय दु:खाचा (कष्ट) अंत नाही, तसेच पुन्हा-पुन्हा जन्म घेण्याच्या घोर कष्टाचाही अंत होवू शकतो. गुरुनानकजी चे विधान आहे की,

"कहु नानक हरि भजु मना।
अंति सहाई होई ॥३२॥
जनम-जनम भरमत फिरिओ
मिटिओ न जम को त्रासु
कहु नानक हरि भजु मना." **(गुरु ग्रन्थ साहिब, सलोक महला ९)**

अर्थ - मना ! हरिचे स्मरण कर जो तुझी अंत

सहायता करेल. जन्म जन्मांतरात भ्रमण करीत राहिला.

यमाची भिती गेली नाही. मना ! हरी स्मरण कर.

बिलावलु महला १ मध्ये आहे

मनु मदंरु तनु वेस कलंदरू घट ही तीर थि नावा ॥
एक सबदु मैरै प्राजि बसतु है बाहुड़ि जनमि न आवा ॥१॥

(गुरु ग्रन्थ साहीब)

अर्थ - मन हे मंदिर आहे आणि शरीर फकीराचा वेश आहे. मी मन-मंदीरातच तिर्थ-स्नान करतो. एक गुरु उपदेश माझ्या प्राणात वास करतो। यामुळेच मी पुन्हा जन्म घेणार नाही. (टीकाकार ज्ञानी नारायण सिंह)

स्वामी दयानंद सरस्वती
आणि आवागमनीय पुनर्जन्म

पुराणांना प्रमाण न मानणारे व तशी शिकवण देणारे महर्षि दयानंद सरस्वती ब्रह्म पुराणचा स्वनिर्मित श्लोक याच्या प्रमाणात प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करतात.[1] या श्लोकात नरकाची कल्पना आहे. हा श्लोक महर्षिंच्या अर्थ-निर्दशना सह प्रस्तुत करीत आहोत.

"सर्वे ते नरकं यान्ति दुष्टवा कन्यां रजस्वलाम् ।"

अर्थ - त्या रजस्वला (आर्तव आलेली स्त्री) ला बघून तीची आई, बाबा, भाऊ, मामा आणि बहीण सर्व नरकात जातात.

(सत्यार्थ प्रकाश, चतुर्थ समुस्त्लास, पान ५६, आवृत्ती एप्रील १९८९)

याच समुल्लास मधे परलोक सुखासाठी मनुस्मृतिच्या श्लोकाद्धारे उपाय सांगण्यात आला आहे. (पान ७३). स्वामी दयानंदांनी 'परलोक' शब्द लिहिल्यावर 'अर्थात परजन्म' असे लिहले आहे, पुनर्जन्म नव्हे. मनुस्मृति चे त्यांनी नमूद केलेले श्लोक परलोकाच्या सफलतेवर केंद्रित आहेत. हिन्दू धर्मग्रंथ मानव योनिला सर्वात श्रेष्ठ सांगतात आणि मनुष्य योनि प्राप्त होणे हे मोठे भाग्य समजतात. प्रश्न हा आहे की, मग येथे कोणत्या 'परजन्माची' चर्चा आहे ? अर्थातचं हा परजन्म मनुष्याचे पारलौकीक जीवनच होय. वेद आणि अन्य कांही धर्मग्रन्थ याच तथ्याची पुष्टी करतात, आवागमनीय पुनर्जन्माची नव्हे.

पारलौकीक जीवनाची यशस्विताच मोक्ष आहे. याची प्राप्ती या लोकात ईश-मार्गदर्शनावर आचरणाद्धारेच शक्य आहे. अज्ञानता आणि मिथ्याज्ञान व मोह-मायेच्या त्यागानेच सत्य मार्गावर आचरणाचे सौभाग्य प्राप्त होवू शकते.

स्वामी दयानंद सरस्वती आपली महत्वपूर्ण रचना 'ऋग्वेदादिभाष्टभूमिका' मधे 'मुक्तिविषय:' शीर्षक अंतर्गत अध्यायात गौतमाचार्य्थाच्या न्यायशास्त्र चे प्रमाण प्रस्तुत करून लिहितात "जेव्हा मिथ्याज्ञान अर्थात अविद्या नष्ट होते तेंव्हा जीवाचे सर्व दोष (अवगुण) नष्ट होतात, अर्थात अधर्म, अन्याय, विषयासक्ति इत्यादिची वासना सर्व काही विलग्न होतात. (दूर होतात), त्यांच्या नाश पावण्याने (जन्म) अर्थात् पुन्हा जन्म होत नाही. तो न झाल्याने सर्व कष्टांचा (दु:ख अभाव निर्माण होतो. दु:खाच्या अभावाने पूर्वोक्त परमानंद मोक्षात अर्थात संपूर्ण दिवसासाठी परमात्मा सोबत आनंदच आनंद भोगने शिल्लक राहते. यालाच मोक्ष म्हणतात ॥१॥" *(दयानंद ग्रंथमाला द्वितीय, खंड पान ४४)*

---

१) चतुर्दश समुल्लास : चा समीक्षा क्रम ८ मधे सुध्दा स्वामी दयामंदांनी पुराण-वचन ला प्रमाण च्या रूपात प्रस्तुत केले आहे.

"जेव्हा ज्ञानाने मिथ्याज्ञानाची निवृत्ति होते तेंव्हा जीव बन्धन मुक्त (मोह) होवुन मोक्षाला प्राप्त होतो ॥३॥" *(उक्त पान नं. ४३९)*

स्वामीजी पुढे लिहतात की, "पूर्व प्रसंगापासून अभिप्राय हा आहे की मोक्ष प्राप्तीची इच्छा सर्व जीवांनी करायला हवी. (यदन्तरा) जो आत्म्याचा सुध्दा अंर्तयामी आहे त्यालाच ब्रह्म म्हणतात. आणि तोच अमृत अर्थात मोक्षस्वरूप आहे. आणि जसा तो सर्वांचा अर्न्तयामी आहे तसा त्याचा अर्न्तयामी कोणीही नाही, परंतु तो आपला अंर्तयामी स्वत:च आहे. अशा प्रजापति परमेश्वराच्या व्याप्तिस्वरूप सभास्थानला मी प्राप्त व्हावे. आणि या संसारात जे पूर्ण विद्वान ब्राम्हण आहेत त्यांच्या मधे यश-कीर्तिला प्राप्त व्हावे तसेच (राज्ञां) क्षत्रिय (विशां) अर्थात व्यवहारात चतुर (चालाख) लोकात यशस्वी व्हावे. हे परमेश्वर ! मी यशाचा कीर्तिरूप होवून आपणास प्राप्त होवू इच्छितो ! आपण ही कृपा करून मला सदा आपल्या निकट ठेवा. ॥७॥" *(उक्त पान नं. ४४४)*

स्वामीजींनी कळत नकळत मोक्षाला ही वर्ण व्यवस्थेशी जोडले. एकीकडे ते सांगतात की मुक्त जीवाची श्रेष्ठ कामना (अभिलाषा) परमेश्वराचे सभास्थान व त्याचे निकट राहण्याची आहे. तर दुसरीकडे छान्दोत्र्य उपनिषदचा एक श्लोक (य यते ब्रह्मलोके...) चा भाषार्थ स्पष्ट करीत हे सुध्दा सांगतात की, "जे मुक्त पुरुष असतात ते ब्रह्मलोक अर्थात परमेश्वराला प्राप्त होवुन सर्वांच्या आत्मरूपी परमेश्वराची उपासना करीत त्याच्याच आश्रयाने राहतात. याच कारणास्तव त्यांचे येणे-जाणे सर्व लोकलोकान्तरात होते. त्यांच्यासाठी कोणताही अडथळा नसतो. त्यांची सर्व कामे पूर्ण होतात कोणतेही कार्य अपूर्ण राहत नाही." *(उक्त पान नं. ४४४)*

स्वामीजींच्या या कथनाचा स्पष्ट अर्थ हा निघतो की मुक्त जीवाची[१] लोकलोकान्तरात ये-जा चालू असते, आणि तो विषयासक्ति वगैरे बंधनापासुन मुक्त होत नाही. स्वामीजी याच पानावर नमूद करतात की मनुष्याला परमेश्वराच्या सानिध्याचा अत्यंत आकांक्षी असायला पाहीजे, आणि मुक्त पुरुष सुखस्वरूप (स्वर्ग लोक) ब्रह्म लोकास प्राप्त होतात. हा विरोधा भास आहे की, मुक्ति नंतरही जीवात्मा भ्रमण करीत राहते येथपर्यंत की त्याची सांसारिक कार्याशी संलग्नता सुध्दा होवु शकते. कारण प्रत्येक मानविय आत्मा स्वाभाविकपणे आपल्या संततीचे कल्याण व प्रगतिची इच्छुक असणार तसेच आपली सर्व कार्ये पूर्ण करवेल. त्यातच आश्चर्याची गोष्ट ही आहे की, एकीकडे मृतकच्या आत्म-शांती साठी धार्मिक कार्याचा (श्राध्द) आर्य समाजाचे ग्रंथ इन्कार करतात तर दुसरीकडे आत्म्याला बोलावण्याच्या कथित ज्ञानाचे समर्थन ही करतात. वास्तविक मुक्त-आत्म्याला बोलावले जाते असे सांगणे मिथ्या ज्ञान होय. जेंव्हा आत्मा मुक्तिला प्राप्त झाला आणि सर्वशक्तिमान ईश्वरानेच त्याला मुक्त केल्यावर काय कोणी

---

१) स्वामीजीने वारंवार 'मुक्त-पुरुष' लिहले आहे. हा शब्द आशंकीत करणारा आहे. काय 'स्त्री' ला मुक्तिचा अधिकार नाही?

दुसरा तीला आपल्या नियंत्रणात घेवू शकतो ? कदापि नाही. मग जर कुणी हे सांगत असेल (जसे स्वामी दयानंद म्हणतात) की मुक्त पुरुष परमेश्वराला प्राप्त होवुन आणि त्याची उपासना भक्ति केल्यामुळे लोक-लोकान्तरात ये जा करीत असतो (मुक्त जीव आनंदपूर्वक स्वतंत्र विचरत असतो सत्यार्थ प्रकाश, ९ वा समुल्लास पान १७०) सर्वथा (पूर्णपणे) अज्ञानपुर्ण आणि मिथ्या कथन आहे. कारण यात मुक्त पुरुषाला अशी मुक्ति मिळते की, तो परमेश्वराचा तेजस्वी प्रताप प्राप्त करून घेतो. हे नितांत भ्रामक तथ्य-निष्कर्ष आहे, ज्याचा यथार्थतेशी (वास्तविकता) काडीमात्र संबंध नाही. प्रकृति, जीव आणि परमात्मा यांना एक समान ठरविणे (सत्यार्थ प्रकाश ८ वा समुल्लास पान १४८) कोणत्याही दृष्टीने सत्य व उचित नाही.

स्वामी दयानंदजी यांच्या वैचारिक मतात विरोधाभासी तथ्यांचा अभाव नाही. ते लिहितात - "सर्व मनुष्यांनी हे जाणले पाहीजे की तोच परमेश्वर आमचा बन्धु अर्थात दुःखांचा नाश करणारा, सर्व सुखांचा निर्माता आणि पालनकर्ता आहे. तोच सर्व कार्यांना पूर्ण करतो आणि सर्व प्रदेशांना (लोकांना) जाणतो की ज्यात देव अर्थात विद्वान लोक मोक्षाला प्राप्त होवून सदा आनंदात राहतात. आणि ते तिसरे धाम अर्थात शुध्द सत्त्व सहित (पवित्र चैतन्य बरोबर) होऊन सर्वोत्तम सुखात सदा बेधडकपणे (अगदी निरंकुश) रमण (भ्रमण) करतात. ॥२॥"

(दयानंद ग्रंथमाला, द्वितीय खंड पान ४४६)

यावरून कळते की, 'देवंच मोक्षाचे अधिकारी आहेत आणि त्यांना परमेश्वराचे सानिध्यात राहण्याचाच नव्हे तर 'सर्व लोकात' सदा आनंदाने, स्वच्छंदतेने रमण करण्याची संधी प्राप्त आहे. या कथनाने अगदी स्पष्ट होते की मुक्त जीवात्मा सदा आनंदित राहतो. त्याला सदा आनंदी व्हायलाच पाहिजे परंतु स्वामीजीच्या मता-नुसार शाश्वत मुक्ति होत नाही आणि हा आनंद नेहमी साठी नाही. सत्यार्थ प्रकाशाच्या ९ व्या समुल्लास मधे लिहितात की "ते मुक्त जीव मुक्तिला प्राप्त होवून ब्रह्ममधे आनंद भोगुन पुन्हा महाकल्प (मोठी सकाळ) नंतर मुक्ति सुखाला सोडून संसारात येतात. ही गोष्ट कधीच होवु शकत नाही. कारण आधी तर जीवाचे सामर्थ्य, शरीराचे पदार्थ आणि साधन सिमित (मर्यादित) आहेत मग त्याचे फळ अनन्त कसे होवू शकेल ? अनंत आनंद भोगण्याचे असीम सामर्थ्य, कर्म आणि साधन जीवा मधे नाही म्हणुन अनन्त सुख भोगु शकत नाही.

(आवृत्ती एप्रील १९८९ पान १७२, १७३)

या संदेहात्मक कथनातुन भ्रामक शब्दांना अगदी सहजतेने हटविले जावू शकते. सामर्थ्य इत्यादि गोष्टी हास्यास्पद, अनुचित आणि अर्थहीन आहेत. मुक्ति किंवा मोक्ष नेहमीसाठी नसुन केवळ काही काळासाठी सुटका अगर मुक्तिला काही अर्थच राहत नाही. मग ती मुक्ति मोक्ष रूपी मुक्तिच राहत नाही आणि हे नश्वर संसार नित्य राहणारे होते. दयानंद स्वामीनी सत्य, रज आणि तम या तीन तत्वांना शाश्वत मानले आहे आणि यानांच मनुष्याचे उत्पत्ती म्हटले आहे. जन्म व मृत्युची अनवरत श्रृंखलेची कल्पना बुध्दि आणि विवेकच्या विपरीत आहे. हे एक मिथ्या तथ्य आहे की, जो एक वेळा जन्म घेईल तो पुन्हा-पुन्हा जन्माला येईल.

वस्तुत: ती गोष्ट व्यावहारिकतेचे स्वरूप अंगिकारत असते की, एका सत्याला लपविण्यासाठी डझनांनी खोटं बोलावं लागते. पुनर्जन्माची संकल्पना आणि त्याची अटळ मान्यते प्रति डोळे झाक करण्यास जे - जे तथ्य घडण्यात आले त्यांनी त्यालां अधिकच पेचात फसविले. परंतु तरीही सत्य लपू शकले नाही. अंतत: सत्य लपविण्यास केलेले प्रयत्न व्यर्थ गेले.

आर्य समाजाच्या संस्थापकाने 'ऋग्वेदादि भाष्यभूमिका मधे पुनर्जन्म विषयी अध्यायात पुनर्जन्माच्या समर्थनात ऋग्वेदच्या १० व्या मंडळाचे दोन मंत्र (५९:६,७) प्रस्तुत केलेत या पैकी मंत्र नं. ७ तोच आहे. ज्याचा उल्लेख डॉ. सत्यदेव वर्मा यांनी आवागमनीय पुनर्जन्म नव्हे तर केवळ पुर्नजीवन (फक्त एक वेळचे जन्म) च्या समर्थनात केला आहे.

ही दोन्ही मंत्रे येणे प्रमाणे आहेत,

असुनीते पुनरस्मासु चक्षुः पुनः प्राणमिह नो धेहि भोगम्।
ज्योक पश्येम सूर्यमुच्यरन्तमनुमते मृळ्या न स्वस्ति ॥६॥
पुनर्नो असुं पृथिवी ददातु पुनर्द्यौर्दिवी पुनरत्नरिक्षम।
पुनर्नस्सोमस्तन्वं ददातु पुनः पूषा पथ्यां या स्वस्ति ॥७॥

उपरोक्त मंत्राचा भावार्थ (अभिप्राय) स्वामी दयानंद सरस्वती यांच्या शब्दात "हे सुखदायक परमेश्वर ! कृपा करून पुनर्जन्मात आमचे दरम्यान उत्तम नेत्र इत्यादि सर्व इंद्रिये निरूपण करा. आणि प्राण अर्थात मन, बुध्दि, चित्त, अहंकार, बळ, पराक्रम इत्यादि ने युक्त शरीर पुनर्जन्मात करा. हे जगदीश्वर ! या संसार अर्थात या जन्मात आणि पर जन्मात आम्हाला श्रेष्ठतम वस्तु उपभोगास प्राप्त होवो. असेच हे भगवंता ! आपल्या कृपेने सूर्यलोक प्राण आणि आपणास आत्मैक्य ज्ञान (विज्ञान) व प्रेमाने सदा बघत रहावे. हे अनुमते सर्वांना मान देनेहारे ! सर्व जन्मात आम्हाला सुखी ठेव, ज्यामुळे आम्हा सर्वांचे कल्याण हो.

हे सर्व शक्तिमान ! आपल्या अनुग्रहाने (दयेने) आमच्या साठी वारंवार पृथ्वी प्राणाला, प्रकाश चक्षुला आणि अंतरिक्ष स्थानादि अवकाशाला देत रहा. पुनर्जन्मात सोम म्हणजे (अर्थात) औषधाचा रस आम्हा सर्वांना उत्तम शरीर देण्यास अनुकूल असावा. तसेच पुष्टी करणारा परमेश्वर कृपा करून सर्व जन्मात आम्हाला सर्व दु:ख निवारण करणारी पथ्यरूप स्वस्ति (कल्याण) प्रदान कर."[१] *(दयानंद ग्रंथमाला पान ४६२)*

सार्वदेशिक आर्य प्रतिनिधि सभा येथून प्रकाशित 'ऋग्वेद हिन्दी भाष्य' मधे वर्णित या मंत्राचे पदार्थ आणि 'भावार्थ:' वैद्यनाथ शास्त्रीनी केलेल्या अर्थ-निदर्शनाच्या प्रकाशात अवलोकन करूया.

१) वाक्याच्या मधात आलेले संस्कृत शब्द येथे नमूद केलेले नाही.

पदार्थ : हे प्राण विद्याविद ! आमच्या शरीरात पुन्हा दृष्टि, पुन्हा प्राणाला धारण करा. आम्हाला भोग (ऐश्वर्य) भोगण्याचे सामर्थ्य द्या, लांब काळापर्यंत सूर्याचे उगवणे बघावे. हे अनुमति देणाऱ्या ! आम्हाला सुखाने आनंदी कर.

भावार्थ : हे प्राण विद्याविद् ! आमच्या या शरीरात आपण परत (पुन्हा) दृष्टि आणि प्राणशक्ति द्या. आम्हाला भोग-वस्तुंचा उपभोग घेण्याचे सामर्थ्य दे. आम्ही चिरकाल पर्यंत उदय होत असलेल्या सूर्याला बघावे. हे उत्तममति वाल्या ! आम्हाला सुखाने आनंदीत ठेव.

पदार्थ : मृत्यू पश्चात जन्मान्तरात देवी भूमि आम्हाला पुन्हा प्राणशक्ति देते, धुलोक पुन्हा प्राणशक्ति देते आणि अंतरिक्ष सुध्दा पुन्हा प्राणशक्ति देतो. परमेश्वर पुन्हा शरीर देतो, सर्वांचा पोषक वायु आम्हाला पोषण देवो, जी सरस्वती (वाग्) आम्हाला वाक्शक्ति (वाणी) प्रदान करते.

भावार्थ : मृत्यु नंतर पुन्हा जन्म घेत असता भूमि, द्युलोक आणि अंतरिक्ष प्राणशक्ति देतात तसेच वाक्शक्ति वाक् देते आणि भगवंत या सर्वांने युक्त शरीर देतो.

(पान नं. ७०३, ७०४)

ऋग्वेदच्या उपरोक्त मंत्राचे भाषार्थ आणि भावार्थ जे आर्य समाजाचे संस्थापक आणि एक आर्य समाजी विद्वान पंडिताने केले त्यात साम्य नाही. दयानंद स्वामीनी भाषार्थामधे मंत्रांना आवागमनीय पुनर्जन्माशी जोडले तर, वैद्यनाथ यांनी पुर्नजीवन कडे निर्देशित केले. वेदांमधे आवागमन आणि पुनर्जन्म नसल्यामुळेच भाषार्था मधे उलट क्रम किंवा अडचण दिसुन येते.

स्वामी दयानंदांच्या भाषार्था मधे समानता नाही. कधी ते एकाच मंत्राचे भिन्न-भिन्न अर्थ लावतात. यजुर्वेदच्या एका मंत्राचा (४:१५) भावार्थ एका जागी 'परलोक चे सुखाशी' संबंधीत आहे, तर दुसऱ्या जागी इहलोक जीवनाशी, मंत्राच्या अन्य निष्कर्षात ही बरेच अंतर (फरक) आढळून येते. या ! या मंत्रालाही पडताळून बघूया.

''यजुर्वेद भाषा भाष्य'' मधे या मंत्राचा पदार्थ आणि भावार्थ: अशा प्रकारे दिला आहे.

पदार्थ : ''ज्याच्या संबंधाने व दयेने मला आत्मैक्य ज्ञान साधून देणारे मन, वय पुन्हा-पुन्हा प्राप्त होते, मला शरीराचा आधार प्राण पुन्हा प्राप्त होते. सर्वात व्याप्त, सर्वांच्या अंर्तमनातील सर्व गोष्टींना जाणणारा परमात्माचे ज्ञान प्राप्त होते, मला बघण्यासाठी (नेत्र) डोळे प्राप्त होतात आणि शब्द ग्रहण करणारे कान प्राप्त होतात. तो हिंसा करण्यास अयोग्य शरीर अथवा आत्माची रक्षा करण्यास आणि शरीराला प्राप्त होणारा अग्नि अथवा विश्वाला प्राप्त होणारा परमेश्वर आम्हाला निन्दित पापाने उत्पन्न झालेल्या दु:ख अथवा दुष्कर्मा पासुन पालन करतो.

भावार्थ : या मंत्रात श्लेषालंकरा आहे. जेंव्हा जीव झोप घेणे अथवा मरण इत्यादि कार्याला प्राप्त होतो तेंव्हा जे-जे मन इत्यादि इंद्रिय नष्ट झाल्या समान होवुन पुन्हा जागृती अथवा जन्मान्तर मधे जी कार्य करण्याची साधने प्राप्त होतात ते इंद्रिय ज्या विद्युत अग्निच्या संबंधामधे परमेश्वराची सत्ता अथवा व्यवस्थेने शरीरधारी होवून कार्य करण्यास समर्थ होतात.

मनुष्यासाठी योग्य आहे की, जो तो चांगल्या प्रकारे सेवन केलेला जाठराग्नि सर्वांची रक्षा करीत आणि जो उपासना केलेला जगदीश्वर पापरूप कर्मापासून वेगळे करून धर्मात प्रवृत्त करून पुन्हा पुन्हा मनुष्य जन्माला प्राप्त करवून दुष्टाचार अथवा दुःखापासुन पृथक करून या लोकात अगर परलोकाच्या सुखाला प्राप्त करवितो तो का बरे उपयुक्त आणि उपास्य होवु नये.''

(यजुर्वेद भाषाभाष्य पान ११९)

'ऋग्वेदादिभाष्य भूमिका' मध्ये उपरोक्त मंत्राचा भाषार्थ असा आहे.'

हे सर्वज्ञ ईश्वर ! जेंव्हा - जेंव्हा आम्ही जन्म घेवु तेंव्हा-तेंव्हा आम्हाला शुध्द (पवित्र) मन, पुर्ण-आयु, आरोग्य, प्राण, कुशलतायुक्त जीवात्मा, श्रेष्ठ चक्षु आणि श्रोत्र प्राप्त होवो. जो विश्वात विराजमाण ईश्वर आहे तो सर्व जन्मात आमच्या शरीराचे पालन करो. सर्व पाप-कर्मांना नष्ट करणाऱ्या, आपण दुष्कृत्य आणि सर्व दुःखा पासुन पुनर्जन्मात आलिप्त ठेवा.''

(दयानंद ग्रंथमाला भाग २ पान ४६३)

आता हे तर आर्य-समाजाचे विद्वानच सांगु शकतील की एकाच मंत्राच्या अर्थात स्वामी दयानंदांच्या रचनेत भिन्नता का आहे. वास्तविकता तर ही आहे की हा मंत्र पुनर्जीवनाशी संबंधीत आहे (न की पुनर्जन्माशी) जसे की डॉ. सत्यदेव वर्मा यांचे मत आहे आणि यांच्या मताची पुष्टी पंडीत सातवलेकरांच्या मंत्र-व्याखेवरून ही होते.

आर्य समाजाच्या संस्थापकांनी अगदी योग्य सांगितले, ''न्याय त्याला म्हणतात की जो जसे कर्म करेल त्याला तसेच फळ द्यावे.'' (दयानंद ग्रंथमाला, भाग २, वेदोपत्तिविषय पान २५७) स्वामी दयानंद यांचे अनुसार प्रथम सृष्टिच्या आरंभी परमात्माने अग्नि, वायु, आदित्य आणि अंगिरा या मनुष्य शरीर धारण केलेल्या ऋषिं द्वारे वेद ज्ञानाचा प्रकाश केला. (ऋग्वेद भाष्य भूमिका पान १९) 'सत्यार्थ प्रकाश' मधे ते स्पष्टपणे सांगतात, ''प्रथम सृष्टिच्या आरंभी परमात्माने अग्नि, वायु, आदित्य आणि अंगिरा या ऋषि मनुष्यांच्या आत्म्यामध्ये एक-एक वेद विकसीत केला. *(आवृत्ती एप्रील १९८९ पान १४४)''.*[1]

स्वामीजी म्हणतात, या चार पुरुषांचे असे पुर्वपुण्य होते की त्यांच्या हृदयात वेद-ज्ञान विकसीत केले गेले. परंतु जेंव्हा हे ऋषि सृष्टिच्या आरंभी उत्पन्न झाले तर मग यांचे पूर्व-पुण्य कोठून आले ? याचे उत्तरात दयानंद स्वामी म्हणतात ''जीव (आत्मा), जीवाचे कर्म आणि स्थूल जगत हे तीन्ही अनादि आहेत, जीव आणि कारणजगत रूपाने अनादि आहे तर कर्म आणि स्थूल कार्य्यजगत प्रवाहाने अनादि आहे. याची व्याख्या सप्रमाण पुढे लिहिली जाईल.''

(दयानंद ग्रंथमाला भाग २ पान २५७)

---

१) वेदतर चार आहेत. परंतु शतपथ ब्राह्मण (११.५.८.१-४) मधे आहे की, अग्नि पासुन ऋग्वेद, वायु पासुन यजुर्वेद आणि सुर्यापासुन सामवेद नंतर या तीन्ही वेदा पासुन क्रमशः तीन व्याहतिथां (भूः भुवः, सुवः हा मंत्र) उत्पन्न हुयी यात अंगिरा आणि अथर्ववेद दोहो चाही उल्लेख नाही. मनुस्मृति (१:२३) मधे असाच निष्कर्ष आहे. वेद, ब्राम्हण ग्रंथ अथवा अन्यल कुठेही चार ऋषि पासुन चार वेदाच्या प्रकाशनाचा उल्लेख नाही.

वास्तविक अशा प्रकारचा अनादिवाद मनुष्याला बौध्दिक धुंधवाद (मंदबुध्दि) च्या खोल दरीत टाक़तो. जेथुन वास्तविकतेचे अवलोकन (बघणे) तो करू शकत नाही. इतकेच नव्हे तर ज्या सप्रमाण व्याख्येचा उल्लेख स्वामीजी ने केला ती व्याख्या पुढे कुठेही मिळत नाही हे विशेष अशा स्थितीत त्यांच्या या कथनावर अगदी सहजतेने प्रश्नवाचक चिन्ह लागते, "पाप-पुण्या शिवाय श्रेष्ठ, मध्यम आणि नीच शरीर आणि बुध्दयादि पदार्थ कधीही मिळु शकत नाही."
(पुनर्जन्म विषय: ऋमामू)

तात्पर्य दयानंद स्वामीच्या विचारात स्थिरता नाही. कधी काही सांगितले तर कधी काही वर उल्लेखित कथनामधे आम्ही बघितले की, स्वामीजी सृष्टिचे आदि (आरंभी) चार ऋषिंचे पूर्व पुण्य कोठून आले हे सांगण्यात असमर्थ ठरलेत." याची व्याख्या पुढे येईल हे सांगून मोकळे झाले. (प्रलया पर्यंत सप्रमाण व्याख्या कुठे आहे शोधत रहा)

इतकेच नव्हे स्वामीजीनी अनेक तथ्यांना वेडे-वाकडे करून भ्रमित केले. एकीकडे ते पाप-पुण्याचा आरंभ वेद ज्ञाना-पासुन मानतात, ज्यांच्या विषयी त्यांचे म्हणणे आहे की, मानव-जीवनाचे पाच वर्षा नंतर अस्तित्वात आला. दुसरीकडे वेद प्रकाशात आणणाऱ्या चार ऋषिचे श्रेष्ठत्व आणि आत्म्याचे पावित्र्याचा आधार पुर्व-पुण्य सांगतात. हा एक गहन (गंभीर) विरोधाभास आहे.

आपण या तथ्याला थोडे विस्ताराने जाणण्याचा प्रयत्न करूया. स्वामीजी ने आपल्या भाषण संग्रह 'उपदेश मंजरी' मधील 'जन्म' शीर्षकाच्या सातव्या (७ व्या) भाषणात जे काही सांगितले आहे त्याने समस्येचे निराकरण होण्याऐवजी त्यात वृध्दी होते. त्यांनी आपल्या भाषणात उपनिषदांचा आधार घेतला आहे. त्यांच्या मते सृष्टिच्या प्रारंभी परमात्म्याने पुष्कळ मनुष्य आणि पशु-पक्षांना जन्म दिला, परंतु त्यांच्या दरम्यान ज्ञान व कर्म यामुळे निर्मीत आजच्या सारखे अंतर नव्हते. सर्व मनुष्य एक समान होते. सर्व शरीर सर्व मनुष्याच्या उपभोगासाठी होते. अर्थात ज्या पुरुषाला जी स्त्री आवडायची तो तिच्याशी नाते जोडायचा. त्यांचेवर कोणतेही बंधन आणि नियम लागु नव्हेत. पाच वर्षा-पर्यंत मनुष्य याच अवस्थेत राहीला. नंतर परमात्माने मनुष्याला वेदाचे ज्ञान दिले. वेदाच्या ज्ञानाने मनुष्याला चांगले व वाईट यांचा बोध झाला आणि कर्मानुसार त्यात अंतर होत गेले. पाप व पुण्याच्या अंतर्गत कर्म होवु लागले. मनुष्य पाप-कृत्या मुळे पशु-योनित जन्म घेवू लागले आणि पापमुक्त झाल्यावर पुनश्च मनुष्य शरीरात जन्म घेवु लागले. (हे भाषण जुलाई १८७५ ई. ला पुण्यात झाले.)

स्वामीजी च्या या वचनाने (वक्तव्य) ही गोष्ट कळते की, जीव आणि जगत (सृष्टि) नित्य नाही,[१] तर ही सृष्टि पहीलीच सृष्टि आहे आणि मानवाचे जीवन सुध्दा येथे पहीलेच आहे. मानव जन्मा-सोबतच वेदाचे ज्ञान आले नाही. तसेच पाप-पुण्य वेद ज्ञानानंतर आरंभ झाले. मग प्रश्न हा

१) स्वामीजी आपल्या दुसऱ्या पुस्तकात त्यांच्या नित्यतेची पुष्टी करतात.

आहे की शेवटी अग्नि, वायु, आदित्य आणि अंगिरा यांना पुर्व-पुण्य कसे मिळाले ? दुसरा प्रश्न सहजतेने निर्माण होतो की, सर्वशक्तिमान ईश्वर मनुष्याला निर्माण तर करतो परंतु त्याच्या मार्गदर्शनाची व सरळ मार्ग दाखविण्यासाठी कोणताही व्यवस्था करीत नाही जसे दयानंद स्वामी म्हणतात तर मग हा ईश्वरावर आरोप आहे. हे अगदी अनुचित आहे की ईश्वराने प्रारंभीच्या काही वर्षात मार्ग दाखविण्याची व्यवस्था केली नाही. सत्यता ही आहे की ईश्वराने मानविय-जीवनाच्या अगदी प्रारंभापासुनच आपली शिकवण प्रेषित आदम (अ) यांच्या द्वारे मनुष्यापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था केली. आदम (अ) आणि हव्वा द्वारे मानव-संतती प्रचलीत (जारी) केली, आणि मानवाच्या मार्गदर्शनासाठी ईश्वर आपले संदेष्टे, नबी आणि प्रेषित पाठवित राहीला. प्रेषित पाठविण्याचा हा क्रम प्रेषित मुहम्मद (स) यांच्यावर समाप्त करण्यात आला.

विद्वानांचे विचार एक मनन

आवागमनीय पुनर्जन्माचे समर्थक बुध्दिजीवी पंडीतामधे पं. माधवाचार्य शास्त्री हेच केवळ असे चिन्तक दिसतात ज्यांनी या विषयात इस्लामचा दृष्टिकोन बरोबर प्रस्तुत केला. दुःखाची बाब ही आहे की, अन्य बुध्दिमान पंडीतांनी या संदर्भात इस्लामी धारणा विकृत करुन अयोग्य पध्दतीने प्रस्तुत केली, आणि याला ही आवागमनीय पुनर्जन्माची जोडण्याची कुचेष्टा केली. ही कुचेष्टा हेतु-पुरस्पर जाणुन अगर अज्ञान केली या विषयी तर आम्ही काही सांगू शकत नाही परंतु हे मात्र सत्य आहे की, येथे लेखन-मुल्यांची घोर अवहेलना झाली आहे.

अलाहाबाद येथील मानसशास्त्र गृहाचे अवकाशप्राप्त शोध मनोवैज्ञानिक डॉ. एल.पी. मेहरोत्रा (एम.ए.पी.एच.डी.) यांनी तर कमालच केली. काही वर्षा-पूर्वी १९९६ ईसवी मधे त्यांची "पुनर्जन्म भी होता है?" नावाची पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाच्या १२८ व्या पानावर ते लिहतात की, "इस्लामच्या धार्मिक पुस्तकात लिहले आहे की चांगले कर्म करणाऱ्या व्यक्तिला मृत्यु नंतर खुदा (ईश्वर) चे दुत स्वर्ग अथवा जन्नत पर्यंत घेवुन जातात. याच्या विपरीत अधर्मी व्यक्तिला मृत्यु नंतर ईश्वराचे दूत नरकात लोटून देतात. त्यांच्या साठी स्वर्गाचे द्वार बंद असतात." डॉ. मेहरोत्रा यांनी या कथनाचे प्रमाण (पुरावा) दिले नाही. यामुळे तथ्य निरुपणात (निष्कर्ष काढण्यात) उणीव निर्माण झाली. इस्लामची धारणा व समजुत ही आहे की, महाप्रलय (कीयामत) दिनी अल्लाह संपूर्ण सृष्टि आणि त्यातील सर्व वस्तु नष्ट करेल. या नंतर सर्व मनुष्य पुनर्जीवित केले जातील आणि अल्लाह त्यांच्या कर्मानुसार स्वर्ग (जन्नत) व नरकात (दोजख़) चा निर्णय करेल. निसंशय सत्कर्मी लोक जन्नत मधे तर वाईट लोक नरकात जातील.

डॉ. मेहरोत्रा यांनी हजरत जलालुद्दीन रूमी यांच्या 'मसनवी' (खंडकाव्य) च्या काही काव्याच्या आधारे पुनर्जन्माला प्रमाणित करण्याचा प्रयत्न केला. परंतु हे सर्वविदित व सर्वमान्य आहे की, कविता कल्पनेची भरारी मात्र असते. काव्याचा वास्तविकतेशी काही संबंध असणे आवश्यक नाही. 'हिन्दुस्तान टाइम्स' १५ जुन १९९८ च्या दिल्ली आवृत्ती मधे एका सज्जनाने

डॉ. मेहरोत्रा सारखे मंतव्य (विचार) प्रकट (जाहीर) केले. परंतु काव्य रचनेच्या आधारे असे मत व्यक्त करणे केवळ अनुचितच नव्हे तर हास्यस्पदही आहे. त्यातच डॉ. मेहरोत्रा यांचे हे कथन अगदी चुकीचे आणि संदेहास्पद आहे. की, 'मुस्लिम सुध्दा अप्रत्यक्षपणे पुनर्जन्मात श्रध्दा व विश्वास ठेवतात, यद्यपि वरकरणी ते याला स्वीकार करीत नाही.' अल्लामा (धर्म पंडीत) इकबाल यांच्या हवाल्याने उपरोक्त शोधमनोवैज्ञानिकांनी जे सांगितले तेही असत्य आणि अप्रामाणिक आहे. डॉ. मेहरोत्रा यांनी या संदर्भात ठोस पुरावा अगर प्रमाण न प्रस्तुत करून अन्यायपुर्ण धोरण स्वीकारून पूर्वाग्रहाचा परिचय दिला आहे.

दिव्य कुरआन मधे मृत्युनंतर सर्व मानवांना पुनर्जीवित (पुन्हा एक वेळ जीवंत करणे) करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. या सत्याला विद्वान म्हटल्या जाणाऱ्या लोकांनी पुनर्जन्म (Rebirth) सांगुन आपल्या आवागमनच्या कल्पनेसाठी पुरावा दाखल प्रस्तुत करण्याची कुचेष्टा केली आहे. कदाचित ते पुनर्जन्म (Rebirth) आणि पुनर्जीवन (Resurrection) यामधे अंतर करू शकत नसावे किंवा मग हेतुपुरस्पर ते अंतर करू इच्छित नसावे. ते यूनानी आणि पश्चिमी विचारवंताच्या कथनातही याचे अंतर करीत नाही. अशा प्रकारे ते आपल्या चांगल्या कार्यालाही संदेहास्पद करून टाकतात.

अद्वैत आश्रम, कलकत्ता येथुन प्रकाशित स्वामी सत्यप्रकाशानन्द यांची पुस्तक "पुनर्जन्म क्यों और कैसे?" या मधे स्कॉटलँड चे विद्वान 'डेविड ह्यूम' आणि इंग्लंड चे विचारवंत 'एल स्टैनली' यांच्या विचारांना चुकीच्या पध्दतीने उध्दरित केले आहे. दोन्ही विद्वान विचारकांनी पुनर्जीवनची संकल्पना प्रस्तुत केली परंतु भारतीय विद्वानांनी त्याला पुनर्जन्माशी जोडले.

परामनोवैज्ञानिक अध्ययन

जार्ज बर्कले, फ्रांसिस हचिसन डेविड ह्युम यांनी मानस-शास्त्रात जे योगदान दिले आहे, त्याच आधारावर परामनोविज्ञान ला सुध्दा थोडी चालना मिळाली. १७१० ई. मधे प्रकाशित पुस्तक 'ए ट्रिटाइज कन्सर्निंग दि प्रिंसिपल्स ऑफ ह्यूमन नॉलेज' च्या प्रस्तावनेत जार्ज बर्कले यांनी चार तथ्याला अध्ययनाचा उद्देश्य बनविले. ही तथ्ये (१) विचार अथवा तथ्यांना सुचित करणे (२) भावना अथवा संवेगाला उद्दीष्ट करणे. (३) कुणालाही एखादे कार्य करण्यास प्रेरित करणे अथवा थांबवणे. (४) कोणाच्याही मनात एखादी विशिष्ट अभिवृत्ति उत्पन्न (निर्माण) करणे.

२० व्या शतकाच्या तीसरे, चौथे आणि पाचव्या दशकात परामनोविज्ञानच्या दिशेने कार्य गतिशील झाले. रूडॉल्फ, कार्नेप, सी. एल. स्टेवैन्सन, ए. जे. एयर इत्यादि मंडळी ने यावर कार्य केले. स्टीवैन्सन द्वारा 'माइन्ड' पत्रिका मधे लिहलेले लेख मार्ग-दर्शकाचे काम करतात. परंतु हे सर्व प्रयत्न आवागमनीय पुनर्जन्माला सिध्द करण्यास सक्षम ठरले नाही. काही शोध-कर्त्यांनी न्यूटन चे सिध्दांत for Every Action, there is an equal and positive Reaction (प्रत्येक क्रियेची समान आणि विपरीत प्रतिक्रिया होते) वर आवागमनीय पुनर्जन्माला-

बांधण्याची चेष्टा केली. परंतु यातही ते सफल (यशस्वी) झाले नाही. आता तर या नियमाचीच वैज्ञानिकता आणि प्रासंगिकता समाप्त झाली आहे. याच्या जागी 'मैक्सप्लैक' चा परिणाम सिध्दांत (Quantum Theroy) जास्त सैध्दान्तिक आहे. याच्या अनुसार प्रकृतिची क्रियाविधि उसळी मारणे (वर उंच उठणे) आणि झटक्यांच्या रूपात होते. उल्लेखनीय बाब ही आहे की १९ व्या शतकाच्या शेवट-पर्यंत न्यूटनचा यांत्रिक सिध्दांत प्रचलित होता. नंतर जेंव्हा ही गोष्ट समोर आली की हा यांत्रिक सिध्दान्त रेडियमचे आपो-आप हीलियम आणि शीसेत विभाजीत होण्याचे खरे व अचुक कारण देण्यास असमर्थ आहे तेंव्हा 'परिणाम सिध्दांत' विकसित झाला.

काही परामनोवैज्ञानिकांनी अनेक लोकांच्या स्मृति एकत्र तर केल्यात परंतु पुनर्जन्माला मान्य केले नाही. उलट याला मनोवैज्ञानिक शक्तिचा प्रभाव मानले आहे. ज्यांना स्मृति आहे ते घर-पारिवारीक वातावरणात असतात. बहुधा मुलांच्या 'पूर्व स्मृति' चा वारंवार उल्लेख करण्यात येतो. ही लहान मुले-मुली सहजतेने घर-परिवार (कुटूंब) यांचेशी संबंधीत गोष्टी करतात अन्य क्षेत्रात यांची आवड नसते. स्वप्नात ही संबंधित जीवन अथवा स्वप्न बघणाऱ्याच्या व्यक्तिगत विचारांशी संलग्न गोष्टीच सहसा दिसतात.

पाश्चिमात्य विद्यार्थ्यांना 'पूर्व स्मृति' विषयी मानसिक हिस्टीरिया चा शोध लागला. अशाप्रकारे पुनर्जन्माच्या ज्या केसेस त्यांच्या समोर आल्यात त्या पैकी एकाने ही आवागमनीय पुनर्जन्म सिध्द झाले नाही. प्रख्यात अमेरिकी परामनोवैज्ञानिक डॉ. आईन स्टीवैन्सन (वर्जीनिया यूनीवर्सिटी) स्वत: आपली पुस्तक Children who Remember Previous lives'' मधे कोणत्याही निष्कर्षा-पर्यंत पोहचू शकले नाही. अमेरिकेचे एक शोधकर्ता आपली प्रसिध्द पुस्तक ''स्पिरिट्स स्टार्स ॲन्ड स्पैल्स'' मधे अनेक उदाहरणाद्वारे पुनर्जन्याला एक छल-कपट व धोका सिध्द केले आहे. (पान २४६-२४९) प्रिंगिल पैटिसन (१९२२) ने सांगितले की, पुर्व जीवनाची स्मृति होतच नाही. असेच मत कैनन स्ट्रीटर, लिली, डूगल इत्यादि वरिष्ट विद्वानांनी प्रकट केले आहे.

भारतात अनुसंधान (शोधकार्य)

भारतात सुध्दा परामनोविज्ञान विषयावर संशोधनात्मक कार्य झाले आहे. १९२२-१९२३ ईसवी मधे राय-बहादुर शामसुंदरलाल यांनी या विषयावरील आपले संशोधन फ्रांसच्या एका पत्रिकेत प्रकाशित केले होते. १९२७ साली बरेलीचे के. के. एन. सहाय यांनी 'पुनर्जन्म' या विषयावर एक पुस्तिका लिहीली होती. लाला देशबन्धु गुप्त, पं. नेकीराम शर्मा आणि ताराजन्द माथुर यांनी सुध्दा काही कार्य केले आहे. डॉ. एस. सी. बोस यांनी १९३० च्या जवळपास तर प्राध्यापक आज्ञेय यांनी १९५७ मधे परामनोविज्ञान वर पुस्तके लिहीली आहेत. एनीबेसेंट ने यात आपले योगदान दिले. डॉ. केदरा, डॉ. कीर्ति स्वरूप रावत, गिरधर,

एन. के. चड्ढा, भुषण, पसरीचा, अस्का बिज इत्यादि विद्धानांनी या विषयावर शोध कार्य केले. डॉ. एल. पी. मेहरोत्रा यांनी २७ केस आपल्या पुस्तकात नमुद केल्या परंतु त्यांच्यात वैज्ञानिकतेचा लवलेशही नाही या मुळेच त्यांना प्रामाणिक अगर सत्य म्हणणे संभव नाही. यांच्या वर्णनाने जी प्रश्ने निर्माण होतात तीच त्यांचे अप्रामाणिक होणे सिध्द करतात. पुनर्जन्मित मुले अल्पायुत मरण पावतात या हिन्दु धारणेवर या घटना (केस) खरे उतरत नाही.

वर्तमान शतकाच्या ७ व्या दशकात एक महत्वपूर्ण घटना घटीत झाली. जयपुरच्या राजस्थान विश्वविद्यालयात डॉ. एच. एन. बॅनर्जी यांच्या अध्यक्षेत परामनोविज्ञान विषयावर संशोधनासाठी एका विभागाची स्थापना करण्यात आली. डॉ. बॅनर्जी मोठे प्रतिभावान आणि सत्यावर आधारित संशोधनाचे प्रबळ पक्षधर होते. त्यांनी १०० पेक्षा जास्त पुनर्जीवित केसेस चाचणी साठी आपल्या हातात घेतल्या ज्यांची चर्चा अगर उल्लेख परामनोवैज्ञानिक आपल्या पुस्तकात वारंवार करीत असत. शोधकार्यासाठी त्यांनी समित्या बनविल्या. या समित्यांनी घटना स्थळावर जाऊन आपले संशोधन कार्य पूर्ण केले. कीत्येक स्थानावर डॉ. बॅनर्जी स्वत: गेले. डॉ. बॅनर्जी एका मोठ्या टीम (ग्रुप) सोबत तुर्की गेले. या टीम मधे वरिष्ठ डॉक्टर आणि मनोवैज्ञानिकांचाही समावेश होता. तुर्की येथील अडाना जिल्ह्यातील इस्माईलची कथित पुनर्जन्माची घटना १९५६ मधे पुनर्जन्म समर्थकांनी मोठ्या जोमाने प्रचारित केली होती. कांही लोक आपल्या दाव्याचा सबळ पुरावा म्हणुन ही केस समजत होते. परंतु पुनर्जन्म समर्थकांचे दुर्दैवच म्हणावे की, घटनेच्या काही वर्षातच ॲन्ड कंपनी ला इस्माईल राहत असलेले गावही मिळाले नाही आणि पुनर्जन्म समर्थकीचा इस्माईल ही भेटला नाही.

डॉ. बनर्जींनी आटोकाट प्रयत्न केला परंतु त्याच्या पदरी निराशाच आली. त्यांनी या घटनेचा विस्ताराने उल्लेख केला आहे. त्यांनी संशोधन केलेल्या १०० केसेसचा काय निष्कर्ष निघाला हे सुध्दा बघुया. पूर्ण आवागमनीय पुनर्जन्म कल्पना छिन्न-भिन्न झाली. एकही घटना सत्य आढळून आली नाही. काही पक्षांनी डॉ. बॅनर्जी यांची आलोचना (टीका) केली व त्यांना पदावरून निलंबित केले. इतकेच नव्हे तर अगदी रहस्यमय पध्दतीने १९६८ साली त्यांचा विभागच बंद करण्यात आला. सत्यासाठी डॉ. बॅनर्जी यांनी बलिदान दिले परंतु असत्य आणि मिथ्या ज्ञानापुढे मान तुकविली नाही. प्रशंसेस पात्र अशा व्यक्तित्वाचे धनी होते ते.

पुनर्जन्माच्या असत्य घटना

पुनर्जन्मांच्या घटनांची पुष्टी आजपर्यंत होवू शकली नाही. याचा वैज्ञानिक आधार अशक्य प्राय: आहे. याचे एकमात्र कारण पुनर्जन्म न होणेच होय. ७ आक्टोबर १९६८ ला प्रकाशित एका बातमी नुसार ''मनोविज्ञान चे विशेषज्ञांनी (Psychologists) कांही केसेस पडताळल्या (तपासल्या) नंतर आपले मत व्यक्त केले की, सत्यता ही आहे जे लोक पूर्व

जन्माच्या गोष्टी सांगतात त्या पैकी अधिकतर लोक मानसिक हिस्टीरिया (Psychic Hysteria) रोगाने पिडीत असतात. आणि ते ज्या गोष्टी सांगतात त्या रोगाचाच परिणाम स्वरूप असतात. जयपुरचे मानसिक चिकीत्सालय चे डॉ. बी. के. व्यास आणि एक अन्य विशेषज्ञ श्री रत्न सिंह यांचा दावा आहे की त्यांनी या रोगाने पिडीत काही लोकांचा उपचारही केला आहे आणि ते सफल ही झालेत. डॉ. व्यास यांनी युनाइटेड न्यूज इंडियाला मुलाखत देतांना सांगितले की जे लोक पूर्व-जन्माच्या घटनांचे वर्णन करतात त्यांची मानसिक स्थिती साधारणतया सन्तुलित नसते. ह्या व्यक्तिगत समस्येच्या केसेस असतात. हे लोक मानसिक असंतुलनामुळे काही तरी वेगळं बनण्याचे इच्छुक असतात. अशा प्रकारच्या कपोल-कल्पित गोष्टी सांगितल्याने दुसऱ्यापासुन काही लाभ प्राप्त होतो.'' *(हिन्दुस्तान टाइम्स, नवी दिल्ली)*

डॉ. व्यास यांनी आपल्या मताच्या (पक्ष) समर्थनात काही घटनांचे विवेचन सुध्दा दिले आहे. देशात पुनर्जन्माचा दावा करणाऱ्या ज्या घटना आजपर्यंत समोर आल्या आहेत त्यांचे पात्र एक तर मानसिक व्याधिने ग्रासित (पिड़ीत) आहेत किंवा मग काही लोभ किंवा लालुचच्या हेतुने कपोल-कल्पित गोष्टी (कीस्से) तयार केल्यात किंवा काल्पनिक रूपाने लिहीले की पुनर्जन्माची घटना अमुक ठिकाणी घटीत झाली. धोका देणारी (फसवणुक करणारी) अशाच एका घटनेचा उल्लेख करीत डॉ. एल. पी. मेहरोत्रा लिहतात. ही घटना एका अशा मुलाची आहे ज्याच्या बहीणीला पुनर्जन्माची स्मृति होती त्यामुळे या मुलाला द्वेष निर्माण झाला व तो स्वत:ला महात्मा गांधीचा मृतात्मा सांगू लागला. गांधीजीच्या जीवना विषयी पुस्तकात वाचुन त्यांचे विषयीच्या गोष्टी सांगू लागला. गांधीजीचा पुनर्जन्म झाला ही गोष्ट आगी सारखी पसरली आणि लोक या गांधी बाळाला भेटायला येवू लागलेत. कॉंग्रेसचे मोठे-मोठे पुढारी तसेच सुशीला नैय्यर सुध्दा भेटल्या यामुळे या बाल-गांधी ला बरीच प्रसिध्दि लाभली. परंतु शेवटी सत्य उघडकीस आले आणि त्याचा खोटेपणा समोर आला.

पुनर्जन्माची खोटी कहानी

११ जुलाई १९९८ ला ही कथा लिहीणारे लेखक महाराजा बलरामपुर सर पाटेश्वरी प्रसाद सिंह यांचे कथित पुनर्जन्म झालेल्या गावी गेले होते. जे विवेचन वृत्तपत्र व पत्रिकेत प्रकाशित झाले होते त्यांने लोकांना या भ्रमात टाकले की खरोखर पुनर्जन्म झाला आहे. परंतु वेळीच आणि नंतर काही महीन्यांनी तत्पश्चात काही वर्षांनी घटना स्थळी जावून बघितले तर ही सर्व कहानी कपोल-कल्पित असल्याचे निदर्शनात आले. या काल्पनिक घटनेला सविस्तर पणे बघुया.

बलरामपुर (पूर्वाधाचा गोण्डा) जिल्ह्यातील शिवपुरा बाजार येथील स्वर्गकार पन्नालाल सोनी पुत्र मेवालाल सोनी यांनी १९८१ मधे दावा केला की, त्यांचे घरी १९६९ सालच्या कोणत्या तरी महीन्यात ११ तारीख (गुरुवार) रोजी जो मुलगा जन्माला आला तो महाराजा पाटेश्वरी प्रसाद सिंह यांचा पुनर्जन्म होय. त्यांनी अलाहाबाद येथून प्रकाशित होणाऱ्या एका

पत्रिकेचे कर्मचारी रामजी राय यांना सविस्तर इंटरव्ह्यू देऊन आपला दावा प्रस्तुत केला. या दाव्याने भोळ्या जनतेला भ्रमात टाकले. या भागात सगळीकडे पन्नालाल सोनी आणि त्यांचा मुलगा यांच्या चर्चेला उत आला व या दोघांचा आदर-सत्कार होवू लागला. लोकांचे झुंडच्या झूंड यांचे घरी येवून दर्शन घेवू लागले व महाराजच्या पूर्वजन्मीच्या गोष्टी विचारू लागले. १२ वर्षाच्या पुंडरीक कुमार ला ज्या गोष्टी पित्याने पुत्राला सांगितल्या होत्या त्या त्याने कंठस्थ केल्या. आता जो पूर्वजन्मीच्या गोष्टी विचारतो त्याला हा मुलगा कंठस्थ गोष्टी सांगू लागला. लोक आश्‍चर्य चकीत व्हायचे. अशा प्रकारे पन्नालाल सोनी यांचे परिवाराची प्रसिध्दि दिवसे-दिवस वाढत गेली. पन्नालालजी ने सांगितले शिवपुरा बाजार महाराजा बलरामपुर यांचे अधिक्षेत्र होते. पाटेश्‍वरी प्रसाद सिंह यांचे शिकार वगैरे साठी शिवपुरा येथे ये जा होत असे. पन्नालालजी नुसार "आम्ही महाराजा साहेबांच्या प्रत्येक चालीरितीशी परिचित होतो."

पन्नालालजी म्हणतात महाराजांनी त्यांना स्वप्नात येवून सांगितले की ते माझ्या घरी जन्म घेण्यास इच्छुक आहेत. तेंव्हा मी (पन्नालालजी) त्यांना सांगितले की, धर्मावतार ! आम्ही आपली सेवा कशी करणार?"यावर महाराज म्हणाले आम्ही तर जन्म घेणार आणि हा आमचा निर्णय आहे." नंतर पुंडरीकचा जन्म झाला. पन्नालालजी सांगतात की, पुंडरीक २ वर्षाच्या वयापासूनच पूर्व जन्माच्या गोष्टी सांगू लागला. परंतु प्रश्‍न हा आहे की याची माहिती किंवा जाण गावच्या लोकांनाही नव्हती की असे एखादे बाळ आहे जो पूर्व जन्मीच्या गोष्टी सांगतो. अचानक ११-१२ वर्षाच्या वयात पन्नालालजी पुनर्जन्माच्या गोष्टी प्रचारित करतात आणि क्षणार्धात प्रसिध्दी प्राप्त करतात. नंतर लोक दूर होत गेले जेव्हा सत्यता त्यांचे समोर आली आणि या कपोल-कल्पित कहानीचे ज्ञान त्यांना झाले.

महाराणी बलरामपुर यांनी पिता पुत्राला आपल्या महलात आमंत्रित केले परंतु हा १२ वर्षीय बाळ महाराज त्यांच्याही प्रश्‍नांची उत्तरे देवु शकला नाही. महाराणीची उत्सुकता दोन-तीन प्रश्‍नातच लोप पावली. पाटेश्‍वरी प्रसाद सिंह यांची मृत्यु रहस्यमय पध्दतीने झाला होता म्हणुन लोकांची (जिज्ञासा) उत्सुकता होती की पुंडरिक (उर्फ पूर्व महाराज) ने रहस्यमय स्थितीला स्पष्ट करावे परंतु अबोध (अज्ञान) बाळ जितके वडीलाने शिकविले तितकेच जाणत होता. अत: राणी-साहेबही असंतुष्ट झाल्या व त्यांनी आपली नाराजी प्रकट केली. बलरामपुरच्या काही सन्माननिय लोक सुरवातीस कथीत पुनर्जन्माकडे आकर्षित झाले परंतु सत्यता कळताच वेळ व्यर्थ खर्ची घालणे बंद केले. बलरामपुरचे सन्माननिय समाज-सेवी श्री. बृज कीशोर श्रीवास्तव यांनी या पिता पुत्राला घरी बोलावले. परंतु जेव्हा त्यांनी विचारले की 'कन्हई यादव विषयी आपण जाणता काय? तो आपल्या भगवानपुर फार्म वर काम करायचा. तेंव्हा तो निरुत्तरीत झाला व निसटण्याचा प्रयत्न करू लागला. अशाप्रकारे सत्यता समोर आली. पुंडरिक आज महाराज रांज (गोण्डा) येथे सोनारी काम करत आहे.

आवागमनीय पुनर्जन्म समर्थकांचे तर्कांचा तपास

स्वामी प्रभुपाद - आंतरराष्ट्रीय कृष्णभावना मृत संघाचे (इस्कान) संस्थापक स्वामी प्रभुपाद ने 'पुनरागमन-पुनर्जन्म का विज्ञान' ही १०७ पानाची पुस्तिका १९८४ मध्ये लिहली. या पुस्तकाचे दहावी आवृत्ती डिसेंबर १९९८ ला प्रकाशित झाली. प्रसारात अग्रगण्य या पुस्तकाच्या प्रस्तावनेत हा दावा करण्यात आला आहे की, पुनर्जन्म आणि आवागमन या विषयावर आक्षेपार्थ प्रश्नांचे तर्क संगत उत्तर देण्यात आले आहे.

पुस्तकाच्या प्रस्तावनेत लिहले आहे की,

"सामान्यत: लेखक स्व-निर्मीत कल्पनांना प्रस्तुत करतात की कसे आणि कोणत्या ठराविक प्रकारात पुनर्जन्म झाला जणु एखादे विशिष्ट आणि प्रतिभा-सम्पन्न प्राणीच पुनर्जन्म घेतात अन्य नव्हे. अशा प्रकारेच प्रस्तुती करण पुनर्जन्माच्या ज्ञानाचे विवेचन (वर्णन) अगर समीक्षा करीत नाही उलट अनेक भ्रामक कपोल-कल्पित कल्पना आणि विरोधाभास निर्माण करते. उदाहरणार्थ काय कोणताही मनुष्य तत्काळ पुनर्जन्म घेतो किंवा हळु-हळु क्रमवार अथवा लांब कालावधीत ? काय दुसरे जीवधारी जसे पशु मान-शरीरात पुनर्जन्म घेतात? काय मनुष्य पशु-योनित जन्माला येवू शकतात? जर असे होत असेल तर कसे आणि कां? काय पुनर्जन्माची ही प्रक्रिया सतत चालुच राहते अथवा कुठे-तरी संपते? काय आत्मा निरंतर नर्कात दुख भोगत राहते अथवा नेहमी साठी स्वर्ग सुख? काय आम्ही आमच्या भावी पुनर्जन्मांना काबुत आणु शकतो? कसे ? काय आमचा पुनर्जन्म दुसऱ्या नक्षत्रात किंवा दुसऱ्या देशात शक्य आहे? काय आमचे सत्कर्म आणि दुष्कर्म पुढे येणाऱ्या शरीराला निधित करते? कर्म आणि पुनर्जन्माचा काय संबंध आहे?

'कमिंग बॅक' पुनरागमन (पुनर्जन्माचे विज्ञान) या प्रश्नांची पूर्णपणे उत्तरे देते. कारण यात पुनर्जन्माच्या वास्तविक स्वरूपाची वैज्ञानिक पध्दतीने व्याख्या प्रस्तुत करण्यात आली आहे."

(पृ.ग)

या दाव्याच्या अनुवंशाने कथित पुस्तकाचे अध्ययन करून उपरोक्त प्रश्नाची उत्तरे कीती व कशी संतोष जनक देण्यात आली आहेत पाहूया.

स्वामी प्रभुपादच्या या पुस्तकात एकंदरित आठ (८) अध्याय आहेत. पहिल्या अध्यायाचे शीर्षक आहे - 'पुनर्जन्म-सुकरात से लेकर सेलिंगर तक'. (सुकरात पासुन सेलिंगर पर्यंत) यामधे साक्रेटिस (सुकरात) पाश्थेगोरस आणि प्लेटो यांचे काही कथन देण्यात आले आहे. तसेच यहुदी, ईसाई आणि इस्लाम धर्मात आवागमनीय पुनर्जन्म आहे अशी कपोल-कल्पित गोष्ट सागूंन गैरसमज आणि भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

स्वामी प्रभुपाद सुध्दा त्याच विद्वानांच्या माळेतील एक मणी होय जे 'पुनर्जन्म' आणि पुनरुज्जीवन (मृत्यु पश्चात एक वेळचे जीवन) या मधे अंतर करण्यात सक्षम नाहीत, अथवा हेतु-पुरस्पर मुद्याम किंवा अज्ञानात अर्थ व निष्कर्ष काढण्यात चुक करत आहेत. कविता, कहानी, उपन्यास इत्यादि साहित्य रचनेत उल्लेखित निर्णयाला धार्मिक मान्यता म्हणुन सांगणे घोर (महान) अन्याय होय. या प्रवंचना-कुप्रवृत्ति वर तत्काळ पुर्णविराम घालायला पाहिजे. लेखन-मुल्यांची अवहेलना कदापिही उचित नाही.

दुसऱ्या अध्यायाचे शीर्षक आहे 'शरीराचे परिवर्तन' यामधे स्वामीजी ने शरीराला स्वप्नवत सांगुन दावा केला की, "प्रत्येक मनुष्य या सत्यतेला जाणतो की मी हे शरीर नाही." स्वामी प्रभुपाद लिहतात की, "शरीर स्वप्नवत आहे याचा अनुभव आम्हाला प्रत्येक रात्रीत होतो. जेव्हा आम्ही स्वप्न बघतो तेंव्हा आमचे शरीर पलंगावरच पडलेले असते परंतु आम्ही अन्यत्र कुठे तरी जातो. यामुळे आम्हाला हा निष्कर्ष काढावाच लागेल की आम्ही या शरीरांपैकी एक ही नाही. अशाप्रकारे शरीर आपल्या सत्य स्वरूपात मात्र मनोरचना आहे."

स्वामी प्रभुपाद यांच्या या विचाराशी सहमत होणे कदापिही शक्य नाही. कारण त्यांनी यासाठी कोणतेही तर्क प्रस्तुत केले नाही. वैद्यकीय पक्ष मांडला नाही, केवळ श्रीमद् भगवत् गीताचा एक श्लोक लिहीला आहे. येथे स्वप्न बघण्यावर तर कांही गोष्टी प्रस्तुत केल्या आहेत परंतु कल्पनाशीलता वर कांहीही सांगण्यात आले नाही. मनुष्य प्रत्येक रात्रीत स्वप्न बघतोच असे मुळीच नाही. असेही नाही की, झोपताच स्वप्न बघण्यात व्यस्त होऊन जातो. परंतु तो जागृत अवस्थेत कल्पना तर प्राय: करतच असतो. आणि कल्पित वस्तु मधे अगर प्रसंगा मधे स्वत:ला शरीरासह सुध्दा संलग्न करतो. या परिस्थितीत काय आमचे शरीर आमच्या सोबत राहत नाही? काय आत्मा आमच्या शरीरातून निघून कल्पना अथवा स्वप्ना सोबत जाते? जर आत्मा आमच्या शरीरात राहते तर मग दुसऱ्या भिन्न शरीरात काय ती नसते? अशा परिस्थितीत शरीर स्वप्नवत कसे झाले?

शरीराला स्वप्नवत मान्य केले तर मग मनुष्य शरीराप्रति आपले कर्तव्य व अधिकाराची (हक्क) अंमलबजावणी कशा प्रकारे करेल? स्वप्नवत् शरीरासाठी मनुष्य भोजन का बरे ग्रहण करेल? त्याला नीट-नेटकं आणि स्वच्छ ठेवण्याची काळजी मनुष्य का बरे घेईल? शरीराच्या आवश्यक गरजांची पूर्ति आणि त्याची चिकीत्सा करण्यास मनुष्य का बरे धावपळ करेल? खरेच ! जर अस घडले तर रोटी, कपडा, मकानच नव्हे तर शारिरीक जीवनाच्या गरजाच मुळा-सकट समाप्त होतात आणि परिणामात मानव आचार-व्यवहार (गतिविधी) बंद होईल. परोपकाराची संकल्पना अर्थहिन ठरेल. एक दुसऱ्याच्या शरीराला स्वप्नवत समजुन लोक एक दुसऱ्याचे सहकार्य आपसात प्रेम, एक-मेकांच्या दुख निवारणास प्रयत्न इत्यादि सर्व कर्मे मनुष्य

करणार नाही. स्वप्ना प्रमाणे शरीराला मनोरचना मान्य केले तरी सुध्दा हीच स्थिती राहील. इतकेच नव्हे तर याने पुनर्जन्म ही सिध्द झाले नाही. 'मी हे शरीर नाही' अशी जाणीव बाळगणारा कदाचित एकही व्यक्ती आढळणार नाही.

स्वामीजीने दिलेले एक दुसरे उदाहरण बघा कीती भ्रांतिपूर्ण आहे. ते सांगतात की, काळा कोट अथवा पांढरा कोट घालणारा मनुष्य व्यक्तित्व बोधक नसतो. ते म्हणतात "जर मी आपणास श्रीमान ! काळा कोट', म्हणुन हाक मारली" तर ही माझी मुर्खताच होईल. अशा प्रकारे आपल्या जीवन काळात मी शरीराला अनेकवेळा बदलले आहे. परंतु मी त्या मधील कोणतेही शरीर नाही.

स्वामीजीचे उपरोक्त कथन सत्य मानले तर मग व्यक्तिला कोणत्याही नावाची गरज नाही. केवळ शरीराला शरीर म्हणणे पुरेसे होईल. इतकेच नव्हे तर हे सुध्दा म्हटले नाही तरी चालेल कारण शरीर अनिश्चित आहे. स्वामीजींच्या मते शरीरांत परिवर्तन होते. वस्त्राचे उदाहरण (जे स्वामीजीने दिले) या दृष्टीनेही उचित अगर योग्य नाही की, वर्तमान काळात काळा आणि पांढरा कोट व्यवसायाचे प्रतिक आहे. जसे वकील आणि डॉक्टर याच प्रमाणे अजुनही व्यवसाय आणि कर्माला प्रदर्शित करणारे पोशाख आहेत.

तिसऱ्या अध्यायात चर्चेचा विषय आत्मा आहे. यात ते आत्माचे अस्तित्व स्वीकार करतात व सांगतात की, "आत्मा ही परमात्मा पासुन येते". चौथ्या अध्यायाचे शीर्षक आहे "पुनर्जन्माचे तीन इतिवृत्त" (म्हणजे पुनर्जन्म झालेल्या तीन गोष्टी) यात पहिली गोष्ट चित्रकेतु ची कथा तर दुसरी जडभरत ची आणि तीसरी अजामिल ची कहानी आहे. या सर्व आवागमनीय पुनर्जन्मावर आधारित पौराणिक गोष्टी आहेत. पाचव्या अध्यायात आत्माच्या रहस्यमयी यात्रेवर चर्चा आहे. ज्यात श्रीमद् भागवत चे अधिकतर उतारे आहेत. सहाव्या अध्यायाचा शीर्षक "पुनर्जन्माचे तर्क विज्ञान" असा आहे.

या अध्यायात पहिला तर्क प्रस्तुत करीत ते लिहतात की दोन मुले एकाच दिवशी एकाच वेळी जन्माला येतात परंतु एक अपराधी तर दुसरा उच्यतम न्यायालयात खुर्चीवर (आसन) बसतो. हे त्याच्या पूर्व-जन्मीच्या कर्मामुळे होते. ही गोष्ट सत्यतेशी यत्किंचतही जुळत नाही. योग्यता, क्षमता ही मनुष्याचे खाद्यान्न, संगत, संस्कार आणि परिस्थिती इत्यादिवर अवलंबून असते.जेंव्हा मनुष्य स्वतामधे सुधारित परिवर्तनाचा (चांगले होण्याचा) इच्छुक असतो व त्यासाठी प्रयत्न करतो तेंव्हा ईश्वर त्याची मदत करतो. आणि मनुष्याला दैवयोगाची प्राप्ती होते. परिश्रमा शिवाय उच्च पद प्राप्त होत नाही. जर असे झाले तर मग लोक कर्म कशासाठी करतील ? कर्तव्य विमुख होवुन बसतील व पुनर्जन्माचे फळ प्राप्त करीत राहतील. अशा प्रकारे हा पहीला तर्क तर्कच राहत नाही.

एक चिकीत्सात्मक विवेचन

मुलाचे शारीरिक व मानसिक आरोग्य आईच्या आरोग्यावर कीती अवलंबून आहे हे चिकीत्सा विज्ञानाच्या यथार्थ दर्शनात करूया.

मानविय मेंदूच्या विकासाच्या प्रथम अवस्थेत मेंदू कोशिकांची वेगाने निर्मीती होते. ही स्थिती गर्भावस्थाच्या ४ था महिन्यापासुन प्रारंभ होते व बाळाच्या जन्मापर्यंत आईच्या गर्भातच पूर्ण होते. सहाकिडच आई रोगी अगर कुपोषित असेल तर बाळ निरोगी कसा होईल? बाळांच्या कुपोषणाचे एक प्रमुख कारण म्हणजे आईचे कुपोषित होणे आणि गर्भावस्थेच्या काळातही आईला अतिरिक्त पोषक आहार न मिळणे होय. मेंदूचा विकास आणि पालन-पोषण या मधील संबंधाला समजण्यासाठी मेंदूच्या विकासाची प्रक्रिया चांगल्या प्रकारे समजावी लागेल.

भारतीय चिकीत्सा संशोधन परिषदने गर्भवती महिलांचे स्वास्थ चांगले राहण्यास प्रतिदिन २५०० कॅलरी उर्जा आणि ५५ ग्रॅम प्रोटीन निर्धारित केले आहे. परंतु आंकडे सांगतात की आमच्या देशात सरासरी एका गर्भवती महिलेस दिवस भराच्या भोजनाने केवळ १४२० कॅलरी उर्जा आणि ३७ ग्रॅम प्रोटीन प्राप्त होते. अशाच प्रकारे एक वर्षा-पासुन पाच (५) वर्षा पर्यंतच्या मुलांना सरासरी १३०० कॅलरी उर्जा आणि १८ ग्रॅम पेक्षा कमी प्रोटीन मिळते. परंतु त्याला आवश्यकता १४२० कॅलरी उर्जा आणि १९.३ ग्रॅम प्रोटीन ची असते. चिकीत्सा विशेषज्ञांनुसार आमच्या देशात एका वर्षात जितकी मुले जन्माला येतात त्यापैकी केवळ १३ टक्के मुलेच निरोगी (स्वस्थ) व्यक्तिच्या रूपात विकसित होतात. जवळपास १७ टक्के बालपणीस मृत्यु पावतात. बाकी शारीरिक व मानसिक रूपाने (अशक्त) क्षीण राहतात.

गर्भावस्थाच्या २६ व्या आठवड्यापर्यंत शीरांच्या कोशिकांची निर्मीती अतिशय वेगात होते परंतु त्यांच्या आकारात वृध्दि मुळीच होत नाही. २६ व्या आठवड्या नंतर शीरांच्या विकासाची दुसरी अवस्था शिशु जन्म वेळापासुन १८ महीन्या पर्यंत चालते. या अवस्थेत कोशिकांची निर्मीती हळु-हळु कमी होवु लागते व आकारात वृध्दि आरंभ होते. मेंदूच्या विकासाचे तीसरे चरण ते आहे ज्यात १८ महिन्या पर्यंत पोहचता-पोहचता नव्या कोशिकांचे निर्माण होणे पूर्णपणे बंद होते. आणि त्यांच्या वृध्दिची प्रक्रिया (३) तीन वर्षापर्यंत चालत राहते. याच दरम्यान कोशिका आकार वृध्दि सोबत शीरांच्या सुत्रांची निर्मीती होते व त्यांच्या शाखा, उपशाखा बनतात. अशाप्रकारे पुर्ण मेंदूत शीरांचे एक जाळेच विणले जाते.

चिकीत्सकांच्या मते कुपोषणामुळे मेंदुचा विकास कीती प्रभावित झाला हे या गोष्टीवर अवलंबून आहे की कुपोषणाचा आरंभ कोणत्या वेळेपासुन झाला. कोशिका ज्यावेळी वेगाने निर्माण होतात त्यावेळी शरीराला कमी पोषक तत्व मिळाले तर कोशिका कमी संख्येत निर्माण होतील. जन्मा नंतर कुपोषणच्या आहारी गेलेल्या मुलाच्या कोशिकांची वृध्दि प्रभावित होते.

शेवटी कोशिकांची कमी, त्यांचा लहान आकार आणि कोशिका तंतु व त्यांच्या शाखा-उपशाखा या मधे कमी या सर्वांच्या प्रभावाने मुलाची बुध्दि मंद बनते. शिशुचे आरोग्य त्याच्या जन्मदात्या आईच्या आरोग्य आणि पोषक तत्वावर अवलंबून असते.

हे समजण्यास कांही मुळ गोष्टी जाणुन घेणे आवश्यक आहे. गर्भावस्थेचा आरंभ होताच आईच्या गर्भाशयात बदल होणे प्रारंभ होते. बाळाला विकसित होण्यास पर्याप्त स्थान मिळावे म्हणून सर्वात आधी गर्भाशयाच्या आकारात वृध्दि होते. सोबतच गर्भाशयात रक्ताची आपुर्ति वाढते. कारण गर्भाशयात वाढत असलेल्या बाळाला पोषक तत्वे पोहचवणे आणि तेथील व्यर्थ पदार्थ हटविण्याचे हेच एक माध्यम असते. गर्भाशयाला आवश्यक रक्त आपूर्ति प्रभावित होवू नये अगर त्यात कमतरता येवू नये म्हणुन आवश्यक आहे की शरीरात अतिरिक्त रक्त निर्माण व्हावे. आईच्या शरीरात होणारे हे सर्व बदल अतिरिक्त पोषक आहारा शिवाय शक्य नाही. हेच कारण आहे की आईला जर योग्य प्रमाणात पोषक तत्वे मिळाली नाही व तीचे शरीर कुपोषणाने ग्रासित झाले तर शिंशुचा विकास प्रभावित होतो. गर्भावस्था जशी-जशी वाढत जाते तशे-तशे आईच्या शरीरात कांही अन्य बदल होत असतात. कारण जन्मानंतर बाळाला आहार प्रदान करणारे साधन फक्त आईचे दुधच असते. या बरोबर आईच्या शरीरात जास्तीची चरबी (वसा) सुध्दा जमा होते. यामुळे आईला दुध उत्पन्नास आवश्यक उर्जा मिळत असते. जर आईला अतिरिक्त पोषक तत्वे मिळाली नाही तरी सुध्दा शारीरिक परिवर्तन तर होणारच ! परंतु अशा परिस्थितीत ही प्रक्रिया बाळाच्या विकासात कमतरता करूनच होईल.

एका गर्भवती स्त्रीला इतका आहार अवश्य घेतला पाहिजे जेणेकरून बाळाच्या जन्मासमयी तीच्या वजनात ११.५ कीलो ग्रॅम इतकी वाढ होईल. यामधे वाढीव अतिरिक्त रक्ताचे वजन ५०० ग्रॅम आणि आईच्या शरीरात जमा झालेली चरबी ४.५ ते ५.५ कीलोग्रॅम पर्यंत असते. अशा गर्भवती स्त्री पासुन जन्म घेणाऱ्या बाळाचे वजन ३.५ कीलो ग्रॅम असते. परंतु जर अशा स्त्रीला होणाऱ्या बाळाचे वजन आवश्यकते पेक्षा कमी असेल तर स्वस्थ बाळाला जन्म देण्यास गर्भावस्थेत आईचे वजन ११.५ कीलोग्रॅम पेक्षा जास्त वाढायला हवे.

वृत्तपत्रात प्रकाशित एका रिपोर्ट अनुसार आता 'स्मार्ट जीन' च्या सहाय्याने तीक्ष्ण बुध्दिची मुले प्राप्त करण्याची शक्यता बरीच वाढली आहे. वैज्ञानिकांनी आपल्या संशोधनाच्या आधारावर हा दावा केला की आपल्या इच्छेनुसार प्रतिभाशाली मुल (संतान) प्राप्त करू शकता. या संशोधनांमुळे हे सुध्दा शक्य झाले की शारीरिक शक्यता किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळे अक्षम व्यक्ति संतान प्राप्त करू शकतो. इतकेच नव्हे तर हे सुध्दा निश्चीत करू शकतात की, कोणत्याही अनुवांशिक अथवा अन्य जन्मजात रोगा पासुन मुक्त बाळ जन्माला येवो. जन्मानंतर सुध्दा कीत्येक प्रकारच्या रोग प्रतिबंधक लसी इत्यादि द्वारा जीवन अनेक प्रकारच्या रोगापासून सुरक्षित केले जाते. परंतु आता पर्यंत ही गोष्ट कल्पनेच्या बाहेर होती की आपल्या इच्छेनुसार तीक्ष्ण स्मरण शक्ति व कुशाग्रबुध्दि बाळगणारा बाळ प्राप्त करावा.

अमेरिका येथील प्रिंस्टन विश्वविद्यालय, मेसाच्यूसेट्स, इंस्टीट्यूट ऑफ टेकनालॉजी आणि वाशिंगटन विश्वविद्यालयाचे वैज्ञानिकांनी एक 'कुशाग्रबुध्दि' चा 'डूगी' नावाचा एक उंदीर तयार केला ज्याची बुध्दि सामान्य उंदीरा पेक्षा अतिशय तिक्ष्ण आहे. त्याची स्मरण-शक्ति अतिशय चांगली आहे व तो स्वत:ला सभोवतालच्या वातावरणाच्या अनुकूल बनविण्याची क्षमता देखील बाळगतो. अशा प्रकारचे संशोधन व परीक्षण करणारे वैज्ञानिक त्शियेन व त्यांचे सहकाऱ्यांना विश्वास आहे की मानव शरीरात आढळून येणारा एम.एम.डी.ए. ग्राही (रिसिप्टर) उंदीर, मांजर आणि अन्य प्राणधारी मध्ये सापडणाऱ्या रिसिप्टर च्या समानच असतो. अत: याची भुमिका (कार्य) मानव शरीरात तेच असावे जे अन्य प्राणधारी मधे असते.

(राष्ट्रीय सहारा, १२ सप्टेंबर १९९९)

स्वामी प्रभुपाद यांचा मनोरंकड तर्क

स्वामी प्रभुपाद यांचा दुसरा तर्क अतिशय मनोरंकड आहे. त्यांचा हा तर्क त्यांच्या पहिल्या तर्काला रद्द करतो आणि त्यांच्या तत्व-गुणवत्ते वरच प्रश्न चिन्ह लावतो. स्वामीजी लिहितात "जर एखादा मनुष्य जीवनाच्या या मौलिक वेषाला ज्याचा उद्देश केवळ स्वरूप-साक्षात्कार आहे, तो केवळ पशुप्रमाणे भोजन शयन काम आणि शरीर रक्षेत व्यर्थ घालवून देतो तर ईश्वर त्याला अशा योनित जन्म देतो ज्यात इंद्रिय-सुखासाठी जास्त सवलत असते."

या कथनाचे उदाहरण देत स्वामीजी म्हणतात की, "एक आधशी (पेटू) व्यक्ति, जो भिन्न-भिन्न प्रकारचे खुप-जास्त भोजन काही न समजता ठासून खातो. त्याला प्रकृति कडून डूकर किंवा बकरी चे शरीर दिले जाते ज्यामुळे तो घाण आणि विष्टा तो कांही न समजता चवीने खावु शकेल."

उपरोक्त उदाहरणासह तर्कावर दृष्टीपात केला तर कळून येते की, भोजन, निद्रा, मैथून आणि शरीर रक्षा ही कर्मे पशु-कर्म होय. या कृत्यात जीवन घालविले तर मनुष्य डुकर, बकरी (बकरी विष्टा-घाण खात नाही हे स्वामीजीना विदीत नसावे) बनते. हे तथ्य दिशा-भ्रमित करणारे आहे. सर्व प्रथम हे स्पष्ट व्हाययला पाहीजे की, उपरोक्त सर्व कर्मे (कृत्य) पशु-कर्म कदापिही नाही. हे सर्व मानविय जीवनासाठी अत्यंत जरूरीचे व अपरिहार्य कर्म आहेत. परंतु या कर्मात समन्वय साधुन मधला-मार्ग निवडणे अति आवश्यक होय हे मात्र खरे आहे. जर या कृत्यात समन्वय राखला नाही तर मानव-जीवन दोषयुक्त होईल परंतु भोजन, शयन, काम, शरीर-रक्षा इत्यादि सर्व जीवनाच्या अनिवार्य गरजा आहेत.

'पुनर्जन्माचे तर्क विज्ञान' या मताचा आलोचक आहे की "जर आम्ही अनैतिक अथवा पापमय जीवन जगलो तर आम्हाला नरकाच्या काळोखात नेहमी साठी दंडित केले जाईल जेथे मुक्तिसाठी प्रार्थना करणे ही शक्य नाही. स्वामी प्रभुपाद लिहतात "काय हे शक्य आहे की, मनुष्य

तर दुसऱ्या प्रति दया अगर करूणा प्रकट करू शकतो परंतु ईश्वर अशा भावनासाठी अक्षम आहे? हे मत ईश्वराला कठोर (हृदयहीन) पिताच्या रूपात प्रकट करतात जो आपल्या मुलांना आधी तर कुमार्गावर जाऊ देतो आणि मग त्याचे अन्तहीन दंड आणि उप्पीड़न बघत राहतो.''

वास्तविक ईश्वरावर असा आरोप लावणे म्हणजे अज्ञानाचे प्रकटीकरनच होय. ईश्वराला आणि त्याच्या व्यवस्थेला न जाणण्याचाच हा परिणाम आहे. ईश्वर या सर्व आरोपातून पूर्णपणे मुक्त आहे. तो अत्यंत कृपाशील व असीम दयावान आहे परंतु याच बरोबर तो 'जब्बार' ही आहे म्हणजे आपले आदेश आपल्या शक्तिने लागु करणारा आहे. तो सर्वथा न्यायशील आहे. सर्व शक्तिमान आणि सामर्थ्यवान आहे. तो क्षमाशील व कोमलतेने व नर्मी ने काम घेणारा आहे. तो 'बारी' अर्थात आपल्या योजनाना व्यावहारिक रूप देणारा आहे. त्याने जगत् संसाराला मनुष्याचे परीक्षा स्थळ बनविले आहे. मनुष्याचे येथील कर्म त्याच्या शाश्वत आणि पारलौकीक जीवनाचा आधार बनतील. जसे कर्म तो करेल तसा परिणाम अगर फळ तो प्राप्त करेल. जर ही व्यवस्था नसेल आणि हा आधार ठरविला नाही व जाहीर-क्षमेचे धोरण स्वीकारले तर छोटी-मोठी मानविय व्यवस्थाही चालु शकत नाही. जर न्यायधीश जाहीर क्षमा देत राहील तर हा काय न्याय होईल? न्यया व न्यायधीश एक थट्टा-मस्करी शिवाय दुसरे काय राहील? अत: स्वामीजी चा हा 'तर्क-विज्ञान' बुध्दि-विवेकांच्या कसोटी वर खरा उरत नाही.

सातवा अध्याय गीता आणि श्रीमद्भागवत यांचेवर आधारित आहे. आठवे शीर्षक आहे ''लौटकर मत आओ'' (परत नका येवु) या अंतिम अध्यायात आवागमन पासुन सुटका अगर मुक्ति साठी कृष्ण-भक्ति वर भर देण्यात आला आहे. तसेच आठ सूत्रीय कार्य-पध्दती सांगण्यात आली आहे. या समीक्षेअंती ही गोष्ट अगदी स्पष्ट होते की, पुस्तकाच्या भूमिकेत ज्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा दावा करण्यात आला होता ती उत्तरे पुस्तकात येवु शकली नाहीत. म्हणजे दावा निरर्थक ठरला. परंतु मुक्तिसाठी सांगण्यात आलेले तंत्र अवश्य चांगले आहे. जसे त्यात सांगितले की, प्रत्येक मनुष्याने सदैव प्रामाणिकतेने कमविले पाहीजे, जुगारी कार्य करू नये, अवैध मैथुन करू नये, मादक पदार्थांचे सेवन करू नये.

स्वामी सत्य प्रकाशानन्द

स्वामी सत्य प्रकाशानन्द पुनर्जन्माच्या पक्षात तर्क देत लिहतात की, बहुधा हा तर्क प्रस्तुत करण्यात येतो की जर आम्ही यापूर्वी सुध्दा मनुष्य जीवन व्यतित केले आहे तर मग त्यांचे आम्हाला स्मरण का नाही? आणि त्यांचे स्मरण नाही म्हणुन पुनर्जन्माचा सिध्दान्त स्वीकारण्या योग्य नाही. स्वामीजी या तर्काला रद्द करीत लिहतात की आम्हाला आमचे बालपणचे दिवस सुध्दा स्मरणात राहत नाही. काय याचा अर्थ हा आहे की आम्ही कधी मुले नव्हतोच? *(पुनर्जन्म का आणि कसे?)*

स्वामीजीचा हा तर्क अनुचित आहे. कारण मानसिक रूपाने स्वस्थ असा कोणताही व्यक्ति नसेल ज्याला आपल्या बालपणाच्या सर्वच आठवणींचा विसर पडला असेल. याचे विपरीत त्याला पुर्वजन्माची मुळीच आठवण नसते. अत: पुनर्जन्माची मान्यता काल्पनिक आणि अयोग्य आहे.

स्वामीजी स्वत:च आपल्या या तर्काचे खंडण एका लेखा द्वारे करतात. मासिक "Awakened India (Monthly)" च्या जुलै १९७० मधे प्रकाशित पत्रिकेत लिहतात की मनुष्याच्या वर्तमान जीवनाच्या सुस्पष्ट ज्ञानानेच पुर्व आणि परवर्ती जीवनाचे ज्ञान होवु शकते.

मनुष्याला वर्तमान जीवनाचे अगदी स्पष्ट ज्ञान होवु शकत नाही. म्हणजेच पुनर्जन्म असत्य आहे. याचे ज्ञान अशक्य आहे. यावरुन हा निष्कर्ष सुध्दा निघतो की, पुर्व जन्माच्या गोष्टी सांगणाऱ्या घटना असत्य आहेत. कारण जो असे करेल सहाजीकच त्याला वर्तमान जीवनाचे सुस्पष्ट ज्ञान नसते. हे सुध्दा एक सशक्त प्रमाण आहे.

स्वामी सत्य प्रकाशानन्द यांच्या मते आत्मा आणि मन कुळाच्या अनुकूल (वंशानुगत) नाही. ह्या करिता जन्मासाठी आनुवंशिकता (वंशपंरपरागत) चा कोणताही हस्तक्षेप होत नाही. विज्ञान या मताला मान्यता देत नाही. वृक्ष-लहान झाडे यापासुन डी.एन.ए. घेवुन नविन जातीची प्रजातीचा विकास करणे किंवा जनावरांच्या शरीर आकारात आनुवंशिकी विज्ञानच्या आधारावर परिवर्तन करण्याची परंपरा जुनी आहे. आता तर हा विज्ञान पूर्ण विषय बनला आहे. वंशपरंपरागतच्या आधारावर (ज्याचे मूळ स्त्रोत डी.एन.ए. आहे) चालते-फिरते वृक्ष बनविण्याच्या दिशेने संशोधन होत आहे. मानव शरीराची चिकीत्सा सुध्दा या विज्ञानाच्या आधारावर होण्याची शक्यता जास्त प्रबळ झाली आहे. या क्रमात एडिनबरा चे रोजलिन इंस्टीट्युट आणि अमेरिकेची एक बायोटेक्नालॉजी कम्पनी यांचे दरम्यान करार झाला आहे. या करारावर हस्ताक्षर करणाऱ्या लोकांचे म्हणणे आहे की ते क्लोनिंग टेकनॉलाजी द्वारे डायबिटीज पासुन ते हृदय रोगासारखे अनेक रोगांवर उपचार शोधण्याचे इच्छूक आहेत.

(नभाटा, २२ ऑगस्ट १९९९)

स्कॉटलँडच्या वैज्ञानिकांनी या विज्ञानाच्या आधारावर कोशिका द्वारे डॉली नामक मेंढी उत्पन्न केली आहे जी पहली क्लोन मेंढी आहे (cloned sheep) या संबंधी सविस्तर विवरण मार्च १९९७ मधे भारतीय वृत्तपत्र आणि पत्रिका मधे आले आहे. स्कॉटलँड ने इडेनबर्ग येथील रोजलिन इंस्टीट्युट मधे 'डॉली' नामक मेंढीचा क्लोन (प्रतिकृति) तयार केले.

आता तर अमेरिकेचे जेनेटिक वैज्ञानिकांना मानव-क्लोनचा भ्रुण (गर्भ) बनविण्यात यश प्राप्त झाले आहे. (द्रष्टव्य, दि स्टेटसमेन नवी दिल्ली १८ जुन १९९९) अमेरिकन डॉ. रिचर्ड सीड ने

मानव क्लोन बनविल्याची घोषणा केली आहे. मानव कोशिका द्वारे त्याचे प्रतिरूप मानव निर्माण होणे कुरआनच्या शिकवणीच्या अगदी अनुकूल आहे. इस्लामची ही धारणा आहे की, मनुष्य जसा आहे तसाच पुनरुज्जीवनाच्या दिवशी उत्पन्न अगर उभा केला जाईल. मानव क्लोनिंग द्वारे कर्म आणि आवागमनीय पुनर्जन्माचे उभारलेले महल धराशायी होते व त्याच्या संबंधात असे अनेक प्रश्न उपस्थित होतात जे याचे आधारहीन होणे सिध्द करते. दिल्ली विश्वविद्यालयाचे (प्राणीशास्त्र) जीव विज्ञान विभागाचे प्रो. मुरलीधर म्हणतात. जर मानव प्रतिरुपण एक वेळा आरंभ झाला तर ज्या देशाजवळ पुर्वीपासून शक्ती, विद्या, बुध्दिष्ट व्यक्ति जास्त असतील त्यांची संख्या वाढतच जाईल. असे सुध्दा होवु शकते की कीत्येक देशाजवळ एकाच प्रकारचे विद्वान असतील जे विध्वंसक आहेत तर ते विश्व समुदायासाठी अत्यंत घातक होईल.

स्वामी सत्य प्रकाशानन्द यांचे हे मत सर्वथा असत्य आहे की, जीव विद्या एक असामान्य प्रतिभा आणि एक अतिशय जडबुध्दि यांचे जन्मा विषयी संतोषजनक व्याख्या करण्यात असमर्थ आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, 'प्रत्येक मनुष्याच्या अंत:करणात शक्ति व ज्ञान यांचे पूर्ण अस्तित्व आहे. भिन्न-भिन्न कर्म या महान शक्तिला जागृत करून बाहेर प्रकट करण्याचे एक साधन मात्र आहेत.' (हिंदुस्तान नवी दिल्ली ११ जानेवारी ९८ ला प्रकाशित 'स्वामी विवेकानंद की कृति') च्या अंश मधून.

डॉ. एल. पी. मेहरोत्रा आणि डॉ. पी. वी. काणे

आवागमनीय पुनर्जन्मा संबंधी निर्मित प्रश्न 'जमीनीवर जनसंख्या वाढत आहे मग हे जास्तीचे जीव (प्राणी) कोठुन आले? याचे उत्तर देत डॉ. मेहरोत्रा म्हणतात की मला अनेक पंडित व विद्वानांशी चर्चा करण्याची संधी मिळाली. त्यांचे मत आहे की आमच्या वायुमंडळापासुन नवीन-नवीन सुक्ष्म शरीर प्रस्फुटित होत असतात त्यामुळे जनसंख्येत वृध्दि होत राहते. मनुष्याच्या पार्थिव शरीरात वायुच प्राण फुंकतो. प्राणाशिवाय पार्थिव शरीराचे संचालन होऊ शकत नाही. हे प्राणच सुक्ष्म शरीराचे स्वरूप आहे आणि जेंव्हा हे शरीरातून निघून जाते तेंव्हा मनुष्याचा मृत्यु होतो. अशाप्रकारे नवीन-नवीन सुक्ष्म शरीरांची उत्पत्ति जनसंख्या वृध्दिचे कारण होणं अगदी स्वाभाविक वाटते. परंतु ही कल्पना केवळ एक अनुमान आहे.

(पुनर्जन्म भी होता है? पान १५१)

डॉ. मेहरोत्रा यांनी जनसंख्या वृध्दिचे अजुन ही कांही तर्क दिले आहे परंतु त्यापैकी कोणालाही त्यांनी प्रामाणिक (सत्य) म्हटले नाही. त्यांची ही स्पष्टोक्ती त्यांच्या प्रामाणिक वृत्तीचे प्रमाण मात्र अवश्य आहे. शेवटी ते लिहतात की, 'जनसंख्या वृध्दिची वास्तविकता काय आहे हा प्रश्न आज पर्यंत बिकट व गुंतागुतीचाच बनलेला आहे.'

डॉ. काणे म्हणतात की अनेक प्राण्यांच्या जाती समाप्त झाल्या व पुष्कळशे जीव समाप्त होत आहेत, डॉ. सिंह जे लोक कर्म सिध्दांत मधे विश्वास बाळगतात ते असे सांगू शकतात की, जे जीव (प्राण) पशुच्या रूपात होते ते आता मानव रूपात येत आहेत. कारण ज्या दुष्कृत्या मुळे ते निकृष्ट दर्जात (योनित) विचरण करीत होते ते पाप आता नष्ट (समाप्त) होत आहेत.

(धर्मशास्त्राचा इतिहास भाग ५ पान ३८६)

डॉ. मेहरोत्रा यांच्या दृष्टीत नवीन-नवीन सूक्ष्म शरीर सरळ मानव रूपात जन्माला येणे अगदी स्वाभाविक आहे. परंतु हे सुक्ष्म शरीर नेमके काय आहे व कोणाचे आहे या विषयी कांही सांगितले नाही. हे सत्य आहे की, देशात पूर्वी मच्छर कमी प्रमाणात दिसायचे परंतु आता ते झुंडच्या झुंड दिसतात. माहीत नाही ते कोठुन आलेत. सूक्ष्म शरीर तेच तर नाही ना ! जे जास्त संख्येत मच्छर मारण्याच्या द्रव्याद्वारे मारले जातात आणि मग त्वरीत मानव रूपात जन्म घेवुन जनसंख्या वाढण्यास कारणीभूत ठरतात. डॉ. मेहरोत्रा यांनी आपल्या पुस्तकात २७ केसेस (घटना) वर्णिल्या परंतु झोकांतिका ही आहे की, यामधे एक ही सुक्ष्म शरीरापासून जन्मलेला नाही. आज दुष्कृत्यात लिप्त मनुष्यांचे प्रमाण जास्त आहे तरी सुध्दा माहीत नाही जनसंख्या का वाढत आहे?

डॉ. काणे हे पशुंच्या नष्ट होण्याला मनुष्याच्या पुनर्जन्माचे कारण मानतात. वायु पुराणच्या (१४.३४-३७) हवाल्याने ते सांगतात की जो व्यक्ति अतिशय पापी (दुराचारी) असेलतो खालच्या दर्जाच्या योनित जन्म घेतो. आधी पशु, हरीण नंतर पक्षी मग रेंगणारा कीडा आणि नंतर झाड अथवा दगड (जंगम), उलेखनीय आहे की, गौतम ऋषि यांची पत्नी अहिल्या शापामुळे दगड झाली होती जी रामा द्वारे मानव योनित देहान्तरित झाली होती. कठोपनिषद (५.६;७) मधे आहे की मृत्यु पश्चात काही लोक झाडाची तने होतात. उपनिषदानुसार कांही लोक मृत्यु नंतर धुळीचे कण सुध्दा होतात. या वास्तविकतेत केवळ पशुंच्या नष्ट होण्या मुळेच मनुष्यांची संख्या का वाढावी? या बोधनात सत्यता नाही ही गोष्ट सत्य आहे की एखाद्या विशिष्ट जातीचे पशु लोप पावत आहेत परंतु तरीही पशु-पालन केवळ भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात जास्त प्रमाणात वाढले आहे ही वस्तुस्थिती आहे. म्हणुनच डॉ. राधाकृष्णन यांना सांगावे लागले की,

“हे शक्य आहे की पशुंच्या रूपात पुनर्जन्माचे कथन त्या लोकांविषयी एक लक्षणात्मक प्रयोग (वापर) असावा जे मानव रूपात पाशविक गुणांचे धनी होते.”

(An Idealistic View of Life, Ed. 1932 Page 212)

आवगमन सिधान्ताला मान्यता दिल्याने आई, बहीण दुसऱ्या जन्मात पत्नीच्या रूपात येणे ही शक्य आहे. अशा प्रकारे अन्य अनैतिक संबंध विकसित होतील.

श्री गोयन्दका आणि माधवाचार्य शास्त्री

श्री जयदयाल गोयन्दका गीता प्रेस गोरखपुर येथुन प्रकाशित आपले पुस्तक "परलोक और पुनर्जन्म" मधे लिहतात की, मनुष्याच्या जीवनातील सुख-दु:ख, व्यवहार, कर्म, लोभ व क्रोध, शत्रुता इत्यादि यांची कमी व अधिकता तसेच ज्ञान व बुध्दि यामधील अंतर हे सुध्दा पुनर्जन्माचा एक पुरावाच होय. एका आई-बापाची संतती येथपर्यंत की एकाच वेळी जन्मलेली मुले या सर्व गोष्टीत एकमेकांपासुन भिन्न आढळतात. श्री गोयन्दका अगदी ठामपणे सांगतात की, मागील जन्माचा स्वभाव आणि अनुभव या शिवाय या विभीन्नतेचे दुसरे कारण होवू शकत नाही. डॉ. मेहरोत्रा यांनी सुध्दा लखनऊच्या एका परिवाराच्या मुलांची बौध्दिक क्षमता व योग्यता यांच्या स्वाभाविक भिन्नतेला आवागमनीय कर्माचे कारण म्हटले आहे. (पुनर्जन्म भी होता है? पान १२४, १२५) कांही दुसरे विद्वान सुध्दा या मताचे पुरस्कर्ते आहेत.

या तर्कांना बुध्दिच्या कसोटीवर पडताळुन बघुया

मानवाची बुध्दि, ज्ञान, कर्म, सुख-दु:ख, लोभ, क्रोध इत्यादि बाबीत अंतर नसते तर सर्व मनुष्य समान झाले असते आणि अशा समानतेने जीवन-यात्रा चालणे शक्य नाही. जीवन जगण्यास आवश्यक आहे की, विभीन्न बौध्दिक क्षमता व वेगवेगळ्या कला-कौशल्यात आवड ठेवणारे लोक असावेत. ईश्वर जीवजगत सहित संपूर्ण ब्रम्हांड (जग) चा निर्माता आहे त्याच्यावर अन्यायाचा आरोप कुणी लावू शकत नाही. तोच सृष्टीचा संचालक व अत्यंत तत्वज्ञानी आहे. कोणत्या मनुष्याला कीती बौध्दिक क्षमता द्यावी हा पुर्णतया त्याचाच अधिकार आहे. जेवढी बौध्दिक क्षमता तो प्रदान करेल त्याच अनुषंगाने त्याच्या जीवनाची परीक्षा आहे. अभावग्रस्त व्यक्ति सुखाचा तर सम्पन्न व्यक्ति दुखाचा सुध्दा अनुभव करतो.

जर बौध्दिक व इतर नैसर्गिक फरक यांना पुर्व-जन्माचे फळ मान्य केले तर मग प्रश्न निर्माण होतो की, अधिकतर लोक आपल्या जीवनात धोका, बेईमानी, कपट, भ्रष्टाचार आणि तुटमार इत्यादि अनैतिक साधनाद्वारे धन अर्जित का करतात? अनियमितता आणि अमानविय पध्दतीने सत्ता सुध्दा हस्तगत करत आहेत. संपत्ती आणि सत्ता पूर्व-जन्माचे फळ असते तर ते त्यांना अगदी सहजतेने मिळाले नसते काय? अनैतिक पध्दती अंगिकार करण्याची आवश्यकताच का होती?

उपरोक्त विद्वानाचे तर्क स्वीकार केले तर हे सुध्दा मान्य करावे लागेल की मनुष्याच्या आधी पशु-पक्षी, कीडे जगत आणि वनस्पती इत्यादिंची उत्पत्ती झाली. परंतु शोकांतिका ही आहे की या गोष्टीला मान्य केले तर बुध्दिला पुन्हा प्रश्न पडतो की ही सृष्टि कोणत्या दुराचारा मुळे निर्माण झाली? अत: आधी मनुष्याची उत्पत्ती स्वीकारावी लगेल की त्यांच्या दुष्कृत्या

मुळे कीडेमकोडे, पशु आणि वनस्पती यांची उत्पत्ती झाली. आणि या संदेहात्मक चक्रात आवागमनीय पुनर्जन्माच्या अस्तित्वा पुढेच प्रश्नार्थक चिन्ह लागते.

या शिवाय आवागमनचा हा सिध्दान्त स्वीकारला तर, गरीब, असहाय्य आणि विकलांग इत्यादि लोकांची मदत करू नये हे सुध्दा स्वीकारावे लागेल. कारण हे लोक आपल्या कर्माचे फळ भोगत आहेत. आणि ही शिक्षा त्यांनी भोगावी यातच त्यांचे हित आहे. कारण या शिवाय त्यांच्या जीवनाचा सुधार शक्य नाही. कीती अमानविय आणि अबौध्दिक मान्यता आहे ही!

श्री गोयन्दका आवागमच्या समर्थनात एक अन्य उदाहरण देत सांगतात की, बाळ जन्माला येताच रडतो. आणि मग कधी हसतो तर कधी रडतो, आणि कधी झोपतो. आई जेंव्हा त्याचे मुख छातीला लावते तेंव्हा दुध ओढु लागतो आणि धाक दाखविल्यास भयभीत होवुन कापू लागतो. बाळाचा हा व्यवहार सांगतो की हे सर्व पूर्व जन्मामुळे होते. पुर्व जन्मात आलेल्या सुख दुखांच्या अनुभवाच्या आठवणीने बाळ हसते व रडते. तसेच मागील जन्माच्या मृत्युच्या अनुभवाने त्याला थरकाप सुटतो. (परलोक और पुनर्जन्म)

डॉ. मेहरोत्रा लिहीतात की, "पुनर्जन्माची सत्यता स्वप्नाच्या सहाय्याने सिध्द केली जावु शकते. आम्ही काही अशी स्वप्ने बघतो ज्यांची वास्तविकता वर्तमान जीवनाच्या कोणत्याही घटनेशी संबंधीत नसते. त्याचे संधान वर्तमान जीवनाशी जोडणे हे आमच्या कल्पना शक्तीच्या आवाक्या बाहेर असते. तसेच त्याचा संबंध फ्राईड नुसार आमच्या विचारांच्या प्रतिक्रियाच्या रूपात वासना तृप्तिशी नसतो. अशा स्थितीत हे सांगणे की या जन्मा पुर्वीही कोणता तरी जन्म राहीला असावा ज्याच्या घटना स्वप्नात प्रकट होतात अनुचित ठरणार नाही. मुनि लोकांचे मत आहे की आमच्या सुषुम्मा शीरांमधे (नाडी) जन्म-जन्मांतराचा इतिहास दडलेला (लपलेला) राहतो आणि अशा प्रकारे स्वप्न बघत असता मन मागील जीवनाच्या स्मरणीय घटना खंडात जाते परिणामात पूर्वजन्माच्या घटनांचे सजीव व यथार्थ रूप स्वप्नात बघतो. आम्ही सर्व जाणतो की, घरातील माता झोपलेल्या मुलांना हसत असतांना बघते तेंव्हा सांगते की, तो पुर्व-जन्माच्या घटना स्वप्नात बघत आहे." *(पूर्वजन्म भी होता है? पान १२६, १२७)*

श्री गोयन्दका आणि डॉ. मेहरोत्रा यांच्या उपरोक्त तर्कांना ज्ञान प्रकाशात बघण्याचा प्रयत्न करूया दोघांनी मनुष्याच्या सहज स्वभावाला पुनर्जन्माशी जोडले आहे. जर बाळाच्या गतिविधींना पूर्व जन्माशी जोडले तर मग हे मान्य करावे लागेल की सर्व मनुष्य पूर्व जन्मात मनुष्यच होते व मोक्ष कुणालाही प्राप्त झाला नाही, उलट जन संख्येत वृध्दीच होत आहे. जर कोणी पूर्व जन्मात झाड, रोपटे, कीडा मकोडा इत्यादि राहीला असेल तर तो हसणार नाही किंवा रडणार नाही, तसेच दुधही पिणार नाही किंवा झोपणार ही नाही. परंतु प्रत्यक्षात आम्ही

बघतो की प्रत्येक शीशु ईश्वराने प्रदान केलेले आपले सहज (स्वाभाविक) आचार व्यवहार करतो. बाळ अबोध असते त्याची स्मृति इतकी नसते की त्याची अनुभूति त्याला होईल. त्याचे कोणतेही पूर्व जन्म नसते तसेच त्याची स्मृतिही नसते. स्वामी ब्रम्हानंद आणि स्वामी गुप्तानंद यांनी बाळाच्या स्मृतिच्या भुतकाळाशी संबंधाचे जोरदार खंडण केले आहे. ते सांगतात की, ''मुले फक्त वर्तमानात आणि केवळ वर्तमानातच जगतात. मुलांमधे स्मृतिचा हळु-हळु विकास होतो.'' हे चिकीत्सा विज्ञान द्वारा स्वीकृत सत्य आहे. हळुहळु क्रमवार तो ज्ञान विकासा कडे अग्रेसर होतो. यामधे त्याच्या जीवनाशी संलग्न परिस्थितीची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

स्वप्ना विषयी स्पष्ट रूपात आज पावेतो कोणतेही शास्त्रसिध्द सत्य अध्ययन समोर आलेले नाही. परंतु कांही गोष्टीवर सार्थक प्रगति शक्य झाली आहे. जसे या निष्कर्षा पर्यंत पोहचणे शक्य झाले आहे की, मन बुध्दि (मेंदू) आणि पचनसंस्थेतील खराबी (दोष) मुळे लोक जास्त स्वप्न बघतात. पचनसंस्थेत बिघाड, अपचन असले तर भितीयुक्त स्वप्ने दिसतात. शारीरिक दृष्टया कष्टे झेपणारा मनुष्य कष्टदायक स्वप्न बघतो. मानसिक ताण असल्यास मनुष्य स्वप्नात स्वताला हवेत उडत असलेला बघतो. होम्योपॅथी आणि दुरनिदान तसेच सम्मोहन चिकीत्सा पध्दति मधे तर स्वप्नांची लक्षणे बघुनही औषधी पध्दतीचे चयन केले जाते. अमेरिकेच्या कांही वैज्ञानिकांनी हे सिध्द केले आहे की काही विशिष्ट औषधी विशेष प्रकारच्या स्वप्नाची प्रेरक आहेत. प्रयोगाद्वारे हे सिध्द करण्यात आले आहे की, लैटिन अमेरिकाच्या कांही लोकांनी हास्यूसीजन (Hallucigin) नावाने औषध सेवन करून स्वप्नात ते अपरिचित जन्तु बघितले ज्यांना या पूर्वी कधी बघितले नव्हते.

शीशु वातावरणाशी अनुकूल होण्याच्या प्रक्रीयेत त्याच्या शारीरिक क्रिया सहज रूपाने प्रभावित होतात. कधी पचनसंस्थेत व्याधी तर कधी दात निघत असता व शारीरिक विकास प्रक्रिये प्रसंगी विभीन्न परिवर्तनाशी त्याची गाठ होते. या सर्वांचा स्वाभाविक प्रभाव त्याच्या मानसिक स्थितीवर पडतो यामुळे तो रडतो, हसतो आणि अन्य गतिविधी करतो.

डॉ. मेहरोत्रा यांनी स्वप्नाची पुनर्जन्माशी सांगड घालुन ज्ञानाचा परिचय दिला नाही. विचारात्मक गोष्ट आहे की, काय मनुष्य आपल्या प्रथम निर्मीती समयी स्वप्न बघत नव्हता? निश्चीतच बघत होता. मग काय तो स्वत:ला पशुपक्षी आणि वनस्पती बनलेला बघत होता? कारण पुनर्जन्माच्या मान्यते नुसार तो आधी तेच निश्चीतपणे राहीला असावा. परंतु असे कोणतेही पूर्वकालिक उदाहरण उपलब्ध नाही तसेच आजही कोणी स्वप्नात स्वत:ला कुत्रा, मांजर सारखे पशु आणि कीडा मकोडा अथवा वनस्पतीच्या रूपात बघत नाही. स्वप्नातही स्वत:ला तो जसा आहे तसाच बघतो. सामान्यतथा स्वप्न त्याच्या वर्तमान विचारांशी संबंधीत असते. सुप्रसिध्द मानसिक चिकीत्सक 'सिडनी क्राउन' यांच्या मते स्वप्न आमच्या दोषात्मक

चिंतेला अभिव्यक्त करतो. उदाहरणार्थ जर एखादा व्यक्ति स्वत:ला फालतू किंवा निरूपयोगी समजत असेल तर त्याला सहसा आपल्या असुरक्षेची स्वप्ने दिसतात. त्याला आपल्या बेकारी विषयी स्वप्न प्रत्यक्षपणे यासाठी दिसत नाही की, स्वप्न संवादाची सांकेतिक भाषा आहे ज्याला समजण्यासाठी आम्हाला प्रयत्न करावा लागतो. *(रोजर डॉब्सन यांच्या लेखावरून उद्धरित)*

वर्तमान जीवनाची परिस्थिती स्वप्नात काल्पनिक क्षेत्रफळ घेते. मानव विज्ञानिकांच्या मते मुलांमधे जास्त प्रमाणात सहज गुणांचा जन्म (उत्पत्ती) गर्भावस्थेतच होते. जन्मा नंतर त्यांचा विकास होतो. त्याचे काही गुण तर जन्मानंतर हळु हळु प्रकट होऊ लागतात आणि काही पुढे प्रकट होतात. शीशु नंतरच बोलणे व चालणे शिकते. जीव जंतु, पशु यांच्या बाळातही त्यांचे स्वाभाविक जाती गुणधर्म विद्यमान असतात.

आवागमन आणि पुनर्जन्म बुध्दि, विवेक यांच्या कसोटी वर

मागील विवेचनाद्धारे ही गोष्ट बहुतांशी स्पष्ट झाली की, आवागमनीय पुनर्जन्माच्या अस्तित्वात बौध्दिक, वैज्ञानिक आणि व्यावहारिक तथ्य अगर आधार सुसंगत नाही. वास्तविकता ही आहे की या कल्पनेला बुध्दि आणि विवेक यांच्या कसोटीवर सत्य सिध्द करणे अशक्य प्राय आहे. या विपरीत याच्या विरोधात अगदी स्वाभाविकपणे बुध्दि व विवेक यांच्या आधारावर निम्नलिखित पुरावे प्रस्तुत केले जाऊ शकतात.

(आवागमन आणि पुनर्जन्माच्या अवास्तविकते वर पूर्व विवेचनात अनेक गोष्टी आल्या आहेत त्यांची पुनरावृत्ति येथे होवु नये याची दक्षता घेण्यात आली आहे)

१) आवागमनच्या पुनर्जन्मीय मान्यते नुसार पशु,पक्षी, वनस्पती इत्यादि पाप कर्माच्या परिणाम किंवा फळ आहे. याचा अर्थ हा आहे की, पाप आणि दुष्कृत्ये अनिवार्य आहेत आणि या शिवाय सृष्टीचा कारभार चालणे शक्य नाही. जर पाप कृत्ये केली गेली नाहीत तर मनुष्याला दुध, मांस, धान्य, भीजापाला, लाकुड आणि त्याला उपयुक्त असलेले जीवजन्तु मिळणार नाही. (कारण पशु, पक्षी, वनस्पती इत्यादिची निर्मीती पापकृत्यावरच अवलंबून आहे.) म्हणजे सुख सुविधा तसेच गरीबी, उपासमारी, बेरोजगारी, कुपोषण इत्यादि समस्येच्या निवारणासाठी पापजन्य कृत्यांना प्रोत्साहन दिले पाहीजे. कीती अडाणी पणाची व अमानविय मान्यता आहे ही !

२) अपराधीला हे माहीत नसणे की तो कोणत्या अपराधाची शिक्षा (दंड) भोगत आहे अगदी अन्यायपूर्ण गोष्ट आहे. याची जाणीव मनुष्य, अन्य जीव आणि वनस्पती यांना मुळीच नसते. पशुपक्षी आणि कीडे तर आपले स्वाभाविक जीवन जगतात, वृक्ष आणि रोपटे आपल्या नैसर्गिक रूपात असतात. असे पशु (जनावरे) सुध्दा आहेत. जे दुध व अन्य साधनाचे योगदान करून पुण्य अर्जित करतात. काही वृक्ष फळे तर काही सावली तर काही दोन्ही देतात. हा दंड

कसा होईल ? पशु आणि वृक्ष यांनी पुष्कळ पुण्य अर्जित केले व आपल्या स्वभावा अनुकूल राहीलेत. पशु, पक्षी, कीडे मनुष्या पेक्षा जास्त सुखी जीवन व्यतित करतात.

३) मनुष्याच्या कर्माचा प्रभाव त्याच्या मृत्यु नंतर ही कायम राहतो. अत: बुध्दि विवेकला हे अपेक्षित आहे की त्याच्या सत्कर्म व दुष्कर्म यांचा भावी पिढीवर होणाऱ्या प्रभावाचे मुल्यांकन व्हावे आणि मग त्याला दंड दिले जावे. तंतोतंत मुल्यांकनाचा अभाव यामुळे उचित दंड अथवा पुरस्कार या लोकात (इहलोकात) अशक्य आहे.

४) जेंव्हा व्यक्ति हे समजतो की तो पुर्वजन्माच्या कर्माची शिक्षा भोगण्यास निर्माण करण्यात आला आहे तेंव्हा त्याचा आत्मसन्मान, स्वाभिमान आणि पुरूषार्थाची भावना जागृत होणार नाही व तो क्षोभ, ग्लानि, पश्चातापाने ग्रस्त कुंठीत जीवन जगेल. तसेच अशक्त, अभावग्रस्त लोकांमधे हीन भावना वास्तव्य करेल. एकंदरीत व्यक्तिची उन्नति आणि विकास खुंटेल. तो जगात आपल्या हिश्याच्या उपभोगापासुन ही वंचित राहील. आवागमनची धारणा सांसारिक वस्तुप्रति त्याची अरूचि आणि उपेक्षा यांना विकसित करेल. परिणामात तो कला कौशल्य, ज्ञान विज्ञान या पासुनही वंचित होईल.

५) मौलाना मुहम्मद फारूक खां. आपले पुस्तक ''परलोक की छाया'' मधे पुनर्जन्म आणि आवागमनच्या अनिष्टावर प्रकाश टाकीत लिहीतात की,

''कथित धारणे मुळे अहंकार वाढीस लागेल. ज्या लोकांजवळ धनसंपत्ती व सुख सामग्री असेल ते त्याला आपल्या मागील जन्माच्या कर्माचे फळ अगर परिणाम समजतील व दीन दुखी लोकांकडे उपेक्षात्मक दृष्टीने बघतील. ही वृत्ती मनुष्याला घमेंडी अगर गर्विष्ट तर बनवू शकते परंतु त्याच्यात विनय व नम्रतेची भावना जागृत करू शकत नाही जी मानवतेसाठी सर्वात श्रेष्ठ आहे.

पुनर्जन्माची धारणा लोकांना परस्पर जोडुन एकतेची भावना निर्माण करण्या ऐवजी त्यांच्या दरम्यान भेदभाव निर्माण करेल. काही लोक जन्मजात अपेक्षाकृत चांगले तर काही पापी आणि अपराधी (गुन्हेगार) समजले जातील. अशाप्रकारे मानवता विभीन्न भागात विभक्त होईल. उच्च नीचचा भेदभाव जन्म घेईल. काही लोक पवित्र तर काही अपवित्र घोषित केले जातील. विशेष म्हणजे हे सर्व धर्माच्या नावावर होईल.'' *(पान १४४,१४५)*

६) मानविय शरीरात अरबीच्या संख्येत जीवाणु नेहमी वास्तव्य करतात प्राणी शास्त्रज्ञांच्या मते मानव शरीरात जवळपास दहा (१०) खरब कोशिका आहेत यामधे एक कोशिकांचे जीवाणु सुध्दा सामील आहेत. या जीवाणु मधे ९० टक्के मोठ्या आतड्यात राहणारे आहेत. दक्षिण इंग्लंड येथील ट्रेडिंग युनिवर्सिटी चे प्रो. ग्लेन गिब्सन यांच्या मते ''कोणत्याही व्यक्तिच्या मोठ्या आतड्या मधे सूक्ष्म जीवांचे कोणते प्रकार बनले आहेत याचे

परिक्षण केल्यास आढळेल की बऱ्याच काळा पर्यंत समान पध्दतीनेच बनलेले राहतात. परंतु खान पान मधे बदल आणि जास्त काळ पर्यंत एन्टीबायोटिक औषधीच्या सेवनामुळे यांची स्थिरता भंग पावते." जीवाणुची स्थिरता भंग झाल्याने आरोग्यास संकट निर्माण होते. आवागमन आणि पुनर्जन्माची मान्यता या शास्त्रोक्त अध्ययनास अनुकूल नाही. विचारात्मक गोष्ट ही आहे की हे जीवाणु आपल्या कोणत्या पूर्व-जन्मीच्या कर्मामुळे मानव शरीरात राहून यातना भोगत आहेत. आणि त्यांच्या आत्माचा मानव आत्म्यांशी काय संबंध आहे? पुनर्जन्माच्या सिध्दान्त कीट-जीवाणुला आत्मावान सांगतो.

७) आवागमन अथवा पुनर्जन्माच्या धारणेला स्वीकार केल्यास हिन्दू बांधवाच्या अवतारावादाची कल्पना ही प्रभावित होते. विष्णु अवताराच्या जीवनात दुख आणि पीडा काय त्यांच्या पुर्व जन्माचा परिणाम आहे? अवतारवादाच्या धारणे नुसार केवळ देवी-देवताच नव्हे तर धर्म-गुरु, संत महात्मे, राजा व राणी हे सुध्दा स्वेच्छेने अवतार ग्रहण करतात. उदाहरणार्थ रूक्मिणी ला लक्ष्मी अवतार, जाम्बवतीला पार्वती अवतार सत्याला तुलसीदास अवतार, सत्यभामा ला पृथ्वीचा अवतार तर दुर्योधनाला कालिका अवतार मानले जाते. महात्मा बुध्दांचा 'बोधिचर्यावतार' सुध्दा प्रसिध्द आहे. निम्बार्काचार्य ला सुदर्शन चक्र, विष्णु स्वामीला कृष्ण अवतार, रामानन्दला काही लोक सूर्य अवतार तर काही कपिल अवतार मान्य करतात. तसेच वल्लभाचार्य हे वैश्वानरचे अवतार होय. सूर्य प्रकाश ऋतू ५ अंशु ५१ अनुसार सिख गुरु-गोविंद सिंह यांना सुध्दा अवतार मान्य केले जाते. मालती नामक राजकुमारी ला (चित्रावली पान नं. २०१) वर शशि/अप्सराचा अवतार म्हटले आहे. पद्मावतीला चंद्रमाचा, सुजानला शिवाचा माधवानल ला कामदेवचा तर कामकंदला रतिचा अवतार म्हणुन मान्यता प्राप्त आहे. येथपर्यंत की, काही लोकांनी नरसिंह राव (प्रधानमंत्री असतांना) यांना धर्म ठाकुरचा अवतार म्हणुन घोषित केले.

'अंशवाद' सुध्दा पुनर्जन्माच्या धारणेशी सुसंगत नाही. स्वत:च्या इच्छेने अवताराने आंशिक अवताराच्या रूपात जन्म घेणे पुनर्जन्मीय धारणेच्या अगदी विपरीत आहे.

८) शापाचा पुनर्जन्माच्या मान्यतेशी मेळ बसविणे अशक्य आहे, हिन्दु-धर्मान्वये शापास योग्य केवळ प्राणीमात्रच नव्हे तर देव गंधर्व नागकीन्नर येथ पर्यंत की भगवंत सुध्दा आहे. नारद मुनिच्या शापाने रामचंद्राने मनुष्य शरीर धारण केले आणि प्रियावियोग सहन केला. (रामचरित मानस) श्री कृष्ण सुध्दा मनुष्य जन्मात दुखी होते. आपल्या प्रभु समोर आपले दुख प्रकट करीत ते सांगतात. ''हे दुखनाशक ! मनुष्य जन्म प्राप्त करून मी दुखी आहे. हे काम दाहक ! गर्भवासात मी अतिशय दुख सहन केले आहे. (देवी भागवत पुराण ४-२५-४३,४४) शापा मुळेच भगवान

शंकरांच्या गणांना रावण आणि कुम्भकर्ण च्या रूपात जन्म घ्यावा लागला. इन्द्राच्या शापाने कुमुद, केशी नावाचा कंसचा घोडा बनला. यमराज यांच्या शापाने इक्ष्वाकु राजाचा मुलगा नृग हा दुसऱ्या जन्मात नृगराज नावाचा गिरगिट (सरडा) बनला. ब्रम्हाच्या शापामुळे श्रीकृष्णाचे सहा भाऊ स्मर, उग्दीथ, परिष्वंग, पतंग, क्षुद्रभृत आण घृणि हे हिरण्यकशिपुच्या पुत्राच्या रूपात असुर (राक्षस) योनित जन्माला आले. राजा सहस्त्राक्ष यांनी एक वेळ दुर्वासा ऋषिला अभिवादन केले नाही, यामुळे क्रोधीत होवुन त्यांनी राजाला राक्षस होण्याचा शाप दिला. या शापामुळे पुढील जन्मात ते कंस मित्र तृणावन्त च्या रूपात जन्माला आले. शापाच्या कथा आवागमन आणि पुनर्जन्म धारणेच्या विरुध्द आहेत कारण यामुळे हिन्दु धर्माच्या धर्म-सिध्दांताचीच अवहेलना होते. अभिशाप कथेनुसार मनुष्याला सुधारण्याची आणि प्रायश्चित करण्याची संधी प्राप्त नाही. या कथेत एका विशीष्ट वर्गाचे प्रभुत्व असल्याची गंध जाणवते.

९) आत्म्याला बोलावण्याच्या दाव्यात जर काहीतरी सत्यता आहे तर मग याने सुध्दा आवागमनीय पुनर्जन्माचे खंडण होते. आवागमन सिध्दांतानुसार आत्मा जेंव्हा वेगवेगळ्या योनित भटकत (फिरत) असतो तेंव्हा तो बोलावण्याने कसा येईल? जर तो आवागमनच्या चक्रव्यूहातुन मुक्त झाला आणि परमधामला प्राप्त झाला तर मग बोलावण्याने कसे येवु शकेल? वास्तविक प्लेन चिट वरआत्मा बोलावण्याचे कार्य हातसफाई शिवाय दुसरे काही नाही. हा धंदा विदेशात सुध्दा पसरलेला आहे. पेंग्विन बुक्स द्वारा प्रकाशित पुस्तक 'साशकील रिसर्च टुडे' मधे या कृत्याच्या वास्तविकतेवर ज्ञान प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

१०) जेंव्हा मनुष्याला ह्या गोष्टीची जाणीव होईल की त्याचे दु:ख पुर्वजन्माचे फळ आहे व तो आधी कीडा किंवा जनावराच्या योनित होता तेंव्हा सहाकिडच त्याचे जीवन हीन व ग्लानि ने व्याप्त होईल. परिणामात त्याची प्रगती खुंटेल. वर्तमान काळातही जन्म कुंडली/जन्म पत्रिका बनविण्यात येते. यापैकी काही मध्ये ज्योतिषी महाराज हे लिहून अगर कम्प्यूटर प्रिंट काढून देतात की, अमुक व्यक्ति मागील जन्मात (पूर्वाधाची योनि) अमुक कुत्रा, मांजर, उंदीर, बैल, पक्षी वगैरे होता. हे तथ्य लग्न समयी मुला-मुलीची कुंडली गुणांकण (मेळ बसविणे) चा प्रमुख आधार बनते. यामधे कुंडली धारकाचे जीवन कुंटीत होवू शकते.

११) अहं ब्रह्मास्मि (मी ब्रम्ह आहे) आणि 'आत्मा ही परमात्मा आहे' तसेच 'आत्मा ईश्वराचा अंश आहे'. हिन्दू धर्माच्या या सर्व दार्शनिक वाक्यांच्या यथार्थावर आवागमनीय पुनर्जन्मा मुळे प्रश्नार्थक चिन्ह लागते. अशा प्रकारची आत्मा जर हजारो निम्न योनित भटकत असेल तर निश्चीतपणे ही ईश्वराची प्रतिष्ठा आणि गौरव यांच्या अनुकूल गोष्ट नाही. आवागमनच्या धारणेची स्वामी विवेकानंद आणि पं. श्रीराम शर्मा आचार्य यांच्या या कथनाशी सांगड घालता येत नाही की, 'मनुष्य आपल्या भाग्याचा स्वयं (स्वत:) निर्माता आहे.'

आवागमन आणि पुनर्जन्म धारणेच्या अबौध्दिकते मुळेच काही हिन्दु धर्माचे विद्वान ही त्याला स्वीकारीत नाही. गायत्री समाजाचे संस्थापक, चारही वेद, उपनिषध, अनेक पुराण इत्यादिचे टीकाकार पंडीत श्रीराम शर्मा आचार्य म्हणतात, ' मनुष्य जीवनात शारीरिक कष्टा व्यतिरिक्त मानसिक कष्ट सुध्दा आहे यामुळे त्याला अन्य प्राण्यांच्या तुलनेत जास्त कष्ट सोसावे लागते. या विपरीत पक्षी, फुलपाखरु, मधमाशी इत्यादि अनेक जीवजन्तु सुखरूप जीवन व्यतित करतात. या वस्तुस्थितीत चौऱ्यांशी लक्ष योनित भ्रमणाची कल्पना रद्द होते. परंतु विज्ञानात भ्रुण विकासाचे जे स्वरूप सांगण्यात आले आहे त्यानुसार हे सुध्दा सिध्द होते की मनुष्य ९ महिने गर्भवासातच चौऱ्यांशी लक्ष आकृत्या बदलतो. अशा प्रकारे पौराणिक मान्यते सोबत या वैज्ञानिक विवेचनाची सांगड घालता येते.'' *(अखंड ज्योति जानेवारी १९८६)*

'आत्मा आणि पुनर्जन्म' प्रसिध्द पुस्तकाची लेखिका सोमा सबलोक २२ आणि २३ पानावर लिहीते ''पुर्वजन्माच्या गोष्टी सांगण्याचा धोका नेहमी ५ वर्ष वयाच्या वरील मुलाद्वारेच केला जातो. या पेक्षा कमी वयाच्या व्यक्ति द्वारे नव्हे. जर पुर्वजन्माच्या घटना स्मरण असतात हे मान्यही केले तर मग जी स्मृति (५) पाच वर्ष वयाच्या वरील मुलात असेल तीच त्या पेक्षा कमी वयाच्या मुलातही असणार ! जर पूर्वजन्माच्या गोष्टी सांगण्याच्या अलौकीक चमत्कार, जो पाच वर्ष वयानंतर होतो तो त्या पेक्षा कमी वयात ही व्हायला पाहीजे. मुलाद्वारे सांगण्यात आलेल्या घटनांचे परीक्षण जेंव्हा वैज्ञानिकांनी केले तेंव्हा निराशे शिवाय त्यांच्या पदरी कांहीही पडले नाही. शेवटी शास्त्रज्ञांना सांगावे लागले की अशा घटनात्मक कथा मिथ्या (असत्य) आणि निव्वळ धोका आहे. अशा प्रकारे मागील जन्माचे घटनाक्रम सांगणाऱ्या बालकांचे कीस्से केवळ काल्पनिक आणि संपत्ती कमविण्याचे साधन मात्र आहे.''

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाचे संस्थापकाचार्य स्वामी प्रभुपाद पुनर्जन्म स्तोत्राची आलोचना करीत लिहीतात.

''पुनर्जन्मावर प्रकाशित अधिकांश साहित्य सत्यज्ञानावर आधारित नाही. अधिक तर अनुमानावर आधारित आणि उथळ व अनिर्णीत आहे. कांही पुस्तके त्या अनुभवाला प्रस्तुत करतात जे सम्मोहनाच्या प्रभावाने पूर्व-जन्माच्या दमन केलेल्या आठवणी पर्यंत पोहचतात. ते त्या घराचा पुर्ण तपशील देतात ज्यात ते राहतात. त्या रस्त्याचे ज्यावर ते चालायचे. त्या बागाचे ज्यात बालपणात जायचे. पुर्व जन्माचे आईवडील व मित्र आप्तेष्टांची नावे सुध्दा हे लोक सांगतात. परंतु ध्यानपूर्वक तपासाअंती जे सत्य समोर आले त्या नुसार पूर्वजन्माच्या प्रमाणात प्रस्तुत घटना कल्पित उड्डाण आहेत, ज्या केवळ त्रुटिपुर्णच नव्हे तर एक धोकात्मक कार्य होय.'' *(पुनरागमन भुमिका पान ख)*

स्वामी प्रभुपाद यांचे हे कथन विचारणीय आहे की 'आम्ही आत्मा आहो' आणि म्हणुन सनातन आहोत. तर मग आम्ही स्वत:ला जन्म आणि मृत्युच्या विषयात का अडकवतो? हा प्रश्न विचारणारा बुध्दिमान समजला जातो." *(जन्म और मृत्युसे परे पान १६)*

शनिवार दिनांक ७ ऑगस्ट १९९९ ला नवी दिल्ली येथुन प्रकाशित शीर्षका अंतर्गत लेखात श्री. पी. एन. बॅनर्जी यांनी आवागमन आणि पुनर्जन्माच्या धारणेला उपहासजनक (थट्टात्मक) म्हटले आहे, ज्याचे सत्य विवेचनात्मक निर्णय येथे अमर्यादित होईल. वास्तविकता ही आहे की ज्या लोकांची धारणा या विषयी योग्य आहे ते भाग्यशाली व बुध्दिमान आहेत. असाम राज्याचे अहोम लोकांची ही धारणा आहे की मृत्यु पश्चात आवागमनीय पुनर्जन्म होत नाही. परंतु मृतकाची आत्मा पृथ्वी आणि आकाश या दरम्यान एका जागी आपल्या अंतिम कर्म फळा पर्यंत राहते. अहोम लोक मृतक आत्माच्या शांतीसाठी प्रतिवर्ष अनुष्ठान करतात. काही हिन्दु संप्रदायात सुध्दा मृतकाच्या आत्म शांति साठी धार्मिक अनुष्ठानाची प्रथा आहे. हे धार्मिक अनुष्ठान २५ दिवस चालते आणि या काळाला 'पितृपक्ष' किंवा 'श्राध्दपक्ष' म्हणतात.

कर्म पुनरूज्जीवन आणि इस्लाम

मनुष्याला या लोकात (इहलोक) आपल्या चांगल्या वाईट कर्माचा पुरे पुर पुरस्कार (बक्षीस) आणि दंड मिळु शकत नाही. यासाठी परलोकाचे अस्तित्व अनिवार्य आहे. जगातील सर्व मोठ्या धर्मात परलोकाची धारणा उपलब्ध आहे. इस्लामच्या व्याख्येत पारलौकीक जीवनाला 'आखिरत' म्हणतात.

इस्लामची ही स्पष्ट धारणा आहे की मनुष्याचे हे जीवन त्याच्या परीक्षेचा काळ आहे. हे जग नश्वर आहे व एका ठराविक दिवशी त्याचा नाश होणे निश्चित आहे. शाश्वत जीवन तर आखिरतचेच (परलोक जीवन) होय. मनुष्याचे हे क्षणभंगुर जीवन शाश्वत जीवनासाठी पुर्व तयारीची एक संधी मात्र आहे. जर मनुष्य आपल्या जीवनाला ईश्वरीय आदेशा अनुरूप व्यतित करेल म्हणजेच शुध्द व परिपुर्ण एकेश्वरवाद, प्रेषितवाद आणि परलोकवाद जीवना विषयीची सत्य मौलिक धारणा स्वीकारून सत्कर्मात आपले जीवन खर्ची घालेल (व्यतित करेल) त्याला चांगले फळ अगर मोबदला मिळेल. तोच (जन्नत) स्वर्ग सुखास पात्र ठरेल. तेथे त्याला वास्तविक जीवन (शाश्वत), सुख शांती आणि अमरत्व प्राप्त होईल. ते या लोकाचे अत्यंत विकसित रूप असेल आणि तेथे कोणत्याही प्रकारची त्रुटी अगर कमतरता नसणार. सत्कर्मी येथे सदैव राहील. या विपरीत मिथ्याचारात व्यस्त दुष्कर्मी हा जहन्नम (नरक) च्या भडकत्या अग्नित टाकला जाईल. आणि येथे तो सदैव जळत राहील. दुष्कर्मी विभीन्न यातनांचा उपभोग घेईल.

इस्लाम पुनर्जन्म नव्हे तर पुनरूज्जीवन (Resurrection) ला मान्य करतो. तो मनुष्यांच्या

वारंवार जन्म घेण्याच्या कल्पनेला मान्य करीत नाही. तो मानव आत्माचे जीवजन्तु, वनस्पती वगैरे मधे भ्रमणाच्या कपोल कल्पित विचाराला पूर्णपणे निरस्त व रद्द करतो. त्याचे स्पष्ट मत आहे की मानविय जीवनाच्या अगदी आरंभापासुन प्रलया पर्यंत येणारे जगातील सर्व मनुष्य प्राणी पुन्हा एकदा जीवंत केले जातील आणि सर्व शक्तिमान स्वयंभू अल्लाह त्यांच्या कर्माचा (जीवन कार्याचा) हिशेब घेईल आणि कर्मानुसार न्याय करून पुरेपुर पुरस्कार अथवा दंड देईल.

"कीयामत (महाप्रलय) च्या दिवशी दर्जाच्या दृष्टीने सर्वात वाईट व्यक्ति तो असेल ज्याने आपली आखिरत (पारलौकीक जीवन) दुसऱ्यांच्या भौतिक संसाराच्या मागे (दुनिया) नष्ट केली." (इब्नेमाजा)

"पवित्र कुरआन कीयामत (महाप्रलय) निश्चीतपणे येणार. या दिवशी सर्व शक्तिमान अल्लाह सर्व मनुष्याना जमा करेल (कुरआन १५:२५, २:१४८) प्रेषित मुहम्मद (स) यांनी कीयामत येण्यापूर्वीच्या लक्षणांचे विवेचन करीत सांगितले की,

"ज्ञान लोप पावेल व अज्ञान वाढेल, व्यभिचारात वृध्दि होईल. दारू (मद्द) सेवन जास्त प्रमाणात होवु लागेल. पुरुषांची संख्या कमी व स्त्रियांची संख्या जास्त होईल. येथ पर्यंत की हे प्रमाण १:२ चे होईल" (बुखारी, मुस्लिम, अहमद, तिरमीजी)

"जेंव्हा नरशिंग फुंकले जाईल (प्रलयाची घोषणा) तेंव्हा सर्व लोक जे मृत्यु पावले आहेत आपल्या पालनहार प्रभु कडे चालत जातील." *(कुरआन २६:५१, ७०:४३)*

कुरआनोक्ती आहे,

"कीयामतच्या दिवशी आकाश दुभंगेल किंवा फाटेल, तारे झडतील, सूर्य गोळा केला जाईल, पर्वत पिंजलेल्या उना प्रमाणे होईल, पृथ्वी कांडून-कांडून चुर्ण विचुर्ण करून समतल केली जाईल आणि जे कांही तिच्या गर्भात आहे ते सर्व बाहेर टाकुन ती रिकामी होईल. मुडदे कबरीतून उठविले जातील, आणि अंर्तमनाचे भेद प्रकट होतील. लोक विखुरलेल्या ठिणगी (पतंगे) प्रमाणे होतील."

(कुरआन ८२:१, ८४:१, ८२:२, ८१:१, ८९:२१, ८४:४, १००:९, १०:१०१, १-११)

पुनरुज्जीवनाच्या या दिवशी प्रत्येक व्यक्तिला आपल्या कर्माचा पुरेपुर मोबदला (फळ) मिळेल. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"मग जेंव्हा नरशिंग फुंकले जाईल तेंव्हा (त्या दिवशी) त्यांच्या (लोकांच्या) दरम्यान संबंध, नातेगोते राहणार नाही तसेच ते एक दुसऱ्याची विचारपुसही करणार नाही. मग ज्यांचे सत्कर्म जड (जास्त) असतील तेच यशस्वी (सफल) होतील. राहीले ते लोक ज्यांचे चांगले कर्म हलके

(कमी) असतील. हे तेच लोक आहेत ज्यांनी स्वताला तोट्यात टाकले. ते सदैव नर्कात (जहन्नम) राहतील. अग्नि त्यांचे चेहरे जाळेल आणि त्यामुळे त्यांचे मुख विकृत होतील."

(२३:१०१-१०४)

प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले,

"मृत्यु पावणाऱ्या सोबत तीन गोष्टी चालतात (१) त्याच्या घरचे लोक (२) त्याची संपत्ती (३) त्याचे कर्म ! मग दोन वस्तु परत फिरतील आणि एकच (शेवट पर्यंत) सोबत राहील. त्याच्या घरचे लोक आणि माल (संपत्ती) तर परत येईल आणि कर्म त्याचे सोबत राहील."

(बुखारी, मुस्लिम)

कुरआनस्पष्टोक्ती आहे,

"(त्याचे समोर) कर्म-पत्र ठेवले जाईल तेंव्हा गुन्हेगाराला बघाल की तो कर्म पत्रात जे आहे ते बघुन भित असतील व सांगतील हाय ! आमचे दुर्भाग्य ! हे कसे पुस्तक (कर्म पत्रिका) आहे ज्याने लहानात लहान गोष्ट व मोठ्यात मोठे कर्म काहीही सोडले नाही व सर्वांना आपल्या गर्भात सामावुन घेतले. जे काही त्यांनी केले असेल ते सर्व समोर बघतील. तुमचा रब (पालनकर्ता स्वयंभू ईश्वर) कुणावरही अत्याचार करणार नाही."

(१८:४९)

"त्या दिवशी प्रत्येक व्यक्ति आपल्या चांगल्या आणि वाईट कर्माला आपल्या समोर बघेल. जे काही त्याने कमविले असेल ते त्याला अगदी पुर्णपणे प्राप्त होईल आणि त्यांचे सोबत किंचीतही अन्याय होणार नाही."

(३:३०,२५)

"त्या दिवशी त्यांची (सांसारिक) धन संपत्ती तसेच संतती काहीही कामी येणार नाही."

(२६:८८)

"इतकेच नव्हे तर 'स्वत: मनुष्याचे हात, पाय, डोळे, जीभ आणि सर्व अवयव साक्ष देतील की, त्यांचे करवी कोणती कामे घेण्यात आली."

(३६:६५, ४१:२०-२४)

दिव्य कुरआनमध्ये अल्लाहने स्पष्ट आदेश दिले आहे,

"आणि कीयामतच्या दिवशी आम्ही न्यायाचा तराजु ठेवणार आणि मग कोणत्याही व्यक्तिवर यत्किंचीतही अन्याय केला जाणार नाही. जर का त्याचे कर्म मोहरीच्या (राई) दाण्या एवढे का असेना आम्ही त्याला समोर घेवुन येणार. आणि हिशेब करण्यासाठी आम्ही (अल्लाह) पुरे आहोत."

(२१:४७)

तो दिवस सत्कर्मी लोकांसाठी सहज व सोपा (सुगम) असेल तर दुष्कर्मी साठी कठीण

व कष्टाचा असेल. कुरआनची स्पष्टोक्ती आहे की,

"जो कोणी सुंदर चांगले आचरण घेवुन येईल त्याला त्यापेक्षा जास्त चांगले फळ मिळेल व असे लोक भीतीपासुन निश्चिंत राहतील. आणि जो वाईट आचरण घेवुन येईल त्याचे मुख अग्नित उपडे पडलेले असेल." (२७:८९,९०)

"मग ज्याला त्याचे कर्म पत्र त्याच्या उजव्या हातात दिले जाईल त्याचा हिशेब सोपा व हलका होईल आणि तो आपल्या लोकांकडे आनंदी मुद्रेत परतेल. राहीला तो व्यक्ति ज्याचे कर्मपत्र त्याच्या डाव्या हातात दिले जाईल ज्याला त्याने पाठीमागे टाकले असेल तो विनाशाला हाक मारेल आणि भडकत्या अग्नित जाऊन पडेल." (८४:७-१२)

"वास्तविक तोट्यात तेच लोक आहेत ज्यांनी स्वताला आणि आपल्या लोकांना कीयामतच्या दिवशी तोट्यात (नुकसानात) टाकले. लक्षात ठेवा ! हाच अगदी स्पष्ट तोटा (नुकसान) आहे." (३९:१५)

जन्नत (स्वर्ग)

स्वर्गाचे अधिकारी व पात्र तेच लोक होतील ज्यांनी आयुष्य भर केवळ अल्लाहची बन्दगी (दासता) करीत सत्कर्म केले असतील ! अल्लाहचा हा वादा आहे की,

"जे लोक ईमान धारण करतील अगर श्रध्दा बाळगतील आणि मग सत्कर्म करतील त्यांना आम्ही अशा बागेत प्रवेश देवु ज्याच्या खाली कालवे वाहत असतील जेथे ते नेहमी राहतील. अल्लाहचा वादा अगदी खरा आहे, आणि अल्लाह पेक्षा जास्त खरा व सत्यनिष्ठ दुसरा कोण असु शकतो? (कुरआन ४:१२२)

"ज्या लोकांनी श्रध्दा सुमन स्वीकारले म्हणजे इमान स्वीकारले अर्थात मुस्लिम (ईश आज्ञापालक) झाले व सत्कर्म केले त्यांच्यासाठी कधी न संपणारे फळ (सुखद मोबदला) आहे." (९५:६)

"जी शांति व संतोष अर्थात त्यांच्या नेत्र सुखाची सामग्री त्यांच्या कृत्यांच्या (कर्माच्या) मोबदल्यात देण्यासाठी लपवून ठेवण्यात आली आहे, तीची जाणीव कोणत्याही प्राण्याला नाही." (३२:१७)

"वस्तुस्थिती ही आहे की, जे लोक श्रध्दा बाळगतील आणि सत्कृत्ये करीत राहतील त्यांना त्यांचा पालनकर्ता प्रभु त्यांच्या श्रध्दे मुळे सरळ मार्गी बनवेल व त्यांचे मार्गदर्शन सन्मार्गाकडे करेल." (१०:९)

"अल्लाह त्यांच्यावर खुष (प्रसन्न) होईल व ते अल्लाहवर खुष होतील. त्यांना अल्लाहचे दर्शन सुध्दा होईल." (९८:८, ५:११९)

प्रेषित (स) यांचे कथन इब्ने माजा या हदीस संग्रह ग्रंथात अशा प्रकारे आले आहे, "माननीय जाबिर (र) म्हणतात की प्रेषित (स) यांनी सांगितले,

"स्वर्गाचे अधिकारी, सत्यभक्त स्वर्ग-सुखाचा उपभोग घेत असतील तेव्हा अचानक त्यांच्यासाठी एक तेजस्वी प्रकाश प्रकट होईल आणि हा प्रकाश बघुन जेव्हा ते आपल्या माना उंचावतील तेंव्हा बघतील की अल्लाह त्यांचा पालनकर्ता प्रभु प्रगट झाला आहे. अल्लाह फर्माविल "तुमच्या वर सलामती हो, हे स्वर्गवासी लोकांनो !"

प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले की हाच अर्थ आहे अल्लाहच्या या कथनाचा "सलाम आहे, दयावान रब ने उच्चारित केलेला" (कुरआन ३६:५८) प्रेषित (स) सांगितले की,

"अल्लाह त्या लोकांकडे बघेल आणि ते अल्लाहकडे. प्रसन्नतेची ही घटका अशी असेल की लोक अल्लाहलाच बघत राहतील व स्वर्गातील ऐश्वर्याकडे. त्यांचे लक्षही जाणार नाही. येथपर्यंत की, अल्लाह पडद्या मागे लोप पावेल म्हणेज अदृश्य होईल व फक्त त्याचा नूर (तेज, प्रकाश) कायम राहील."

(श्रध्दा ठेवणारे व सत्कर्म करणारे) अल्लाहचे परायण आणि त्याची भीती बाळगणारे सुवासिक फुल आणि मौल्यवान बक्षीसाने व्याप्त उद्यानात (बागेत) राहतील. त्यांच्यासाठी स्वर्गाचे बाग असतील. (५६:८९, १८:१०७) त्यांच्यासाठी स्वर्गाच्या उच्च व बुलंद इमारती असतील ज्यांच्या खालुन कालवे वाहत असेल. (३९:२०, २९:५८) त्यांची प्रत्येक इच्छा पुर्ण होईल व येथे ते सदा सर्वदा राहतील. (२५:१६, ४१:३१) त्यांना वास्तविक शांती आणि मोठे यश प्राप्त होईल. (४४:५९) हे उद्यानात (अर्थात स्वर्गातील) तलम, रेशीम व जरतारी वस्त्रे परिधान करून समोरासमोर बसले असतील (४४:५२,५३) आज स्वर्गातील लोक मौज करण्यात मग्न आहेत. त्यांच्या सुख ऐश्वर्याची प्रत्येक वस्तु उपलब्ध आहे. ते पत्नीसह गडद छायेत आहेत. आसनावर लोड (आराम उशी) लावुन बसले असतील. (३६:५५,५६) त्यांना सोन्याच्या कंकणांनी व मोत्यांनी शृंगारित केले जाईल. (३५:३३, ७६:२१) त्यांचे साठी सोन्या व चांदीची भांडी असतील *(४३:७१, ७६:१५, १६)*

"अल्लाहने आपल्या दासासाठी इतके ऐश्वर्य आणि सुख समृध्दीची साधने सुसज्जित करून ठेवली आहेत की, ज्यांना कोणत्याही डोळ्यांनी बघितले नाही व कानांनी ऐकले नाही तसेच कोणत्याही मनुष्याने कल्पनाही केली नाही किंवा त्याच्या मनात ज्याचा विचार ही आला नाही." *(बुखारी)*

स्वर्गात तीव्र उन्हाळ्याचा तसेच बोचणाऱ्या हिवाळ्याचा गारवा यांचा त्रास नसणार (७६:१३) फळाने गच्च झाडे असतील, अंगुर (द्राक्षे) चे बगीचे आणि आवडीचे मेवे राहतील. (७६:१३,१४:७८:३२ ७७:४२) अल्लाह सांगतो स्वर्गात आम्ही गोऱ्यापान, मृगनयनी स्त्रियांशी यांच्या जोड्या बनवू (४४:५४) त्यांच्या जवळ नजरा जपणाऱ्या सुंदर नेत्रांच्या स्त्रिया असतील. (३७:४८,४९) त्यांच्यासाठी हिरवे रेशमी गालीचे आणि सुंदर व दुर्मिळ अशी बिछाने अंथरलेली असतील. (५५:७६, ८८:१६) येथे त्यांना इच्छित मेवे आणि पेये मिळतील. पेयाचे पात्र भरून यांचे दरम्यान फिरविले जाईल. चकाकणारे पेय जे पिणाऱ्यासाठी स्वादीष्ट असेल परंतु त्याच्यापासुन त्यांच्या शरीराला काही अपाय होणार नाही तसेच त्यांनी बुध्दि देखील भ्रष्ट होणार नाही व मदहोश होणार नाही. (३८:५१, ३७:४५, ४७, ७८:३९, ३६) त्यांना शुध्द व मोहोरबंद पेय पाजले जाईल. ज्यावर कस्तुरीची मोहर लागली असेल ज्यात तसनीम चे मिश्रण असेल. (८३:२५, २७) स्वर्गात अशा पाण्याची कालवे असतील जी प्रदुषित होणार नाही. दुधाचे असे कालवे असतील ज्यांच्या स्वादामधे (चवीत) किंचीतही फरक पडला नसेल, आणि अशा पेयाची कालवे असतील जी पिणाऱ्यासाठी अत्यंत स्वादिष्ट व मजेदार असतील आणि शुध्द व स्वच्छ मधाचे कालवे वाहत असतील (४७:१५) स्वर्गातील लोकांचे चेहरे प्रफुल्लित असतील. त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे तेज जाणवेल. (८८:८, ८३:२४) ते येथे कोणतीही व्यर्थ आणि खोटी गोष्ट ऐकणार नाही. (७८:३५, ८८:११) ते चांगल्या प्रकारे सदा सर्वदा स्वस्थ व आनंदी असतील. प्रेषित (स) यांचे कथन आहे की,

"येथे (स्वर्ग) आजार रहित आरोग्य आहे, येथे मृत्यु न येणारे जीवन आहे. तारूण्य ते आहे जे कधी ढासळणार नाही. सुख ते आहे की आता पुन्हा कष्ट होणार नाही. लोकांच्या चेहऱ्यावर आपआपल्या कर्मानुसार तेज व चमक असेल, जी कुणाची ताऱ्यासारखी तर कुणाची पौर्णिमेच्या चंद्रा प्रमाणे." *(मुस्लिम)*

स्वर्गा विषयी वर्णिलेले उपरोक्त विवरण स्वाभाविकपणे प्रत्येक बुध्दिष्ट व विवेकशील व्यक्तिच्या अंतर्भनात या विषयी लालसा व उत्सुकता निर्माण करण्यास पुरे आहे. आम्हाला स्वर्गाचा अधिकारी बनण्यास गंभीर (गहन) प्रयत्न करावयास पाहीजे. संसारात (जगात) आम्हाला जी संधी प्राप्त झाली आहे तीचा ईश आज्ञापालक व सत्कर्मी बनून सदुपयोग केला पाहीजे. याच द्वारे इहलोक व परलोकात यश प्राप्त केले जावू शकते.

जहन्नम (नरक)

जहन्नम ला नरक आणि दोजख असे ही म्हटले जाते. दुष्कर्मी आणि पापाचारी लोकांचे मृत्युपश्चातचे हे वास्तव्य स्थळ होय. येथे त्यांना अत्यंत कठीण आणि कष्टदायक यातना

सोसाव्या लागतील. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"हे प्रेषित (स) यांना सांगा की, काय आम्ही तुम्हाला सांगावे अगर सुचित करावे की, कर्माच्या दृष्टीने सर्वात जास्त तोट्यात राहणारे आणि अपयशी कोण लोक आहेत? हे ते लोक आहेत ज्यांची सांसारिक जीवनाची धावपळ व्यर्थ व सरळ मार्गापासुन भ्रष्ट राहिली आणि ते समजत राहीले की, ते सर्वकाही योग्य व चांगलेच कृत्य करीत आहेत. हेच ते लोक आहेत ज्यांनी पालनकर्त्या प्रभुच्या वचनांना (आयती) मानण्यास नकार दिला आणि त्याच्या पुढे हजर होण्याचा अगर त्याची भेट होण्यावर विश्वास बाळगला नाही. म्हणुन त्यांची कृत्ये वाया गेली कारण पुन:रुत्थाना (कीयामत) दिवशी आम्ही (अल्लाह) त्यांना काहीच वजन देणार नाही. त्यांचा मोबदला जहन्नम (नरक) आहे त्या विद्रोहा मुळे (जो त्यांनी स्वयंभु भगवंताच्या प्रति स्वीकारला) आणि त्या उपहासापायी जो ते माझ्या आयतींशी व प्रेषितांशी करीत राहिले."

(१८:१०३-१०६)

"ज्या लोकांनी इहलोकात सत्याच्या नकाराची भूमिका स्वीकारली त्यांना अग्निचा पोषाख नेसविला जाईल, त्यांच्या डोक्यावर उकळते पाणी टाकले जाईल ज्यामुळे त्यांची केवळ त्वचाच नव्हे तर पोटाच्या आतील भाग देखील वितळेल. आणि त्यांचा समाचार घेण्यास लोखंडी घण असतील. जेंव्हा ते घाबरून नरकामधुन बाहेर निघण्याचा प्रयत्न करतील तेंव्हा ते परत त्यातच ढकलून दिले जातील, आणि सांगण्यात येईल चाखा आता भडकत्या अग्निच्या यातनेची चव."

(२२:१९-२२, ४४:४८, ३२:२०)

नर्काग्नि विझणार नाही आणि अपराध्यांना ते वेढुन घेईल. (१७:९७, १८:२९) अग्निच्या ज्वाला त्यांच्या चेहऱ्याला करपुन टाकतील त्यामुळे ते कुरूप होतील (२३:१०४) त्यांचे पांघरूण अंथरूण सुध्दा अग्निच राहील (७:४१)

त्यांना उकळते पाणी पाजण्यात येईल जो त्यांच्या आतड्यांचे तुकडे तुकडे करून ठेवेल. (४७:१५, १०:४) (पाणी मागितले तर) त्यांना असे पाणी देण्यात येईल जे तेलाच्या तळातील गाळा प्रमाणे असे ल जे त्यांच्या मुखाला भाजून टाकेल. (१८:२९). त्यांना खाण्यास जखमांचा पु. जक्कुम चे वृक्ष आणि विषारी काटेदार झुडपांचे जाळे हेच भोजन असेल. (६९:३५, ३६ ४४:४३,४४, ८८:६) त्यांच्या मानत गळ्याचा पट्टा टाकून ७० हात लांब साखळ दांडाने जखडून भडकल्या अग्नित टाकून दिले जातील (३४:३३, ६९:३०,३२ ७६:४) वस्तुत: नर्क एक सापळा (घात-स्थळ) आहे. उध्दत व विद्रोही लोकांचे ठिकाण ज्यात शीतलतेचा आनंद मिळणार नाही तसेच पिण्यास पेय म्हणून उकळते पाणी आणि वाहणार पु. रक्त (७८:२१, २४, २५) येथे ते आरडाओरड करतील, आर्त गर्जना करतील. बंड पुकारतील. (उष्णता व तहाने मुळे)

उसासे टाकतील व हुंकार देतील तेथे ते सदैव राहतील. जेंव्हा ते जखडलेल्या स्थितीत एखाद्या अरुंद जागेत डांबले जातील तेंव्हा ते आपल्या मृत्युला पुकारु लागतील.

(सांगण्यात येईल) "आज एक नव्हे अनेक मृत्युंना पुकारा" (११:१०६, १०७, २५:१२,१४) नरकीय लोक याही पेक्षा जास्त कष्टप्रद यातना भोगतील. ते मानसिक पिडेनेही त्रस्त होतील.

"रुजू व्हा अगर परतुन या आपल्या पालनकर्त्या स्वयंभू प्रभु कडे आणि आज्ञाकारी बना या आधी की तुमच्यावर प्रकोप व यातना येईल. मग तुमची सहायता केली जाणार नाही किंवा तुम्हाला कुठूनही मदत मिळणार नाही. अनुसरण करा त्या सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ वचनांचे जे तुमच्या पालनकर्त्याकडून अवतरित झाले आहे. या पूर्वी की तुमच्यावर अकस्मात प्रकोप येईल आणि तुम्हाला जाणीव सुध्दा नसेल." (जाण ठेवा) कदाचित असे न व्हावे की एखाद्याने नंतर म्हणावे. "खेद आहे माझ्यावर व माझ्या त्या हलगरजीपणावर जो मी अल्लाहच्या हुजूरात करीत राहीलो किंबहुना मी तर उलट टिंगल करणाऱ्यात सामील होतो." *(कुरआन ३९:५४-५६)*

सम्मति लेख/मते

आवागमनीय पुनर्जन्म हिन्दु बुध्दिला अशोभनीय :

सप्टेंबर १९९९ च्या 'कान्ति' मध्ये आपण आवागमनीय पुनर्जन्म की वास्तविकता या शिर्षका अंर्तगत पुनर्जीवन (पुनरुज्जीवन) पुनर्जन्म आणि आवागमनच्या संकल्पनेला अतिशय सुरेख आणि मनात ठसेल अशा पध्दतीने विवेचनापुर्वक प्रस्तुत केले. वेदांमध्ये ज्या परलोक चे संकेत आहेत ते एक प्रकारचे पुनर्जीवनच आहे. परंतु हिन्दु बुध्दिला या सत्याचा बऱ्याच काळापासुन विसर पडला. आपले हे म्हणणे अगदी योग्य व सत्य आहे की, तदनन्तर ही मौलिक धारणा क्षीण पडली आणि अंततः आवागमनीय पुनर्जन्माने त्याचे स्थान घेतले.

आपण राहुल सांकृत्यायन, डॉ. राधाकृष्णन, सत्यकाम विद्यालंकार इत्यादिंचे जे कथन प्रस्तुत केले. यद्यपि ते वेदांत आवागमनच्या अस्तित्वाचा इन्कार करतात परंतु पुनर्जीवनाच्या संकल्पनेला रेखांकीत करण्यात सफल झाले नाही. पं. दुर्गा शंकर महिमवत सत्यार्थी यांनी जसे स्पष्टपणे आपल्या लेखाला "वेद और पुनर्जीवन" हे शिर्षक दिले तसे प्रयत्न अतिशय कमी प्रमाणात झाले आहेत.

वैदिक साहित्या मधे पुनर्जीवनाचे (Resurrection) वर्णन आहे. नंतर त्याने पुनर्जन्माचे (Rebirth) रूप घेतले, त्यानुसार मृत्युनंतर व्यक्ति एकवेळ पुन्हा या संसारात जन्म घेतो हाच संकेत छान्दोग्य उपनिषद (५-१०-७) मध्ये ही केला आहे. हाच पुनर्जन्म कालांतराने पुराणामध्ये आवागमनची कल्पना बनला व एक व्यक्ति ८४ लक्ष योनित भ्रमण करतो असे चिन्ह रेखाटले.

आणि 'संसरति देही' आत्मा एका शरीरातून एका योनितून दुसरीमधे जातो अशी घोषणा करण्यात आली. पुराणाचा हा सिध्दान्त जन्मजन्मान्तर वाद होय. हेच हिन्दीचा 'आवा' आणि संस्कृतचा 'गमन' मिळुन आवागमन बनला. खेदजनक बाब ही आहे की, मध्यवर्ती पुनर्जन्म च्या अंतर्गत पुनर्जीवन आणि जन्मजन्मान्तर वाद ही खपविला. आज हिन्दु धर्मात पुनर्जन्माचीच गोष्ट होते परंतु त्याची व्याख्या जन्मजन्मान्तरवादानुसार केली जाते. वेदाच्या पुनर्जीवनाला सुध्दा पुनर्जन्म आणि जन्मजन्मान्तरवादाची फोडणी देवून पुनर्जन्म बनविले व तेच प्रस्तुत केले जाते. ही बौध्दिक क्षीणता हिन्दु बुध्दिला शोभनिय नाही. यापासुन सुरक्षेची गरज आहे.

वेदाच्या पुनर्जीवन संकल्पनेने प्रभावित होवुन तसेच प्रचलित पुनर्जन्माच्या (जन्मजन्मान्तरवाद) कल्पनेला वेदात न पाहुन ईसवी १९३० मधे गुरुकुल कांगडी चे पंडीत मंगलदेव (तडितकान्त) वेदालंकार यांनी 'यम और पितर' नामी एक पुस्तक लिहले. २५५ पानावर विस्तारीत या पुस्तकाला श्रीपाद दामोदर सातवलेकर यांनी प्रकाशित केले. पुस्तक प्रचलित मान्यते समोर प्रश्नार्थक चिन्ह लावते. अत: या पुस्तकाच्या मुखपृष्टावर नमूद केले की पुस्तक विक्रीसाठी नाही. पुस्तक मला माझ्या वडीलांच्या पुस्तकालयात प्राप्त झाले. ते पंडीत माधवाचार्यांचे समकालीन होते. आणि सनातन धर्माकडून आर्य समाजी लोकांशी शास्त्रोक्त चर्चा करायचे. यामुळे अशा विवादास्पद साहित्य संग्रहित करीत असायचे. नंतर कदाचित हे पुस्तक पुन्हा प्रकाशित झाले नाही. या पुस्तकात पुनर्जन्म आणि जन्मजन्मान्तराच्या कल्पनेच्या विपरीत पुनर्जीवनपुरक प्रेत जगत/परलोकाचे वर्णन आहे. परंतु पुनर्जीवन शब्दाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला नाही. मला असे वाटते की, हिन्दु विद्धानांचे बाइबल आणि कुरआन विषयी अज्ञानामुळे त्यांना पुनर्जीवनचा सिध्दान्त एकतर समजला नसावा अगर उमजला नसावा किंवा जाणीव पुर्वक या सिध्दान्ताच्या विवादापासुन स्वताला अलिप्त ठेवले. कारण वेद शास्त्रा समोर अगर तुलनेत त्यांची श्रध्दा बायबल आणि कुरआन शरीफ वर जमणे कठीण होते. 'विधर्मिय' आणि 'म्लेंच्छ' लोकांचे धर्मग्रन्थ त्यांना कसे मान्य होणार?

वैदिक 'पुनर्जीवन' ची विस्मृति, पुनर्जन्माच्या मौलिक सिध्दान्ताची जन्मजन्मांतरवादी व्याख्या आणि पुनर्जीवन, जन्मजन्मान्तरवाद या सर्वांना पुनर्जन्मातर्गत खपविण्याची अवैज्ञानिक प्रवृत्तिचे दुष्परिणाम स्वरूप हिन्दु मानसिकता पुनर्जन्माने इतकी मोहित झाली की १९७८ मधे माझी पत्नी सोमा सबलोकाचा 'सरिता' मधे प्रकाशित लेख ''आत्मा आणि पुनर्जन्म'' वर दिलीच्या तीस हजारी कोर्टात केस दाखल करण्यात आली. कारण या लेखात पुनर्जन्माच्या सत्यतेला तर्क आणि विज्ञान यांच्या कसोटीवर पडताळून रद्द करण्यात आले होते. या दाव्याला (केस) डिसेंबर १९८३ मधे कोर्टाने बहिष्कृत करीत लिहले की, 'विज्ञानाच्या या युगात आत्म्याचे आस्तित्व आणि पुनर्जन्माच्या सिध्दान्तावर संदेह करण्याचा आणि आपत्ति घेण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. कारण असे करणे वैज्ञानिक आणि सुधारवादी विचारधारा निर्माण करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे

टाकणे आहे. यासाठी भारतीय संविधानाचे कलम ५१ मधे निर्देश देण्यात आला आहे. याच उद्देशाला ध्यानात ठेवून लेखिकेने या लेखाद्वारे पाठकांना ज्ञानवान बनविण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत खेदाची गोष्ट आहे की असा प्रयत्न करणाऱ्या लेखिकेवर हिन्दूंच्या धार्मिक भावना दुखविण्याचा आरोप लावून कीत्येक वर्ष न्यायिक प्रक्रियेचे कष्ट सोसण्यास बाध्य करण्यात आले. हा लेख सत्य शोधण्याच्या दिशेने केलेला एक प्रयत्न मात्र आहे. याला जाणीवपूर्वक हिन्दुंच्या धार्मिक भावनांना आघात पोहचविणारा लेख म्हणणे कदापिही योग्य नाही. ख्रिस्ती, मुस्लिम, बौध्द आणि दुसरे अनेक धार्मिक मत आहेत जे आत्मा आणि पुनर्जन्माच्या सिध्दान्तावर विश्वास बाळगत नाही. लेखिकेने हेतुपुरस्पर कोणत्याही तऱ्हेने हिन्दु धार्मिक भावनांचा अनादर केला नाही. तसेच कोणताही गुन्हा केला नाही. तीने आत्म्याचे अस्तित्व आणि पुनर्जन्माच्या सिधान्ताला आव्हान केले आणि आपल्या मताच्या बाजुने मजबुत तर्क प्रस्तुत केलेत. तीने खरेच सांगितले की, सत्य कोणाचीही व्यक्तिगत संपत्ती नाही आणि मग हिन्दू धर्मात किंवा कायद्यात या गोष्टीची घोषणा कुठेही करण्यात आलेली नाही की आत्मा आणि पुनर्जन्मात विश्वास बाळगणे हिंदूसाठी अनिवार्य आहे. सत्य हे सर्वांची सामुहिक मिळकत आहे. *(परिच्छेद १०)*

पुनर्जीवनाच्या सत्यते विषयी ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे की यासाठी सुध्दा पुनर्जन्म आणि जन्मजन्मांतर या सारखे शब्द प्रयोगच एकमात्र आधार आहे. यासाठी तर्क आणि विज्ञान यावर आधारित पुरावे अगर प्रमाण संग्रहीत करण्याची गरज अजुनही कायम आहे. कारण आज शब्द प्रयोगाचे क्षेत्र सिमीत होत आहे. आज लोकांना पटवून देण्याची गरज आहे त्यांना विवश करणे अगर अंधश्रध्देचा प्रोत्साहित करण्याची नव्हे. आपल्या लेखनीने एक गंभीर विषयाला यथार्थ दर्शनात कोणत्याही दुराग्रहाबिना प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला. आपण लेखाच्या प्रारंभी प्रकाशित पत्राच्या उत्तरात अगदी बरोबर लिहले की, "ज्या निष्कर्षावर मी पोहचलो आवश्यक नाही की तुम्ही त्याच्याशी सहमत असावे." संवाद प्रक्रियेला चालना मिळण्यास आणि सत्या पर्यंत पोहचण्यासाठी अशा बौध्दिक उदारतेचे धोरण व प्रामाणिकतेची जेवढी आज निकड आहे कदाचित या पूर्वी कधी नव्हती. धन्यवाद

डॉ. सुरेन्द्रकुमार शर्मा 'अज्ञात'
एम. ए. (संस्कृत) पी. एच. डी. (टेक्सास, अमेरिका)
एम. ए. (हिन्दी) पी.एच.डी.
३/५७ अज्ञातवास, बंगा १४४ ५०५ (पंजाब)

आवागमन आणि पुनर्जन्म धारणा केवळ अंधविश्वास

मनुष्य हा स्वाभाविकपणे विचारशील, तर्कशील आणि जिज्ञासु प्राणी आहे. वेळोवेळी त्याच्या मन व बुध्दिची दारे बाह्य व आंतरिक जगता विषय अनेक प्रश्ने ठोठावीत असतात. उदाहरणार्थ या विशाल संसाराचा कुणी निर्माता व कर्ता आहे आणि त्याची काय विशेषता आहे? त्याचे रूप कसे आहे? आमच्या जीवनाचा उद्देश काय आहे? आमचे वर्तमान जीवन काय या पूर्वी अस्तित्वात होते? शारीरिक मृत्यु नंतर अस्तित्व रूप बदलून भविष्यात कायम राहील? चालणे फिरणे, वक्तृत्व कला, काल्पनिक व वैचारिक शक्ति अस्तित्वाची जाणीव तसेच चिन्तन मनन करण्याची आणि चांगले वाईट मधील अंतर समजण्याची क्षमता कोठुन प्राप्त झाली? इत्यादि अनेक प्रश्न व प्रतिप्रश्नांचे सत्य जाणण्याची जिज्ञासा मानविय स्वभावाचा गुणधर्म होय. अशाच प्रश्नांची संबंधीत पुनर्जन्माचा प्रश्न आहे. पुनर्जन्माविषयी जाण करून घेण्याची उत्कंठा मानविय मनाचे सत्य जाणुन घेण्याच्या दिशेने वाटचाल होय. ही गोष्ट वेगळी आहे की मानविय बुध्दी द्वारा केलेले प्रयत्न अपेक्षीत उद्देश प्राप्तीमधे यशस्वी होतात किंवा नाही. पुनर्जन्माच्या याच पुर्व स्थापित सिध्दांताला पडताळण्याचा आकर्षक, सार्थक आणि प्रशंसात्मक प्रयत्न मासिक 'कान्ति' सप्टेंबर ९९ च्या अंकात केला. यामधे विषयाशी संबंधीत जास्तीत जास्त तथ्यांना संकलित करून एकत्र आणलेच नाही तर त्यांना पडताळून आणि त्याच्यावर संरचनात्मक दृष्टीने विचाराअंती प्राप्त निष्कर्ष सुध्दा पाठकांसमोर प्रस्तुत केला आहे. या प्रयत्नामधे संपादक वर्गाचा कोणत्याही पुर्वाग्रह अगर पूर्वानुमानाने मुक्त संतुलित रचनात्मक दृष्टिकोन प्रशंषित आहे.

'कान्ति मासिकात प्रसिध्द अनेक मौलिक रचना पठनीय व मनोहर आहेत परंतु 'आवागमनीय पुनर्जन्म की वास्तविकता' शीर्षक लेख कठीण परिश्रम आणि विषयाचे गहन अध्ययन करून लिहीण्यात आले. हा लेख ज्ञानवर्धक आहे. विभिन्न धर्मातील तथ्यांना परामनोवैज्ञानिक संशोधनाच्या प्रकाशात या लेखात विषयाशी संबंधित विचारणीय आणि सारगर्भित सामग्री उपलब्ध करण्यात आली आहे. मिथ्या बौध्दिक प्रदर्शन आणि शाब्दिक आडम्बर या पासून सुरक्षित राहण्याचा भरपूर प्रयत्न करीत अगदी सोप्या भाषेत या विषया विषयी तर्क सम्मत आणि बौध्दिक प्रतिपादन विश्लेषण अगदी स्पष्ट परंतु सरलतेने करण्यात आले आहे. या सुरचनात्मक प्रयत्नासाठी संपादक मण्डल खरोखर अभिनंदनास पात्र आहे. आम्हाला भविष्यात असेच अजुनही उत्कृष्ठ प्रयासाची आवश्यकता आहे.

आपल्या प्रकाशनची उत्कृष्ट, सजीव आणि गौरवशाली परंपरेनुसार या अंकात प्रतिपाद्य आणि विवेच्य विषयाचे वैज्ञानिक तर्कसंगत पध्दतीने तथ्यपरक विश्लेषण करण्यात आले आहे. अंकातील 'आवागमनीय पुनर्जन्म की वास्तविकता' लेख अत्यंत सारगर्भित (उदबोधक) विचार करण्यास प्रवृत्त करणारे व ज्ञानात वृध्दि करणारे आहे. यामधे विभीन्न धर्मग्रंथातील सामग्री सप्रमाण प्रस्तुत करून विद्वानांचे तर्कांच्या प्रकाशात विषय निर्देशनामुळे अंकाची उपयोगिता अनेक पटीने वाढली आहे.

जगात असे धर्मदर्शन सुध्दा आहे ज्यात मानव जीवनाच्या मृत्युनंतर ईश्वरांशीभूत जीवात्माचे गुण कर्मानुसार पुनर्जन्म आणि आवागमनच्या सिध्दान्ताचे विस्तारपूर्वक प्रतिपादन आणि निरूपण करण्यात आले आहे. पुनर्जन्मवादी लोकांच्या मान्यता व श्रध्देनुसार प्राण्याचे भावी जीवन त्याच्या चांगल्या वाईट कृत्यावर अवलंबून असते आणि यानुसार त्याचा पुनर्जन्म होतो. या मानव पुनर्जन्माला प्रतिपादित करणाऱ्या विभीन्न धर्मात अनेक प्रकारच्या व्याख्या आणि कथा प्रचलित आहेत. यानुसार शारीरिक मृत्युने मानविय जीवन प्रवाह संपत नाही तर तो रूप बदलुन बदलुन मृत्युनंतर निरन्तर अविच्छिन्न रूपाने प्रवाहमान तसेच गतिशील राहतो.

वर्तमान परिस्थितीत विभीन्न पत्रपत्रिका प्रामुख्याने खळबळजनक आख्यायिका (गोष्ट/कहानी) छापणाऱ्या मासिकात बहुधा पुनर्जन्म विषयी घटना वाचावयास मिळतात. या विषयी कहानीकार लेखक, संपादक आणि प्रकाशक दावा करतात की ही सत्य बातमी सुचना आणि वास्तविक विश्वसनीय तथ्यांवर आधारित आहे. अशा प्रकारच्या पुनर्जन्म कथेत साधारपणे हे दाखविण्यात येते की, अमुक जिल्ह्याच्या अमुक गावी एक दोन वर्षाचे कुशाग्र बुध्दिचे असे बाळ आहे ज्याची स्मृती अतिशय तीक्ष्ण आहे. त्याला पूर्व जन्माच्या गोष्टी अगदी तंतोतंत कंठस्थ आहेत. मागील जन्मात त्याचा मृत्यु गोळी लागल्या मुळे झाला होता त्याचे निशान त्याच्या शरीरावर या जन्मातही अस्तित्वात (उपलब्ध) आहे.

प्रथम बाळाच्या मुखाने तोतऱ्या भाषेत पुर्व जन्माचे वृतान्त ऐकून आई वडीलांना विश्वास आला नाही. परंतु जेंव्हा ते बाळाला घेवून पूर्वजन्मीच्या गावी गेले असता गावाची पाऊल वाट, शेती पीके आणि आपले मातीचे भांडे व कच्चे घर व परिजनांना बघून ओळखले. वगैरे वगैरे ! खळबळजनक सत्यकथा माहवार छापुन फायद्याचा चांगला व्यवसाय करणाऱ्या या पत्रिकांच्या माध्यमातून पुनर्जन्मासंबंधी गोष्टी वाचनामुळे अनेक प्रश्न प्रतिप्रश्नांची उत्पत्ती स्वाभाविक आहे. प्रथम हा आहे की, एक दोन आणि तीन वर्षाच्या बाळाची बुध्दि आणि त्याची स्मरण शक्ती कीती तीक्ष्ण आहे की, आपल्या जन्मापूर्वीच्या सर्व घटना पुढच्या जन्मात ही आठवतात? मनुष्याचे मन, बुध्दि, स्वप्ने, मानसिक भावना, मानसिक चिकीत्सा, मानसिक विकृति, मनोविकार यांचे अध्ययन करणाऱ्या मानसशास्त्रा जवळ याचे उचित, संतोषजनक आणि युक्तिसंगत उत्तर उपलब्ध नाही की, पुर्वजन्म कसे आणि का होते तसेच हे सत्य आहे किंवा नाही? पुर्व जन्मीच्या घटना लहान बाळानांच का आठवतात? काय या गोष्टीची संभावना आहे की, एक मृत व्यक्ति ज्याचे पार्थिव शरीर दाह संस्कारात चीतेची राख होवुन विलीन झाल्यावर एक दुसरा आगामी जन्म ग्रहण करेल आणि दिवंगत जीवनाच्या सर्व घटनां सुक्ष्म अदृश्य आठवणीच्या रूपाने पुढील जन्मात पोहचतील?

पुनर्जन्मावर विश्वास बाळगणाऱ्या लोकांच्या मते व्यक्ति पुढच्या जन्मात आपल्या चांगल्या आणि वाईट कर्मानुसार ८४ लक्ष योनि पैकी कोणत्याही योनित जन्म धारण करू

शकतो. परंतु आनुवंशिकतावादी वैज्ञानिक आणि मानस शास्त्रज्ञ यांच्या मतानुसार बीज ज्या वस्तुचे आहे त्या मधुन तीच वस्तु उत्पन्न होते. उदाहरनार्थ आंब्याच्या बीजापासुन आंबा तर पेरुच्या बीजापासून पेरूच निर्माण होईल. हे सर्वथा अशक्य आहे की, मनुष्याच्या विर्यापासून सिंह आणि सिंहाच्या विर्यापासून गाढवाची उत्पत्ती व्हावी. वस्तुस्थिती ही आहे तर मग हे कसे शक्य आहे की, पुर्व जन्मात मनुष्य रूपात जन्मलेला व्यक्ति स्वकर्म फळानुसार पुढील जन्मात कुत्रा, मांजर, कोल्हा किंवा जिराफ चे शरीर ग्रहण करेल?

वास्तविक पुनर्जन्म संबंधी कथा गोष्टीत राई इतकाही सत्याचा अंश नसतो आणि मानविय मनोरंजनाच्या साधना पेक्षा जास्त यांचे महत्व नाही. काही लोक हलकी लोकप्रियता प्राप्त करण्याच्या उद्देशाने आपल्या परिवाराच्या एखाद्या मुलाला घेवुन त्याच्या पुनर्जन्माची असत्य कपोलकल्पित गोष्ट प्रचारित करतात. यामुळे समाजात अंधश्रध्देला प्रोत्साहन मिळते.

आवागमनीय पुनर्जन्माला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. अनेक संशोधक शास्त्रज्ञांनी आपल्या संशोधन आणि अध्ययनच्या आधारावर आवागमनच्या पुनर्जन्मवादी सिध्दान्ताला निराधार आणि काल्पनिक सिध्द केले आहे. विस्मयकारी बाब तरी ही आहे की अनेक बुध्दिजीवी आणि शिक्षित लोक सुध्दा पुनर्जन्माच्या कपोलकल्पित सिध्दांताला चिटकून आहेत.

आवश्यकता ही आहे की, अशा प्रकारच्या अंध विश्वासापासुन शक्य तितक्या शिघ्रतेने मुक्त होवुन जीवना संबंधी सन्तुलित, सकारात्मक आणि सुचिंतित दृष्टिकोन स्वीकारवे.

विद्या प्रकाश

(पत्रकार) अचला घटा मार्ग सिपाह, जौनपुर २२२००१ (उ. प्र.)

प्रशंसनीय (सराहनीय) प्रयास,

'आवागमनीय पुनर्जन्म की वास्तविकता' विशेष रूपाने अतिशय आवडला. यामधे लेखकाने विभीन्न धर्मीयांच्या विचारांना समाविष्ट केले आहे. लोकांना माहिती देण्याचा हा एक प्रशंसनीय प्रयास आहे. 'कान्ति' नोव्हेंबर ९९ चा अंक ही मिळाला. पुनर्जन्म या विषयावर आधारित लेख अतिशय चित्ताकर्षक आणि माहिती पुरविणारे सिध्द होत आहे. वाचकाद्वारे प्रकाशित लेख निश्चीतपणे समाजाच्या चुकीच्या धारणांचे (कल्पना) निराकरण करतात. 'कान्ति'चा हा प्रयत्न अपूर्व आणि नुतन आहे कारण यापूर्वी आज पर्यंत संभवत: कोणत्याही हिन्दी पत्रिकेने प्रकाश टाकला नाही. या अंकामधे प्रकाशित डॉ. सुरेन्द्र कुमार शर्मा 'अज्ञात' यांचे आवागमनीय पुनर्जन्म हिन्दु बुध्दिला (मनीषा) अशोभनीय आहे.'' डॉ. मुहम्मद अहमद यांचा विवेचनापूर्ण (मीमांसात्मक) लेख 'स्वामी दयानन्द सरस्वती यांचे पुनर्जन्म प्रकरण' लेख अतिशय आवडले.

'पुनर्जन्मा' सारखा महत्वपूर्ण विषय पूर्ण झाल्यानंतर जर समाजाची एखादी ज्वलंत समस्या जसे, हूंडा प्रथा (दहेज), भूत प्रेत (पिशाच्य बाधा) सारखा अंधविश्वास, पत्थर (दगड) पुजा सारख्या अन्य विषयाच्या विवरणाला पत्रिकेत स्थान देण्यात आले तर देशामधे व्याप्त कुपध्दती कमी करण्यात 'कान्ति' चे मोलाचे योगदान होवु शकेल. पत्रिकेच्या स्तरामधे दिवसेंदिवस होत असलेल्या सुधाराबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी आहोत. पत्रिकेच्या यशस्वीते प्रति शुभकामना करतो.

राजकुमार सोनकर
शास्त्रज्ञं (वैज्ञानिक)
पो. बॉक्स ४६४ नागपुर ४४० ०१०

'तर्कशील' ला सुध्दा पुनर्जन्माच्या घटना असत्यच आढळल्या!

आपण 'कान्ति' सप्टेंबर ९९ च्या अंकात डॉ. महाराज कृष्ण जैन यांच्या पत्राचे उत्तरा अंतर्गत 'विशेष प्रस्तुति' मध्ये जे विचार आणि तर्क प्रस्तुत केलेत ते वाचल्यानतंर निष्पक्ष विचार केला तर कोणत्याही शंका कुशंकाला स्थान राहत नाही. या प्रस्तुति मध्ये धर्मग्रंथांच्या हवाल्याने आपण सत्य अचुक दृष्टिकोन अगदी सुरेख पध्दतीने पुर्ण संशोधन करून प्रस्तुत केला याबद्दल आपण अभिनंदनास पात्र आहात.

उक्त लेख कीती परिश्रमाने तयार करण्यात आला याची जाणीव एका श्रेष्ठ अध्ययनाने होवु शकते. पुनर्जन्म आणि पुनर्जीवन विषयी मी आपल्या मताशी सहमत आहे. पुनर्जन्मा विषयी जे विचार ऐकावयास आणि वाचावयास मिळतात त्यांच्या मागे मनुष्याचा यथार्थवादी स्वार्थ दडलेला असतो. या विचारांना पडताळल्यास सत्य तथ्य प्रकट होते आणि त्यांची असत्यता सिध्द होते. अशा प्रकारच्या अनेक घटना ज्या असत्य सिध्द झाल्या त्यांचा 'तर्कशील संस्थेन' आपल्या मासिकात (तर्कशील) बऱ्याच आधी पूर्ण संशोधनासह प्रस्तुत केले आहे. पुनर्जन्माच्या सर्व घटना मध्ये जे प्रश्न विचारण्यात आलेत त्या पैकी एकाचेही अचुक उत्तर मिळत नाही.

पुनरूजीवनाची संकल्पना बुध्दिला पटते की एक दिवस आमचा ईश्वर चांगले व वाईट यांना पारखुन न्याय करेल. पापी (दुराचारी) व्यक्तिला दंड आणि सत्कर्मीला बक्षीस देईल. हे पुनर्जीवना शिवाय संभव नाही. या शिवाय सत्य आणि असत्याची ओळख होवु शकणार नाही.

मुहम्मद शरीफ
प्रवक्ता, पंजाबी इस्लामिया सिनीयर सेकेन्ड्री शाळा,
मालेर कोटला (पंजाब) पिन - १४८ ०२३

पुनर्जन्मावर चर्चा (बहस)

मान्य करणे अगर न करणे ह्या बाबतीत सर्वच स्वतंत्र आहेत. अत: माझी सुध्दा आपल्या तर्का द्वारे आपणास पुनर्जन्माचीच भावना हवी आहे. हा पुरावा (प्रमाण) होणार नाही. आम्ही मात्र पुनर्जन्माला मानतो. मला हे स्वीकारण्यास यत्किंचीतही संकोच वाटत नाही की पुनर्जन्माला स्वीकारून मी ही आकांक्षा बाळगतो की, आमचा कोणताही पुनर्जन्म होवू नये. जन्माचे आवागमन दुखदायी आहे.

जोगेश्वरी सधीर
एस ५६५, नेहरू नगर भोपाळ (म.प्र.)

उत्कृष्ठ प्रस्तुति

'कान्ति' चा नविन अंक (सप्टेंबर ९९) प्रात झाला. सर्वच लेख प्रशंसनीय आहेत. 'पुनर्जन्म की वास्तविकता' हा लेख शास्त्रोक्त प्रमाण, कथा, असत्य विश्वास यांच्या प्रकाशात अतिशय तर्कशुध्द पध्दतीने तयार करण्यात आला आहे. सम्पादकाच्या प्रतिभेचे हे उत्कृष्ठ उदाहरण होय. माझा स्वताचा प्राचीन इतिहास विषयाशी संबंध राहीला आहे. भारतीय धर्म, संस्कृति यांच्या विविध भागावर बरेच अध्ययन कार्य मी केले आहे. एका विशेष विचारधारेच्या अंकात हिन्दू धर्माच्या प्रकाशात विश्लेषणात्मक प्रस्तुतिने अत्यंत छान वाटले. पुनर्जन्मावर विशेष आयोजन पत्रिकेचे महत्वात भर घालतो आणि पत्रिकेचे अखिल भारतीय स्वरूप दर्शवितो. ईश्वर चरणी प्रार्थना आहे की अंक यशस्वी होवो.

डॉ. चंद्रमौलि त्रिपाठी
प्रवक्ता, प्राचीन इतिहास
मनोरमा शुक्ला चे मकान, श्री टॉकीज जवळ, दक्षिणदार
(दरवाजा) जुनी वस्ती - बस्ती (उ. प्र.)

(मैं भी ऐसा ही प्रश्न पूछना चाहता था) मी सुध्दा असाच प्रश्न विचारू इच्छित होतो

आवागमन आणि पुनर्जन्माविषयी वाचले. खरेच हे एक तथ्यपरक विश्लेषण आहे. आपण अतिशय सुरेख पध्दतीने डॉ. महाराज कृष्ण जैन यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. आपल्या या रचनेद्वारे माझी मोठी समस्या निरस्त झाली. मी स्वत: आपणास पत्राद्वारे पुनर्जन्माविषयी विचारणार होतो. परंतु माझ्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे आपल्या उक्त रचनेत मला मिळाली. आपण या रचनेच्या माध्यमातून हे सिध्द केले की, मनुष्याला पुनरूज्जीवन अवश्य मिळेल. तो हश्र (प्रलय दिवस) च्या मैदानात आपले कर्म फळ घेवुन उभा असेल परंतु त्याला पुनर्जन्म मिळणार नाही. या रचने विषयी मी आपणास हार्दिक शुभकामना प्रस्तुत करू इच्छितो. कृपया माझ्या तर्फे अभिनंदन स्वीकारावे.

अमजद रफीक
केलोगेट मालेर कोटला १४८ ०२३ पंजाब

'कस्पित' (काल्पनिक)

माझे वय ९७ वर्षाचे आहे. मी हिन्दू धर्म ग्रंथाचे जे अध्ययन व मनन केले आहे त्यापासुन आवागमन आणि पुनर्जन्म याची तार्किकता स्पष्ट होवू शकली नाही. ह्या तर सर्व कल्पित वस्तु वाटतात कान्तिची प्रस्तुति श्रेष्ठ आहे.

स्वामी महेश्वरानंद

बेलवादम्मार, बलरामपुर (उत्तर प्रदेश)

अद्‌भुत कार्य

आपण आपल्या प्रकाशनात माझ्या विचारांना स्थान दिल्याबद्दल धन्यवाद, आपण पुनर्जन्मावर विस्तारपूर्वक विचार प्रस्तुत करून अद्‌भुत कार्य केले आहे.

डॉ. एल. पी. मेहरोत्रा एम.ए.पी.एच.डी. अवकाश प्राप्त निदेशक शिक्षा मनोविज्ञान शाळा उ. प्रदेश अलाहाबाद लेखक "पुनर्जन्म भी होता है"?

संपर्क : १२/१, सेक्टर ए, पाकेट ए,

वसंत कुंज, नवी दिल्ली - ११० ०७०.

तर्कपुर्ण विचार

'कान्ति' चा प्रत्येक अंक मनावर अमीट छाप सोडणारी सामग्री प्रस्तुत करणारा आहे. आवागमन असा विषय आहे ज्याच्या विषयी मत भिन्नता आहे. 'कान्ति' च्या विचारांशी सहमत होणे अगर न होणे हे सर्वस्वी आपल्या अधिकारात आहे परंतु ते विचार आहेत अगदी तर्कपूर्ण.

डॉ. राम सनेही लाल शर्मा 'यायावर'

रीडर, शोध आणि पदवीधर विभाग एस. आर. के. (पी.जी.)

कॉलेज, फिरोजाबाद - २८१२०३ (उ.प्र.)

इतना अध्ययन (व्यापक अभ्यास)

पुनर्जन्मावरील अभ्यास व त्यासाठी घेतलेल्या कठीण परिश्रमाबद्दल आपणास अनेकानेक धन्यवाद इतके गहण अध्ययन तर हिन्दू लोकांचे सुध्दा नाही.

अर्जुन लाल नरेला

एम. ए. (दर्शन शास्त्र) एल. एल. बी.

१५४, नविन बाजार, नीमच - २ (म. प्र.)

(भ्रांतिया दूर हुई) शंकाचे समाधान झाले

पुनर्जन्म आणि आवागमन वरील लेख वाचुन माझ्या शंका-कुशंका दूर झाल्यात. मी या लेखान्वये पुनर्जन्म आणि पुनरूज्जीवन या मधील अंतर (फरक) चांगल्या प्रकारे समजले.

हश्रच्या दिवशी (महा-प्रलय दिन) मनुष्याला आपल्या कर्माच्या आधारावर जन्नत (स्वर्ग) आणि दोज़ख (नरक) प्राप्त होईल या संकल्पनेवर माझा पूर्ण विश्वास आहे.

शंकुतला देशमुख, मुंगावली (म. प्र.)

(जिसका वजुद ही नही)

ज्याचे अस्तित्वच नाही

आपण माझे पत्र आणि त्याच्या उत्तरादाखल एक सविस्तर निबन्ध प्रकाशित करून मला जी इज्जत व प्रतिष्ठा प्रदान केली त्या बद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

मला या गोष्टीवर हसू येते की, ज्याचे अस्तित्वच नाही त्याचे वर विद्वान लोकांनी विचार, वाचन आणि लिखाणात आपला वेळ का खर्ची घालवावा? चर्चा त्याची व्हावी ज्याचे अस्तित्व आहे. ज्याचे अस्तित्वच नाही त्याचा इंकार करने यात काय अर्थ आहे. हा एक विरोधाभास आहे. बरे असो!

राहीली गोष्ट पुनर्जन्माची ! तर भगवान बुध्दांनी तर या प्रश्नालाच असंगत म्हटले होते. आम्ही सुध्दा असाच विचार बाळगतो.

डॉ. महाराज कृष्ण जैन
संचालक कहानी लेखक महाविद्यालय
'शुभ तारिका' (मासिक)
ए-४७ शास्त्री कालोनी अंबाला छावनी १३३००१ (हरियाणा)

प्रतिक्रिया

एखादे सुतर्क सुध्दा प्रस्तुत करावे

आवागमन आणि पुनर्जन्म विषयावर कान्ति मासिकाच्या सप्टेंबर आणि नोव्हेंबर १९९९ च्या अंकात प्रसिध्द विचार सामग्री वर आम्हाला अनेक सुज्ञ पाठकांचे विचार, सुचना आणि प्रतिक्रिया प्राप्त होत होत्या. या बद्दल सर्व पाठकांना धन्यवाद. नोव्हेंबर ९९ च्या अंकात पत्रावर आधारित सामग्री प्रकाशित सुध्दा केली आहे. या सर्व ज्ञान सामग्रीस संपादित करून या पुस्तकाच्या प्रथम आवृत्ती मधे प्रकाशित करण्यात आले आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर मागील काही महिन्यात आम्हाला जी पत्रे मिळाली त्या पैकी काहींचा येथे उल्लेख करणे आवश्यक वाटते. या पत्रामधे सर्वात जास्त सविस्तर पत्र डॉ. एल. पी. मेहरोत्रा (१२११ सेक्टर ए, पाकेट ए वसंत कुंज दिल्ली) यांचे होय. डॉ. मेहरोत्रा यांनी ''पुनर्जन्म' भी होता है'' नामी पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाच्या अनेक तथ्यांचा समीक्षात्मक उल्लेख कान्ति सप्टेंबर ९९ च्या अंकात करण्यात आला आहे.

आम्ही येथे डॉ. मेहरोत्रा यांच्या पूर्व पत्राला प्रस्तुत करण्यात असमर्थ आहो. परंतु त्यांच्या तर्काची समीक्षा येथे अवश्य करणार म्हणजे वास्तविकते पर्यंत पोहचण्यास सोइस्कर होईल. डॉ. मेहरोत्रा पत्राचा आरंभ करून लिहितात.

'कान्ति' मध्ये 'आवागमनीय पुनर्जन्माची वास्तविकता' या शीर्षकाचा जो लेख प्रकाशित झाला तो यथार्थत: (वास्तविकपणे) उद्‌बोधक आणि प्रशंसनीय आहे. या आकर्षक लेखासाठी डॉ. मुहम्मद अहमद अभिनंदनास पात्र आहेत. हिन्दु धर्मा विषयी त्यांचे अध्ययन प्रशंसनीय आहे. त्यांनी आपल्या तर्क वितर्काद्वारे हे सिध्द करण्याच्या प्रयत्न केला आहे की पुनर्जन्म एक मिथ्या (असत्य) तथ्य आहे. परंतु त्यांचे हे म्हणणे की, 'सर्व तथ्य, तर्क आणि साक्ष्य आवागमन व पुनर्जन्म यांचे विरोधात आहे तसेच पुनर्जन्माची कोणतीही घटना प्रमाणित सिध्द होत नाही. योग्य वाटत नाही. मी स्वत: पुष्कळशा अशा मुलांचे अध्ययन केले आहे ज्यांना आपल्या पुर्व जन्माची आठवण होती. डॉ. अहमद यांच्या लेखात माझ्या पुस्तकाची ही चर्चा आहे परंतु असे वाटते की त्यांनी माझ्या पुस्तकाचे अध्ययन निष्पक्ष भावनेने केले नाही. नाहीतर ते इतक्या दृढ विश्वासाने हे सांगु शकले नसते की, पुनर्जन्म होत नाही.

डॉ. मेहरोत्रा यांच्या उपरोक्त कथना ने ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे की, महोदय पुनर्जन्माच्या कल्पनेवर अंतिम (निर्णायक) शब्द लिहीत आहेत आणि त्यांना दृढ विश्वास आहे की आवागमनीय पुनर्जन्म होतोच ! डॉ. मेहरोत्रा आपल्या 'पुनर्जन्म भी होता है' या पुस्तकाचा वारंवार उल्लेख करतात. याच पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. मेहरोत्रा काय लिहतात हे बघा.

''माझ्या द्वारे या पुस्तकात पुनर्जन्मा विषयी जे विचार व्यक्त करण्यात आले आहेत ते या विषयावर अंतिम वाक्य नाही. हा विषय विवादास्पद आहे आणि या विषयी अजून संशोधनाची गरज आहे.'' (पान ४)

याच पुस्तकाच्या पान नं. १५९ वर डॉ. मेहरोत्रा लिहतात.

''पुनर्जन्म क्षेत्राशी संबंधित अजुनही कीत्येक संशोधनाचे विषय आहेत. उदाहरणार्थ पुनर्जन्मित बालकांमध्ये एखाद्या कार्य अथवा कलेची आवड, एखाद्या विशीष्ट प्रकारच्या भोजनात रूचि, उच्च कुळातुन (वंश) निम्न कुळात जन्म अथवा याचे विपरीत, धनी पासून निर्धन परिवारात जन्म अगर याचे विपरीत, योनि परिवर्तन, मुलींच्या तुलनेत मुलांमधे जास्त पुनर्जन्माच्या आठवणी, पशुयोनि पासून मनुष्य योनित जन्म किंवा याच्या विपरीत, जनसंख्या वृध्दि इत्यादि. या विषयावर सुनियोजित पध्दतीने संशोधन करण्याची आवश्यकता आहे. यद्यपि भारतीय दार्शनिक आणि पंडीतांनी यांच्या कारणांची विस्तीर्ण व्याख्या केली आहे. परंतु आजचा शिक्षीत वर्ग या सर्वांसाठी तात्विक सिध्दातांचे प्रमाण मागतो. आणि हे तेंव्हाच शक्य आहे जेंव्हा आजचा वैज्ञानिक या प्रश्नांची उत्तरे शोधण्यास सतत प्रयत्नशील राहतील.''

डॉ. मेहरोत्रा यांचे उपरोक्त कथन काय आवागमनीय पुनर्जन्मावर प्रश्नार्थक चिन्ह लावत नाही? अन्य संशोधक सुध्दा या विषयावर दृढ विश्वास बाळगत नाही. स्वत: डॉ. मेहरोत्रा काय लिहतात बघा.

"अनेक वर्षापासून पुनर्जन्मावर संशोधन करणारे माझे विद्वान मित्र डॉ. जमुना प्रसाद यांचेशी पुनर्जन्म सिध्दांताच्या प्रामाणिकते विषयी संबंधित संभावित संशोधनाच्या विषयावर कीत्येक वेळा चर्चा झाली. त्यांचे म्हणणे आहे की, जर पुनर्जन्म होत असेल तर त्याच्या पृष्ठभूमि मधे एखादा नियम अवश्य असेल. हा नियम काय आहे? याचे संशोधन करणे अत्यंत निकडीचे आहे. या मागे कोणते मॅकेनिज्म आहे?" (पान १६०)

सत्य हे प्रत्येक स्थितीत सत्यच राहणार त्यावर असत्याचे कीतीही आवरण घालण्याचा प्रयत्न केला तरी ते जास्त काळ टिकविले जाऊ शकत नाही. डॉ. स्टीवेन्सन विषयी डॉ. मेहरोत्रा लिहतात की, ते ख्रिस्ती असल्यामुळे मुस्लिमांना प्रमाणे (आवागमनीय) पुनर्जन्मा मधे निष्ठा बाळगत नाही. यामुळे त्यांना स्पष्ट मत व्यक्त करण्यात संकोच होतो. (पत्र पान १)

हा डॉ. स्टीवेन्सन वर आरोपच म्हणावा लागेल. कारण डॉ. स्टीवेन्सन उच्च कोटीचे विद्यार्थी होते आणि जगात पुनर्जन्मावर त्यांनीच सविस्तर अनुसंधान (तपास किंवा शोधकार्य) केले आहे. परंतु त्यांच्या संशोदनात्मक निष्कर्ष्यांना त्यांच्या व्यक्तिगत धार्मिक मान्यतेशी संलग्न करणे त्यांच्या शोध कार्याला नष्टच करणे नव्हे तर हा अन्याय सुध्दा आहे. अनुसंधान (संशोधन) तर अनुसंधान असते त्याची दिशा आणि स्वातंत्र्य बाधित करायला नको.

डॉ मेहरोत्रा दुहेरी भाष्य करून लिहतात की, "डॉ. स्टीवेन्सन यांनी (अनेक देशाची) तीन हजार पेक्षा जास्त बालकांचे अध्ययन केले आहे. जर त्यांना विश्वास नसता तर मग त्यांनी या बालकांच्या अध्ययनात इतका वेळ आणि संपत्ती खर्च केली नसती." (पत्र मान १.२) हा अगदी पोरकट तर्क आहे. अनुसंधान तर अनुसंधानच असते. पूर्वी पासून काही माहीत आहे तर मग अनुसंधान (संशोधन) कसले ? संशोधनाचा जर वास्तविकतेशी मेळ बसला तर त्यात आश्चर्य अगर चिंता व्हायला नको.

सत्याची जाणीव अगर अनुभूति डॉ. मेहरोत्रा यांना सुध्दा आहे. ते लिहतात, "डॉ. स्टीवेन्सन काही पाश्चिमात्य विद्वान या दिशेने (पुनर्जन्म स्थापन्याच्या दिशेने) संशोधन करीत आहेत. त्यांनी या सर्वांची व्याख्या आपल्या पुस्तकात "Children Who Remember Previous Lives" मधे दिली आहे. परंतु ते स्वत: निश्चीतपणे पूर्णतया कोणत्याही निष्कर्षावर पोहचले नाही. शक्यता आहे भविष्यात ते आपल्या संशोधनाद्वारे या समस्येचे प्रामाणिक प्रमाण प्रस्तुत करण्यात यशस्वी होतील. आणि यद्यपि त्यांचे स्पष्ट मत आहे की काही असे विषय आहेत (जसे पशु योनि पासुन मनुष्य योनित जन्म घेणे) ज्यांना सत्य सिध्द करणे असंभव आहे." *(पुनर्जन्म भी होता है ? पान १५९)*

(एक और भ्रांति) एक आणखी शंका

डॉ. मेहरोत्रा यांनी माझ्याकडे (लेखकाकडे) पाठविलेल्या पत्रात अवास्तविकते वर आधारित एक आणखी तथ्य निरुपण केले आहे. पत्राच्या पान नंबर (२) दोन वर ते लिहतात. "लेबनान आणि टर्की तर मुस्लिम बाहुल्य देश आहे आणि तेथील मुस्लिम अशा मुलांच्या अध्ययनात पुर्ण आवड दाखवितात आणि अध्ययनकर्त्यांचे मनापासुन स्वागत करतात. मुस्लिम परिवाराच्या बालकांमध्ये पुर्व-जन्मीच्या आठवणी आढळून आल्यामुळे मुस्लिमांनाही यामधे विश्वास होवू लागला. जरी सध्या त्यांची संख्या खुप जास्त नाही."

डॉ. मेहरोत्रा यांच्या उपरोक्त कथनाची सत्यता पडताळून बघू या. लेबनान मधे ज्या कथित पुनर्जन्मित मुलांचा हवाला डॉ. मेहरोत्रा देतात ते मुस्लिम नाही तर ते 'ड्रियुज' (Druze) लोक आहेत. यांच्याकडे पुनर्जन्माला मान्यता प्राप्त आहे. परंतु त्यांच्या धारणेनुसार मनुष्य योनि बदलत नाही तर मृत्यु नंतर त्याचा जन्म मनुष्य योनितच होईल. 'ड्रियूज' लोक आपली नावे अरबी भाषेत ठेवतात. आणि हे स्वाभाविक आहे कारण त्यांची मातृभाषा अरबी आहे. केवळ त्यांच्या नावाच्या आधारावर त्यांना मुस्लिम म्हणणे अतिशय असत्य आणि अन्याय होय.

'ड्रियूज' परिवारात पुनर्जन्म एक प्रथा अगर परंपरेच्या रूपात उपलब्ध आहे. याला संस्कार म्हटल्यास अनुचित होणार नाही. ब्रिटेन चे वरिष्ठ मानसशास्त्रज्ञं डॉ. ग्रेसफ्रेंड यांना आश्चर्याचा धक्का बसला जेंव्हा बेरूतच्या एका शाळेतील एका वर्गाची जी मुले त्यांना भेटली ती सर्व पुनर्जन्माची दावेदार होती. त्यांची संख्या ५० ते ६० च्या दरम्यान होती. त्यांनी अध्ययन आरंभ केल्यावर बराच वेळ व पैसा खर्च करूनही निराशाच पदरी पडली. एका एका व्यक्तिचे दोन दोन पुनर्जन्मी दावेदार सुध्दा समोर आलेत, जणुकाही आत्माच विखुरलेला आहे.

डॉ. ग्रेसफ्रेंड यांना रमीज़ आणि रबीहा नावाचे दोन सशक्त केस मिळाले. रमीज स्वत:ला पेप्सी कंपनीचा वाहक (वाहन ड्रायव्हर) तर रबीहा स्वताला फुटबाल खेळाडू साद दिलालीचा पुनर्जन्म सांगत होता. परंतु तपासा अंती कळाले की पेप्सी कंपनीत रमीज़च्या सांगितलेल्या नावाचा कोणताही व्यक्ति काम करीत नव्हता. तसेच फुटबाल खेळाडु विषयी माहिती रबीहा जवळ नव्हती.

याच प्रमाणे टर्की (तुर्की) मधे ज्या मुलांच्या कथित पुनर्जन्माच्या हवाला डॉ. मेहरोत्रा देतात ती अनेक मुले नाहीत. अपितू एकाच मुला विषयी ही अफवा पसरविण्यात आली ती सुध्दा अनेक दशकापूर्वी.

पाश्चिमात्य प्रचार माध्यमांनी अडाना जिल्ह्याच्या इस्माईल विषयी असत्य कहानी घडून अफवा पसरविली होती परंतु तेथे उल्लेखित गाव आणि इस्माईल दोघेही सापडले नाही. टर्की मध्ये सुध्दा कोणत्याही केसची पुष्टि होवु शकली नाही.

कोणताही मुस्लिम आवागमनीय पुनर्जन्मामधे विश्वास बाळगत नाही. त्यांचा या अर्थाने पुनर्जन्मावर दृढ विश्वास आहे की मृत्यु पश्चात अल्लाह सर्व लोकांना पुन्हा जीवंत करेल आणि त्यांच्या कर्मानुसार स्वर्ग आणि नरक प्रदान करेल.

हा तर काही तर्क नव्हे !

डॉ. मेहरोत्रा यांना पुनरुज्जीवन आणि आवागमनीय पुनर्जन्मात कोणतेही अंतर दिसून येत नाही. वास्तविक पुनरुज्जीवनाचा अगदी स्पष्ट अर्थ हा आहे की, एक आणखी जीवन आणि आवागमनीय पुनर्जन्माचा अर्थ आहे पशु, पक्षी, मनुष्य इत्यादि ८४ लक्ष योनित वारंवार जन्म घेणे.

दिव्य कुरआनच्या अल आराफ या अध्यायाच्या २९ व्या आयातीमध्ये पुनर्जन्माचा उल्लेख आला आहे परंतु तो एक वेळ आणखी जीवन पुनरुज्जीवनचा आहे. वारंवार जन्म घेण्याचा नव्हे. परंतु डॉ. मेहरोत्रा यांना एक वेळ पुन्हा जीवंत होणे आणि पुन्हा पुन्हा अगर वारंवार जन्म घेणे यात कोणतेही फरक वाटत नाही. गोष्ट कीती सोपी व सरळ आहे. पुन्हा जन्म घेणे म्हणजे एक वेळ पुन्हा जीवीत होणे. पुन्हा पुन्हा जन्म घेणे म्हणजे एका नंतर एक जन्म, मग पुन्हा जन्म, मग पुन्हा जन्म अर्थात पुन्हा पुन्हा जन्म होय. या तथ्याला अशा प्रकारे समजले जाऊ शकते की, एखादा मनुष्य अलाहाबाद येथुन दिल्ली येथे येतो तेव्हा तो एक यात्रा पुर्ण करतो. या यात्रेला म्हटले जाईल की ती व्यक्ति अलाहाबाद येथून दिल्ली येथे आली. काही काळानंतर जेंव्हा तो अलाहाबाद येथुन दिल्लीत येथे येतो तेंव्हा आम्ही म्हणून की, तो पुन्हा अलाहाबाद येथून दिल्ली येथे आला म्हणजेच त्याचे अलाहाबाद येथून दिल्लीत पुनरागमन झाले. परंतु तो वारंवार येत असेल तर त्याला पुनरागमन नव्हे तर आवागमन म्हटले जाईल. तात्पर्य पुन्हा ला पुन्हा पुन्हा किंवा एक वेळ ला वारंवार (अनेक वेळा) बनविणे व्याकरणच्या दृष्टीने तर अयोग्य आहेच तसंच तथ्याच्या दृष्टीनेही अनुचितच होय. अशा पध्दतीने अध्ययन करणारा सत्यापर्यंत पोहचणे तर शक्य नाहीच परंतु वास्तविकतेचा बोध होणे ही असंभव आहे. एखाद्या व्यक्तीने मानवतेच्या मुल्यांना विसरून एक वेळ चोरी केली तर काय डॉ. मेहरोत्रा त्याला वारंवार चोरीची शिक्षा देतील ? आणि हा वारंवार ८४ लक्षाच्या संख्ये पर्यंत पोहचेल? एक वेळ जीवंत होणे याला वारंवार जन्म घेणे म्हणणे पूर्णतया असत्य आणि हास्यास्पद नाही का वाटत?

तर्कहीन गोष्टी

डॉ. मेहरोत्रा यांनी आपल्या पत्रात या पुस्तकात प्रकाशित महापंडित राहुल सांकृत्यायन आणि डॉ. एम. एन. राय यांच्या विचारांना केवळ कल्पना म्हटले आहे. परंतु त्यांच्या मतांना कल्पना सिध्द करण्यास कोणताही पुरावा (प्रमाण) मात्र दिला नाही. विचारात मत-भिन्नता अनुचित नव्हे परंतु विचार खंडणात प्रमाण प्रस्तुत करणे आवश्यक आहे. केवळ हे लिहणे की, अमुक गोष्ट निव्वळ कल्पना आहे सर्वथा अयोग्य होय. जर राहूल सांकृत्यायन आणि डॉ. राय या विद्वानांचे विचार त्रुटीपूर्ण असते तर हिन्दू समाजात बहुसंख्यक दलित आणि दलित वर्ग राहीला नसताच तसेच त्यांचे शोषण यथावत सुरु राहीले नसते आणि ते याला कर्माचे चक्रफळ मान्य करून हातावर हात देवुन मुक दर्शक बनून राहीले नसते.

डॉ. मेहरोत्रा यांचे हे कथन सुध्दा सर्वथा बुध्दि आणि विवेकच्या विपरीत आहे की, "संसारात जितक्या वस्तु आहेत त्या सर्वांमधे प्राण आहे. अतः व्यक्ति मृत्यु नंतर आपल्या कर्मानुसार दुसऱ्या योनित जन्माला जाणे यात आश्चर्य वाटण्या सारखे काहीही नाही."

(पत्र पान ३)

डॉ. साहेबांचे उपरोक्त विचार कीती भ्रामक आणि संदेहात्मक आहेत की, संसारातील प्रत्येक वस्तुत प्राण आहे. यांच्या मतानुसार घर व बाहेरील सर्व वस्तु सजीव होतील आणि जीवीत तसेच मृत या मधील अंतर संपेल किंवा नष्ट होईल. या मताचा स्वीकार केल्यावर मुले कुत्रा, मांजर, ग्लास, पेन, कपडे या सर्वांना जीवित अगर सजीव संबोधतील व कंठस्थही करतील.

विचील प्रश्न

डॉ. साहेबांनी कुतर्कची सीमा ओलांडली. विषयांतर करून एक असा प्रश्न उपस्थित केला जो सर्वथा संबंधित विषयापासून विभक्त आहे. लिहतात, "एका हदीसान्वये प्रेषितांची संख्या एक लक्ष चोवीस हजार आहे. याच प्रमाणे हिन्दू ग्रंथात ८४ लक्ष योनिचे वर्णन आले आहे. याच्या सत्यतेचे काय प्रमाण आहे? काय संपादक महोदय १ लक्ष २४ हजार प्रेषितांच्या संख्येच्या हदीसची सत्यता सिध्द करण्यास पुरावा अगर प्रमाण प्रस्तुत करू शकतात? काय कोणत्याही पुस्तकात त्यांची नावे आहेत? मला तर वाटते की हे केवळ अनुमान आहे तथ्य नव्हे. या संसारात चांगल्या आत्म्यांचा जन्म बरोबर होत राहतो. हे सांगणे उचित नाही की, प्रेषित मुहम्मद (स) अंतीम प्रेषित होय. मुस्लिम संप्रदायात मुहम्मद (स) यांच्या पश्चात अन्य प्रेषितांचा जन्म कदाचित झाला नसेल परंतु हिन्दु संप्रदायात असे काही नाही." डॉ. मेहरोत्रा यांनी विषयान्तर करून दोन प्रश्न उपस्थित केलेत.

आम्ही (संपादक) आमच्या लेखात कदापिही हे लिहले नाही की ८४ लक्ष योनिच्या नावाची गणना करून दाखवावी. हिन्दु धर्मात या ८४ लक्ष योनिची सूची (यादी) हिन्दू धर्मात उपलब्ध नाही. ह्या सत्यतेला सर्वांना मान्य करावेच लागेल की, विश्वास आणि आस्थेशी संलग्न प्रश्नांना मानविय बुध्दिच्या कसोटी वर पडताळे जावू शकत नाही. परंतु जेंव्हा कुणी ओढाताण करून अशा गोष्टी प्रस्तुत व प्रचलित करण्याचा प्रयत्न करतो ज्यामुळे मानवीय जीवनात विकार निर्माण होतो तेंव्हा अशा गोष्टीचे वास्तविक ज्ञान आणि संशोधन आवश्यक होते आणि मग आस्थेशी संलग्न तथ्यांचा तपास व मीमांसा अगदी निकडीची होते, जसे की आवागमनीय पुनर्जन्माचा प्रश्न आहे.

प्रत्येक धर्म कोणत्या ना कोणत्या रूपात सर्वोच्च सत्ताधीश ईश्वरामधे पूर्ण विश्वास बाळगण्याची शिकवण देतो परंतु कुणी सांगेल की ईश्वर कुठे आहे दाखवा तर काय

कुणासाठीही हे शक्य आहे? परंतु जेंव्हा डॉ. मेहरोत्रा स्वता लिहतात की, "असे निदर्शनात आले आहे की मनुष्य योनित जन्म घेतल्यानंतर बहुधा वारंवार मनुष्य योनि मधेच जन्म होतो." या कथनानंतर ८४ लक्ष योनिचा काय अर्थ?

जेथपर्यंत प्रेषित मुहम्मद (स) यांचे अंतिम प्रेषित होण्या विषयीचा प्रश्न आहे तर हे एक निर्विवाद सत्य आहे की आपल्या आगमनानंतर कोणतेही प्रेषित आले नाहीत व येणार ही नाही. प्रेषित चा अर्थ होतो ईश (अल्लाह) संदेशवाहक, परंतु चांगले व सदाचारी आत्मे तर येत राहतील. हिन्दू धर्मातही शेकडो वर्षापासून कोणताही अवतार आला नाही. सदाचारी आणि चांगले लोक तर प्रत्येक समाजात जन्माला येतील परंतु त्यांची प्रेषित किंवा अवताराशी तुलना करणे सर्वथा अयोग्य आहे.

गीता चे श्लोक

गीताच्या श्लोकाची व्याख्या जी माझ्या लेखात करण्यात आली आहे ती कोणत्याही दृष्टिने अनुचित नाही. डॉ. मेहरोत्रा यांनी त्याच्यावर आक्षेप तर केला परंतु त्या साठी कोणताही तर्क प्रस्तुत केला नाही. जेंव्हा फळाची आशा राहणार नाही. तेंव्हा मनुष्य कार्य करणार नाही. ही अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. जर मजुराला मजुरीच मिळणार नसेल तरीही तो कार्य (काम) करीत राहण्या इतका मुर्ख नाही. तसेच मजुरी विना काम करवुन घेणारे शोषणकारी ठरतील. भौतिक समाजात याचे प्रतिबिंब दिसून ही येते. दुसऱ्या श्लोका विषयी ही गोष्ट आहे की, उपमा अशी दिली जाते जी सटीक असते व चुकीचा भावार्थ देणारी नसते.

डॉ. मेहरोत्रा लिहतात की, "संपादक महोदय म्हणतात की जर आम्ही हे मान्य केले की, रोग आणि विकलांगता पूर्वजन्माचे फळ आहे. तर मग लोक मानवीय दु:खा प्रति कठोर व निर्दयी नीतिचा स्वीकार करतील. आणि त्यांची सहायता कुणीही करणार नाही. हे कोणत्याही प्रकारे तर्क संगत नाही. काय असे होते ? कदापिही नाही." (पत्र पान ३.४)

डॉ. मेहरोत्रा लिहतात लोक त्यांची सहायता करून पुण्य अर्चित करतात. परंतु प्रश्न हा आहे की, हे पुण्य कसे होईल? जेव्हा संबंधित व्यक्तिला दंड किंवा शिक्षा मिळत आहे तेंव्हा सहाय्य केल्याने त्यात शिथीलता निर्माण होवुन ती सौम्य व कमी होईल. मग काय हा दंडात हस्तक्षेप नाही? तसेच जो पर्यंत संबंधित व्यक्ति दंड सोसत अगर भोगत नाही तो पर्यंत त्याला मुक्ति कशी मिळेल? अशा प्रकारे सहाय्यक तर गुन्ह्याच्या कार्यात सहभागी होईल व ज्याची सहायता केली जाईल त्याचे ही अहित (नुकसान) होईल. इतकेच नव्हे तर हा ईश्वराचा ही अपमान अगर अवमानना होईल की ज्याला त्याने दंडीत केले आहे त्याचे दंड कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामधे मेळ किंवा संगती नाही. म्हणुनच गरीब, गरजूंना सामाकिड मान्यता सुध्दा देण्यात

आली नाही. वर्तमान आधुनिक युगातही लोक त्यांचे स्पर्श झालेले पानी सुध्दा पीत नाही. त्याला दुसऱ्या जातीच्या लोकांच्या विहरी वरुन पानी घेवू देत नाही. त्याच्या लग्न सोहळ्यात थोडीशी शोभा अगर चमक आली तर तीलाही रोखण्यात येते, वगैरे ! तर मग त्यांचे सहाय्य कुठे झाले? जर या बहुसंख्यक (द्रारिद्री, गरजु, शोषित) लोकांचे सहाय्य करण्यात आले असते तर त्यांनी आपले जीवन स्तराची सुधारणा केली असती. परंतु असे काही नाही झाले. कुणीही कुठेही या वास्तविकतेला बघु शकतो. हे सर्व शेवटी कोणत्या शिक्षेचा परिणाम आहे?

वैज्ञानिकता कुठे आहे?

"पुनर्जन्म भी होता है?" या पुस्तकात वैज्ञानिकतेचा लवलेश ही नाही. अशा प्रकारच्या अध्ययनाचे तीन पक्ष असतात. संबंधित पक्ष, त्याचे उद्‌गार (पुष्कळ दिवसापासून मनात ठेवलेल्या गोष्टी) मधुन निघालेला पक्ष आणि जनता उपरोक्त पुस्तकात वर्णित २७ घटना मधे या बाबीकडे संभवत: लक्ष देण्यात आले नाही. जशे केस नं. १ चे शीर्षक आहे "भारत में मृत्यु इंग्लड मे पुनर्जन्म" (भारतात मृत्यु इंग्लंड मधे पुनर्जन्म) या घटनेत गोपालची गप्पा गोष्टी आहे. याच्या अध्ययनासाठी डॉ. मेहरोत्रा यांना इंग्लंडला जावयास पाहीजे परंतु ते गेले नाही, परंतु लिहतात की, "गोपाल ने त्या रस्त्याचे नाव सुध्दा सांगितले जेथे तो राहत होता. त्याच्या वडीलांची इंग्लंड मध्ये कापडाचे दुकान होते. ६ वर्षाच्या वयात त्याचा मृत्यु झाला व तेथून तो दिल्ली मधे आला. रक्ताच्या ओकारी (वांती) मुळे त्याला मृत्यु आला होता असे तो म्हणत होता. लेखकासाठी या गोष्टीला सत्य सिध्द करणे शक्य नव्हते. डॉ. स्टीवेन्सन यांनी सुध्दा या केसचे अध्ययन केले. सत्य जाणून घेण्यास प्रयत्न त्यांनी इंग्लंड मध्ये केला परंतु कदाचित यशस्वी झाले नाही." *(पान नं. १४)*

उपरोक्त केसचे सर्वात प्रथम अध्ययन एच.एन. बॅनर्जी यांनी केले होते परंतु त्यांना या कहानीत कोणतेही तथ्य दिसून आले नाही. अशाच प्रकारची दुसरी घटना आहे. "इंग्लंड मधे गळा दाबला व भारतात पुनर्जन्म" यामधे सुध्दा वैज्ञानिक संशोधनाची कमतरता आहे. अशाच प्रकारच्या अन्य घटना अगर केसेस आहेत. पुस्तकाच्या शेवटी डॉ. मेहरोत्रा लिहतात.

"आजच्या वैज्ञानिकां समक्ष हा विषय एक आव्हान आहे. त्यांनी कर्माच्या सिध्दांताचा परिकल्पनाची सत्यता सिध्द करण्यासाठी एक अशी वैज्ञानिक रूपरेखा तयार करावी जी या परिकल्पनेच्या सत्यतेवर प्रकाश टाकू शकेल *(पान १६०)*

डॉ. मेहरोत्रा यांनी डॉ. व्यास यांच्या संशोधनाला अगदी सहजतेने चुकीचे अनुसंधान म्हटले आहे. परंतु काय त्यांनी आपल्या २७ केसेस पैकी कोणत्याही पुनर्जन्मीच्या मानसिक आरोग्याची चाचणी केली आहे? सहाकिडच याचेही उत्तर नकारार्थी आहे. डॉ. मेहरोत्रा यांनी

'आत्मा' ला 'सुक्ष्म-शरीर' सांगून आपल्या अज्ञानाच्या पोकळपणा उघडा केला. मी तर सुक्ष्म शरीराच्या प्राण्यांविषयी लिहले होते (जसे माशी, मच्छर वगैरे) की, यापैकी कोणताही प्राणी डॉ. मेहरोत्रा यांच्या संशोधनात आला नाही.

वास्तविक मानविय नातेसंबंध महत्त्वपूर्ण असतात जीवित शरीर नव्हे. जर शारीरिक नाते नसले तर मर्यादा आणि मानविय मुल्ये यांचे काय महत्व राहील? डॉ. साहेबांनी १७ नंबरची केस 'सख्या बहीणीच्या घरी भावाचा पुनर्जन्म'' ही घेतली आहे. हे अशा प्रकारे सुध्दा होवु शकते की, ''सख्या बहीणीचे पत्नीच्या रूपात पुनर्जन्म.'' अशा कल्पनेने अमानविय संबंध वाढीस लागतील. ज्यांना कोणत्याही सभ्य समाजात स्थान नाही. गोयंदकांच्या तर्कांची समीक्षा व उत्तर मागे देण्यात आलेच आहे. डॉ. मेहरोत्रा सुध्दा लिहतात की, ''मी आणि श्रध्देय गोयन्दका यांनी आवागमन व पुर्वजन्माविषयी जे प्रस्तुत केलेत त्यांना कोणताही वैज्ञानिक आधार नाही.''

(पत्र पानं नंबर ५)

सुतर्क द्या

डॉ. मेहरोत्रा लिहतात ''संपादक महोदय यांचा हा तर्क अगदी पोकळ आहे की जर मानवाचे ज्ञान, बुध्दि, कर्म, सुख, दुख, लोभ, क्रोध इत्यादि मधे अंतर नसले तर मनुष्य जीवन चालणे अशक्य आहे.'' या कथनाचा आधार काय आहे?

डॉ. साहेब मनुष्याला कर्मानुसार दंड अथवा पुरस्कार येथेच (इहलोक) मिळु लागले आणि मनुष्याला हे माहीतच नसावे की, त्याला कोणत्या कृत्याची अगर कर्माची शिक्षा होत आहे अथवा पुरस्कार प्राप्त होत आहे तर दंड आणि बक्षीस दोघांचा हा उपहास (थट्टा) होईल. ज्या तर्काला आपण अर्थहिन अगर पोकळ ठरवित आहात तो कसा पोकळ आहे याचे स्पष्टीकरण आपण केले नाही. जर सर्वच मनुष्यांची भावना, योग्यता वगैरे समान झाल्यात तर काय मानव जीवन चक्र चलायमान होवु शकते? कदापिही नाही. थोडे गंभीरता पुर्वक व दक्षतापुर्ण चिंतन मनन करा व मग सुतर्क उपस्थित करा.

हिन्दू धर्मानुसार ८४ लक्ष योनित मनुष्य योनि सर्वात श्रेष्ठ होय आणि हा परिणाम आहे निम्न योनित चांगले कर्म करण्याचा ! या दृष्टिने सृष्टीच्या आरंभी निम्न दर्जाच्या योनिच अस्तित्वात राहील्या असाव्यात आणि मनुष्य योनिची उत्पत्ती यांच्या (निम्न योनिच्या) कर्माच्या परिणामात झाली असावी. मग आता मनुष्य मृत्यु नंतर मनुष्य म्हणुनच का पुनर्जन्मित होतो? डॉ. मेहरोत्रा यांनी आपल्या अधिक केसेस अशाच प्रकारच्या दिल्या आहेत. दुसरे आणखी अध्येता (अध्ययन करणारे विद्यार्थी) बहुधा हेच करतात. (यामुळे हा बोध ही होतो की मनुष्य निर्मीती मधे सृष्टि निर्मात्याची दखल नाही-भाषांतर कार)

अवतार आणि पुनर्जन्म

या विषयी डॉ. मेहरोत्रा यांचे कथन आहे की, "संपादक महोदय यांनी आपल्या लेखात हिन्दु धर्माच्या अवतारांना पुनर्जन्माच्या कसोटीवर पडताळण्याची धृष्टता (निर्लज्जता) केली आहे. अवतारांचा पुनर्जन्माशी काही संबंध नाही. ते संसारात (जगात) एखाद्या विशीष्ट परिस्थितीत अवतरित झाले आणि ते सर्व ईश्वरीय गुणांनी संपन्न होते." (पत्र पान नं. ७)

डॉ. साहेबांच्या उपरोक्त कथना वरून असे वाटते की, कदाचित त्यांना अवतार आणि त्यांच्या दर्जाचे ज्ञान नसावे. केवळ विष्णु देवाच्या दशावतारालाच ते कदाचित अवतार समजत असावेत. परंतु वास्तविकता ही आहे की, अवतारांची संख्या खुप जास्त आहे. येथपर्यंत की, 'शिव' आणि 'दुर्गा' इत्यादिंचे ही विभीन्न अवतार आहेत व अवताराचे अनेक दर्जेही आहेत. अवतारवाद मुळे आवागमनीय पुनर्जन्मावर प्रश्न चिन्ह लागतो यात शंकेचे काही कारण नाही.

अशाच प्रकारे 'शाप' चा सुध्दा आवागमनीय पुनर्जन्माशी काही संबंध नाही अगर पुनर्जन्माच्या मान्यतेशी अभिशापाचा कोणताही मेळ नाही. डॉ. मेहरोत्रा यांनी प्रत्येक बाबींचा नकारार्थक उल्लेख केला परंतु आपल्या कोणत्याही 'न' चा तर्क मात्र पत्रात प्रस्तुत केला नाही. डॉ. साहेबांनी स्वर्ग आणि नरकावर प्रश्नार्थक चिन्ह निर्माण करून आपल्या अज्ञानाचाच पुरावा दिला आहे. वास्तविक हे एक असे सत्य आहे ज्याचा सर्व मोठे धर्म ग्रन्थ समर्थन करतात. इस्लाम धर्मातही पारलौकीक जीवनावर विश्वासाची मौलिक धारणा उपलब्ध आहे. जर कोणाची अपेक्षा असेल की स्वर्ग आणि नरक विषयीचे सर्व तथ्यांचे ज्ञान या जगातच देण्यात यावे आणि डोळ्यांपासून काहीही अदृश्य राहयाला नको तर हे कदापिही शक्य नाही. हे तर सर्वस्वी सर्वशक्तीमान स्वयंभू ईश्वराच्या अधीन आहे की आपल्या महान प्रयोजना विषयी कीती व कोणते ज्ञान मनुष्याला द्यावे. ईश्वराने या संदर्भात जेवढ्या ज्ञानाची आवश्यकता आहे तेवढे त्याने मनुष्याला दिले. मनुष्य तर इतका लाचार व असमर्थ जन्माला आला की तो आपल्या शरीरा विषयी सुध्दा पूर्ण ज्ञान बाळगत नाही ज्याला घेवून सारखा तो फिरत असतो. त्याला हे सुध्दा माहीत नाही की त्याच्या डोक्यावर कीती केस आहेत व या पूर्वी कीती होते ? मग पराभौतिक सत्याच्या ज्ञाना विषयी तो कीती विवश आहे हे सहजच लक्षात येवू शकते.

डॉ. मेहरोत्रा यांना जैन धर्म आवागमनीय पुनर्जन्माचा कमी समर्थक का आहे हे समजण्यास मुश्कील होत आहे. वास्तविक गोष्ट फक्त एवढीच आहे की, हिन्दु आणि बौध्द धर्मग्रंथात पुनर्जन्मावर जितक्या गोष्टी व कथांची भरमार आहे तितकी भरमसाठ सामग्री जैन धर्मात उपलब्ध नाही.

पुर्वाग्रहा पासुन मुक्त होवुन पुनर्विचार करा

डॉ. राजपाल सिंह (मुक्काम पोष्ट जाखौली जिल्हा सोनीपत १३१०२३, हरियाणा) यांनी १० मे २००० रोजी डॉ. सुरेन्द्र कुमार शर्मा 'अज्ञात' (बंगा, पंजाब) यांना पत्राद्वारे त्यांच्या लेखात ('कान्ति', नोव्हेंबर १९९९ मधे प्रकाशित) ची प्रशंषा करून आवागमनला 'मिथ्या सत्य' सांगितले आणि वेदाच्या एका मंत्राचा अर्थ विचारला. आपण पत्रात लिहले,

"आपला लेख 'आवागमनीय पुनर्जन्म: हिन्दु मनीषा के लिये अशोभनीय' वाचला. त्याने मनाला अत्यंत प्रसन्नता आणि आनंद झाला, धन्यवाद ! लेख अतिशय ज्ञानवर्ध्दक आणि अर्थाचा अनर्थ करून तोड-मोड करून प्रस्तुत करणाऱ्यांचे डोळे उघडणारा होता. जसे जन्म जन्मांतरामधे भटकणारा जीव ८४ लक्ष योनि मधुन प्रवास करतो त्यालाच पौराणिक काळात आवागमन चे नाव देवुन परिभाषित केले गेले जे 'मिथ्या सत्य' आहे. डॉ. साहेब मी या मंत्राचा अर्थ आपल्या पासुन जाणुन घेवु इच्छितो. (यजुर्वेद ४०:३ हा मंत्र लिहीला गेला.)"

डॉ. सिंह यांच्या या पत्राचे उत्तर डॉ. 'अज्ञात' यांनी खालील प्रमाणे दिले. 'कान्ति' नोव्हेंबर १९९९ च्या अंकात प्रकाशित माझा लेख "आवागमनीय पुनर्जन्म: हिन्दु मनीषा (बुध्दि) के लिये (च्यासाठी) अशोभनीय" यावर मला जाखौली (सोनीपत) चे डॉ. राजपाल सिंह यांचे १०-५-२००० ला लिहलेले पत्र प्राप्त झाले. (पत्राची फोटो कॉपी सोबत जोडली आहे.) डॉ. सिंह यांनी परंपरागत आनंद व धन्यवाद प्रकट करून टिप्पणी (टीका) केली. जसे "हा जन्म-जन्मान्तर मधे भटकणारा जीव ८४ लक्ष योनितून निर्वाह करतो. यालाच पौराणिक काळात आवागमन चे नाव देवुन परिभाषित करण्यात आले आहे हे एक मिथ्या सत्य आहे." अर्थात त्यांना माझे हे कथन 'मिथ्या सत्य' वाटते. सत्य आणि तर्काच्या प्रकाशात प्रस्तुति करणा नंतरही जर कोणत्याही महाराज अगर महात्म्याला माझे कोणतेही कथन अगर विचार 'मिथ्या सत्य' प्रतित होत असेल तर ती मिथ्या दृष्टि त्यांनाच मंगलकारक अगर मुबारक असो.

परंतु पत्रामधे पुढे एक वेदमंत्र शुध्दलेखणाच्या अशुध्दि ने दुषित रूपात प्रस्तुत केला गेला आणि त्याचा अर्थ डॉ. सिंह माझ्याकडुन जाणुन घेण्यास उत्सुक आहेत. असे कदापिही नव्हे की ज्ञान जिज्ञासावश हे वाक्य लिहले आहे उलट त्यांनी याच्या माध्यमातून मला निरूत्तर करण्यास ब्रह्मस्त्र सोडले आहे. त्यांनी कदाचित हा विचार, केला असावा की, जेंव्हा मी या मंत्राचा अर्थ सांगेल तेंव्हा सहजच मी त्या जाळ्यात अडकून जाईल ज्याला मी माझ्या लेखात नष्ट व छिन्नविछिन्न केले आहे.

डॉ. सिंह यांनी दिलेला मंत्र असा आहे (वेदाचे नाव आणि मंत्राचा पत्ता दिला नाही)

असुर्या नाम ते लौका अन्धेन तमसावृता:।

ताँस्ते प्रेत्याति गच्छान्ति ये के चात्महन जना:॥

डॉ. सिंह यांनी नोव्हेंबर १९९९ कान्तिच्या पान नं.२५ वर माझ्या द्वारे उद्घृत या मंत्राची अचूक कॉपी (नक्कल) केली असती तर पहिल्या पंक्तिमधे शुध्लेखणाच्या दोन चुका झाल्या नसल्या. 'असर्या' ला 'असुर्या' आणि 'लोका' ला 'लौका' लिहण्यात आले नसते. या अपराधीक चुकीच्या अशुध्दि ने ही गोष्ट तर अगदी स्पष्ट आहे की, डॉ. सिंह हे वेदज्ञानात अडाणी आहेत. इतकेच नव्हे तर ते संस्कृत विषयी सुध्दा अज्ञानी आहेत. त्यांची मानसिकता जन्म जन्मांतरा मध्ये भ्रमण करणाऱ्या आत्माची कहानी रद्द केल्यामुळे विचलित झाली. कारण अबोध बालपणात ज्या गोष्टी आई-वडील मुलांच्या मनात आपल्या भोळ्याभावाने बिंबीत करतात त्यांना जेंव्हा कुणी रद्द करते तेंव्हा अशी अशांत स्थिती निर्माण होणे स्वाभाविक आहे. उपनिषद मधे सत्याच्या शोधाला तरवारीच्या धारेवर चालण्या समान म्हटले आहे. याचा अर्थ हाच आहे की, जुन्या संस्कारा पासुन मुक्त होवुन सत्याचा साक्षात्कार करणे सोपे कार्य नाही.

डॉ. सिंह यजुर्वेद च्या मंत्राला प्रस्तुत करून आपल्या बालपणीच्या संस्कारांना सुरक्षा कवच घालुन आश्वस्थ होण्यास यजुर्वेदच्या मंत्राला प्रस्तुत करतात की, जन्म जन्मांतरात आत्माचे आवागमन पौराणिक काळाची कल्पना नव्हे तर स्वत: वेदांचा दृढ व अटळ सिध्दान्त आहे. परंतु मला खेद (दु:ख) आहे की, मंत्राचा अर्थ डॉ. सिंह यांची मनोकामना पुर्ण करण्यास असमर्थ आहे.

मंत्राचा सोपा आणि सरळ अर्थ अशा प्रकारे आहे "हे असुरसंबंधी लोक अज्ञानाने आच्छादित आहेत. जे कोणी आत्माचे हनन (मारणे) करणारे लोक आहेत ते मृत्यु नंतर त्यांना (अंधकार/अज्ञानाने आच्छादित लोकाला) प्राप्त होतात."

असुर कोण आहे? शंकरानुसार परमात्मच्या तुलनेत देवता आदि असुर आहेत. अर्थात देवतांचे लोक अज्ञान अन्धकार याने झाकलेले आहे आणि आत्महत्या करणारे लोक या अंधकाराने झाकलेल्या लोकाला प्राप्त होतात.

हा मंत्र त्या मंत्राचा अपवाद आहे ज्यामधे मृतकाचे आनंदमय लोकात जाणे आणि तेथे नाना प्रकारचे विलास उपभोगतील असा उल्लेख आहे. परंतु हा मंत्र पुन्हा (एकवेळ) जन्म घेणे किंवा वारंवार (आवागमन) जन्म घेणे यांचा संकेत देत नाही. यामधे केवळ आत्महत्या करणारे अंधकारमय लोकात जाण्याचा उल्लेख आहे. अर्थात मृत्यु नंतर ते तेथे जाऊन पुनर्जीवित होतात. अगदी सरळ गोष्ट आहे की, चांगले लोक आनंदमय लोकात जाऊन पुनर्जीवित होतात परंतु आत्म-हत्यारे अंधकाराने आच्छादित लोकात स्वर्ग आणि नरक हे शब्द कालांतराने अस्तित्वात

आले. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद ह्या मधे स्वर्ग आणि नरक हे शब्द आढळत नाहीत. अथर्ववेदात 'स्वर्ग' हा शब्द तर आहे परंतु नरक हा शब्द त्यात ही नाही. हा शब्द जैमिनीय-ब्राम्हण-उपनिषद मधे सर्व-प्रथम दिसतो. म्हणजे नंतरच्या काळात आनंदमय लोक स्वर्ग आणि अंधाराने आच्छादित लोक नरक बनले.

परलोक विषयी वेद-विचार अशा प्रकारच्या उपयुक्त शब्दावलीच्या अभावात व्यक्त होत राहीले. काम-चालविणाऱ्या संकेताद्वारे बऱ्याच कालादि नंतर 'स्वर्ग' शब्द वैदिक ऋषिंना उमजला परंतु 'नरक' हा शब्द नंतरच्या काळातही त्यांना उमजला नाही कारण हा कोणत्याही वैदिक संहिते मधे उपलब्ध नाही. अर्थात वेद 'नरक' लोका विषयी अज्ञान-अंधकाराने आच्छन्न आहे. मनुष्यच वेदाच्या आधारावर परलोकाचे तसे स्पष्ट चित्र प्रकट होत नाही किंवा दर्शन घडत नाही जितके अवैदिक, विशेषत: सामी धर्मांनी प्रस्तुत केले.

आता वैदिक विद्वानांनी शब्दांच्या जादूई खेळाद्वारे काहीही अर्थ लावला तरी वास्तविक सत्याला प्रामाणिकपणे ते नाकारू शकत नाही. यास्क ने म्हटले आहे ' न हयेषु प्रत्यक्षमस्ति अनृषेरतत पसो वा' (निरुक्त १३/१२) (मंत्राचा सत्यार्थ अगर यथार्थ अर्थ त्याला ज्ञात होवु शकत नाही जे ऋषि नाही, जो तपस्वी नाही) ही गोष्ट आपल्या जागी योग्य असली तरी शब्दाचे जे रूप कोणत्याही वेद-मंत्रात उपलब्धच नाही ते कोणत्याही ऋषिला कोणत्याही तपस्वीला दिसू शकत नाही. याच्या विपरीत आकाश-कुसुम या बन्ध्यापुत्राला बघणारा ऋषि ही होवु शकत नाही व तसस्वीही होवु शकत नाही. आम्हाला या सर्व गोष्टीवर पुर्वग्रहाने मुक्त होवुन नजरेची धुळ, द्वेष बाजुला सारून पुन:र्विचार केल्या शिवाय आम्ही सत्या पर्यंत पोहचु शकत नाही.

डॉ. सुरेन्द्र कुमार शर्मा 'अज्ञात'
३/५७, अज्ञातवास, बंगा १४४ ५०१ पंजाब.

आत्मा तर अमर आहे मग

श्रीमानजी (आदरणीय) मी ऐकले आहे की, आपल्या येथे पुनर्जन्म नाही. मग जीवंत कोण होईल? आत्मा तर जन्म घेत नाही व मरत ही नाही. नष्ट तर शरीरच होते. मग कोणता हिशेब, कसला हिशेब? आखिरत (परलोक) विषयी सुध्दा सांगा? इस्लामी दृष्टिकोनान्वये आमच्या प्रश्नांची उत्तरे द्या.

सुनील सक्सेना,

द्वारा, आदिल माडर्न स्टुडियो, मिलक, रामपुर - २४३ ७०१ (उ.प्र.)

उत्तर : आपले हे कथन सत्य आहे की, आत्म्याचा मृत्युशी कांही संबंध नाही. देह त्यागा नंतर आत्म्याचा संबंध ज्या लोकांशी होतो त्याला इस्लामच्या शब्दावलीत 'बरजख़' म्हणतात. पितृ लोकात (बरजख़ मधे) आत्मा आपल्या कर्मानुसार वास्तव्य करतात. चांगले सत्कर्मी आत्म्ये स्वर्गाच्या सावलीत तर वाईट दुराचारी आत्म्ये नरकाच्या सावलीत राहतात. या दृष्टिने चांगल्या आत्म्याला सुख-आनंद प्राप्त होतो तर वाईट आत्म्याला दुख-कष्ट!

क़ियामतच्या दिवशी (महाप्रलय दिनी) या आत्म्यांना नवीन शरीर प्रदान करण्यात येईल व त्यांना वास्तविक प्रतिफळ देण्यात येईल. नवीन शरीरासाठी हे आवश्यक नाही की त्याला तेच शरीर दिले जाईल जे संसारात त्याला प्राप्त होते. त्या दिवशी चांगले वाईट कर्मामुळे स्वस्थ-सुंदर आणि अशक्त असुंदर शरीर प्राप्त होईल.

इस्लाम मधे आवागमनीय पुनर्जन्म नाही. अल्लाह सत्कर्म करणाऱ्या व्यक्तिला स्वर्ग देईल व तेथे तो (आत्मा) सदैव राहील. तसेच दुराचारी लोकांचे ठिकाण नरक असेल. कोणा सोबत ही अन्याय होणार नाही तर सर्वांशी पुर्णपणे न्याय केला जाईल.

इस्लाम मधे पुन्हा पुन्हा संसारात जन्म घेण्याची कल्पना नाही. मनुष्याला त्याच्या चालीरिती अगर व्यवहार यांच्या हिशोबा साठी (कर्म-फळाच्या निर्णयासाठी) एक वेळ शरीर प्रदान करून जीवित केले जाईल. ८४ लक्ष योनित भ्रमण करण्याची धारणा पुर्णपणे काल्पनिक आहे. यामधे अनेक विसंगति आहेत. यापैकी एक विसंगती ही सुध्दा आहे की, जो पर्यंत कार्याचा (कामाचा) पुर्ण तपशील समोर येत नाही कुणालाही दंड दिला जावु शकत नाही. ईश्वरीय दंड आणि बक्षिस यांचे मापदंड तर अतिशय उच्च आहे. मृत्यु पश्चात सुध्दा कृत्याच्या परिणामाच्या रूपाने मनुष्याचा चांगला किंवा वाईट यांचा क्रम चालुच असतो.

एखाद्या व्यक्तिने विहीर खोदली तर जो पर्यंत लोक त्यामधुन पाणी पीत राहतील तो पर्यंत त्याचे पुण्य विहीर खोदणाऱ्याला मिळत राहते. अशाच प्रकारे वृक्ष लावणाऱ्याला तो पर्यंत त्याचे पुण्य प्राप्त होत राहील जो पर्यंत लोक त्या वृक्षाच्या सावली आणि फळाने लाभान्वित होत राहतील. याच प्रमाणे एखादा व्यक्ति अत्याचाराची प्रथा अगर एखादी कुप्रथा प्रचलित करून मृत्यु पावला तर त्या प्रथेचा कुप्रभाव जितका पडेल त्या अनुषंगाने तितके पाप त्याच्या वाट्यात (हिस्यात) येईल. म्हणून कर्मानुसार योनि परिवर्तन हास्यास्पद अन्यायपुर्ण आणि असंभव आहे.

उत्तर आले नाही

सप्टेंबर १९९९ च्या अंकात 'आवागमनीय पुनर्जन्म की (ची) वास्तविकता' शीर्षका अंर्तगत विस्तीर्ण लेख 'क्रान्ति' मधे प्रकाशित झाला होता जो या पुस्तकातही समाविष्ट करण्यात आला आहे. यामधे कथित पुनर्जन्माच्या एका घटनेची स्वत: अध्ययन केलेली रिपोर्ट (माहीती) सुध्दा प्रकाशित करण्यात आली होती. ही केस पुंडरीक कुमारच्या या असत्य कथनावर आधारित होती की, तो बलरामपुर (उ. प्र.) राज्याचे पूर्व महाराज सर पाटेश्वरी प्रसाद सिंह चा पुनर्जन्मी आहे. वैज्ञानिक पध्दतीने जेंव्हा आम्ही या केसची तपासणी केली तेंव्हा सर्व घटना अगर मामला नकली आणि असत्य सिध्द झाला.

उपरोक्त घटनेच्या संदर्भासह प्रस्तुत सविस्तर लेखाच्या प्रकाशनाच्या कीत्येक महिन्या नंतर पुंडरीक कुमार चे हस्ताक्षरित पत्र प्राप्त झाले. पत्राची लेखन-शैली आणि मजकूर सांगत होते की पत्र अन्य कुणीतरी लिहले आहे. परंतु १६ डिसेंबर ९९ ला त्यांनी फोन द्वारे आम्हाला सांगितले की पत्र त्यांनीच पाठविले आहे. पत्राचे उत्तर आम्ही १ डिसेंबर ९९ लाच दिले होते परंतु पुंडरीकने त्याचे प्रत्युत्तर दिले नाही.

१४ डिसेंबर १९९९ ला पुंडरीक चा फोन येतो व सांगितले जाते की, ते गोंडाहून दिल्लीला आले आहेत आणि 'कान्ति' च्या ऑफिस वर येण्यास उत्सुक आहेत. मी (संपादक) त्यांना सहर्ष आमंत्रित केले व कार्यालयावर येण्याचा मार्ग सविस्तर दाखविला. मी वाट बघतच राहीला परंतु ते आले नाहीत. १६ डिसेंबर १९९९ ला पुन्हा फोनची घंटी वाजते. रिसीव्हर उचल्यावर कानावर पुन्हा पुंडरीक महाराजाचे शब्द पडतात. या वेळी न येण्याची असमर्थता प्रकट करून सांगण्यात येते की, त्यांच्या विषयी जे चुकीचे तथ्य 'कान्ति' ने प्रकाशित केले ते दुरुस्त करण्यात यावे. उत्तरात मी सांगितले तो आमचा निष्कर्ष आहे जर तुम्ही आम्हाला संतुष्ट केले आणि आमच्या प्रश्नांची उत्तरे दिलीत तर आम्ही आपल्या इच्छेनुसार तथ्य प्रकाशित करण्यास तयार आहोत.

या बाबतीत पंजीबध्द (नोंदलेले) पोस्टाने पत्र पाठवुन आपली जिज्ञासा प्रकट केली आणि त्यांच्या पत्राचे उत्तर ही दिले. पुंडरीक कुमार यांनी सांगितले की, त्यांना माझे पत्र प्राप्त झाले व लवकरच त्याचे प्रत्युत्तर ते देतील. परंतु उत्तराच्या प्रतिक्षेत १८ महिन्याचा (१ ।।वर्ष) अवधी व्यतित झाला पण उत्तर आले नाही. स्पष्ट आहे माझी जिज्ञासा शांत करण्यास त्यांचेकडे ज्ञान नाही. त्यांचा पुनर्जन्माचा दावा खोटा व काल्पनिक आहे. आम्ही येथे श्री पुंडरीक कुमार यांचे पत्र आणि आम्ही दिलेले उत्तर यांचा सारांश या हेतुने प्रकाशित करीत आहोत की पाठक वर्गाला वास्तविकतेचा बोध व्हावा आणि ते सुध्दा या विषयावर जास्त चिंतन मनन करण्यास प्रेरित व्हावेत.

‘पुंडरीक’ चे पत्र

आपणास हे कळवायचे आहे की आपण आपली पत्रिका ‘कान्ति’ च्या सप्टेंबर महीन्याच्या आवृत्ती मधे ‘आवगमन आणि पुनर्जन्म’ या वरील विशेष प्रस्तुति मधे ‘महाराजा सर पाटेश्वरी प्रसाद सिंह यांच्या पुनर्जन्माची खोटी (असत्य) कहानी’ शीर्षकाने जो लेख प्रकाशित केला आहे तो पुर्णपणे चुकीचा व निराधार आहे. कारण आपली भेट पुंडरीक कुमारशी झाली नाही. तसेच आपण कोणताही साक्षात्कार त्याच्याशी अगर ग्रामवासि लोकांशी घेतला नाही. इतकेच नव्हे तर कोणतीही सत्य माहीती आपण गावच्या लोकांकडुन घेतली नाही. वास्तविकता ही आहे की, आपण आपल्या पत्रिकेच्या स्वस्त लोकप्रियते साठी ‘पुनर्जन्म सिध्दांत’ यालाच खोटे सिध्द करण्याचा असफल प्रयत्न केला आहे.

सत्यता ही आहे की, पुंडरीक महाराणीची भेट घेण्यास राजमहलमधे गेला तेंव्हा त्याचे वय जवळपास ४ ते ५ वर्ष होते. महाराणीशी घेतलेल्या या प्रथम भेटी समयी शेकडो लोक सोबत होते. या सर्व लोकांनी पुनर्जन्माच्या या घटनेला सत्य मानले. महाराणी ने स्वत: पुंडरीक ला आपल्या जवळ ठेवण्याचा प्रस्ताव ठेवला होता. प्रश्न हा आहे की, जर महाराणी साहेबा असंतुष्ट असत्या तर त्याचवेळी त्या त्याच्या विरुध्द न्यायीक कार्यवाही करू शकत होत्या. परंतु असे काही झाले नाही. सर्वात महत्वाचा प्रश्न हा आहे की, शिवपुरा तेथुन जवळपास ७८ की. मीटर अंतरावर आहे. जवळपास पन्नास वर्षापुर्वी प्रवास साधने उपलब्ध नव्हती तेव्हा पन्नालाल सारख्या एका साधारण व्यक्तिने राजमहलचे महत्वपूर्ण रहस्य कसे जाणले? काय महाराजा स्वत: येवुन आपल्या महलाचा पूर्ण तपशील पन्नालाल ला द्यायचे?

आपणास कदाचित या गोष्टीचे ज्ञान नसावे की, रटलेल्या अगर पाठांतरित गोष्टी आणि सत्यता यामधे बरेच अंतर असते. पुंडरीक आज ही अगदी ठामपणे सांगतो की, एकवेळ आपण येथे येवुन त्याची भेट घ्या आणि सत्य तथ्य प्राप्त झाल्यावर जनतेसमोर ठेवा. अन्यथा आपल्या विरुध्द कार्यवाही करण्यात येईल, कारण आपण त्यांच्या भावना दुखविल्यात. आपल्या विरुध्द मानहानिचा खटला (मुकदमा) दाखल केला जाईल.

पुंडरीक कुमार
गोंडा (उ. प्र.)

(उपरोक्त) पत्राच्या उत्तराचा सांराश

आदरणीय पुंडरीक कुमारजी,

सादर अभिवादन !

आपल्या तर्फे कुणीतरी लिहीलेले प्रेमाक्षराचे पत्र प्राप्त झाले. पत्राद्वारे कळाले की आपल्या विषयी मी जे विचार व्यक्त केलेत त्यांच्याशी आपण सहमत नाही. विचारांशी सहमत होणे अगर असहमत होणे मानवी जीवनाचा हक्क आहे.

मी यासंबंधी लेखाच्या अंतिम ३२ नं. च्या पानावर अगदी स्पष्टपणे नमुद केले की, "उपरोक्त लेख एक वस्तुनिष्ठ अध्ययन आहे. याचा उद्देश कोणाच्याही धार्मिक भावनांना ठेच पोहचविणे कदापिही नाही. जर कुणी समुचित तथ्य (हवे तसे योग्य सत्य) आम्हास उपलब्ध करून देईल तर आम्ही त्याचे स्वागत आणि आमच्या प्रस्तुति मधे ही संशोधन करण्यास सहर्ष तयार आहोत."

आपणासही आम्ही निवेदन करतो की, आपल्या विषयी प्रामाणिक तथ्य आम्हास कळवावे म्हणजे आपले विचारही आमच्या समोर येतील. आपली आई व वडील तसेच गावचे आणि बलरामपुरच्या लोकांशी माझा जो साक्षात्कार झाला त्याच्या निष्कर्षान्वये मी माझे विचार प्रकाशित केले. संवादाचे काही टेप आज ही माझ्या जवळ उपलब्ध आहेत.

पुनर्जन्म चा अर्थ होतो पूर्वावस्थेत पुन्हा जन्म घेणे. यानुसार जर आपल्या दाव्याला सत्य समजले तर तुम्ही पुंडरीक कुमार नसून पाटेश्वर प्रसाद आहात हे मान्य करावे लागेल. आपली आत्मा पूर्व बलरामपूर नरेशाची आत्मा आहे. मग तर आपणास आपल्या भुत व वर्तमानचे चांगल्या प्रकारे सखोल ज्ञान असावे. मला अशी भली माणसे भेटलीत ज्यांनी आपली भेट घेतली आहे. त्यांपैकी काही लोकांनी आपणास आपल्या घरी सुध्दा बोलावले. दुर्दैवाने आपण या लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास असमर्थ ठरला. ते लोक सुध्दा ह्या सर्व घटनेला असत्य म्हणतात. एका सज्जन ने आपणास कन्हाई विषयी विचारले असता आपण काही सांगू शकला नाही. आपण आपल्या मृत्युच्या कारणावर देखील प्रकाश टाकण्यास असमर्थ ठरलात. आज-सुध्दा असे लोक जीवंत आहेत जे महाराजांच्या गतिविधीशी परिचीत आहेत. ते लोक आपल्या दाव्याशी सहमत नाही. त्या लोकांशी माझा वार्तालाय झाला आहे.

मी पत्रकार आहे आणि पत्रकारितेच्या मानविय मुल्यांमधे माझा अटळ विश्वास आहे. म्हणून कुणाच्याही अपमानाचा तर प्रश्नच उद्भवत नाही. माझी प्रबळ इच्छा आहे की, आपण आपला पक्ष अगर बाजु सविस्तर लिहावी, आणि यात निम्नलिखित गोष्टींचा समावेश करावा.

१) आपण आपली जन्मतिथी सांगावी? (आपल्या आई-वडीलांना बरोबर आठवत नाही. मी त्यांना कीत्येक वेळा विचारले आहे.) म्हणजे हे ठरविता येईल की, पाटेश्वरी प्रसाद यांच्या मृत्युनंतर कीती दिवसांनी आपला जन्म झाला. पुनर्जन्माच्या सिध्दांतानुसार आत्मा शरीर सोडताच दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो.

२) मान्यवर पाटेश्वरी प्रसाद शिवपुरा जवळ शिकारीला कोठे जायचे? त्यांची बंदुक कोणती होती ? आणि त्या बंदुकीचा 'बट' कोणत्या धातुचा व कोण-कोणत्या रंगाचा होता?

३) कन्हाई कोण होता? त्याच्याशी आपले कोणते संबंध होते? आपण त्याला कोणती मोठी वस्तु दिली होती? तो राहणारा कुठला होता?

४) महाराजांचा आकस्मिक मृत्यु कोणत्या कारणाने झाली? ते कोणत्या रोगाने पिडीत होते अथवा त्यांना कोणताही रोग नव्हता?

५) ते कोण-कोणत्या भाषेशी अवगत होते? फारसीचे ज्ञान कीती होते? काय आपणास 'फारसी' भाषेचे ज्ञान आहे? इंग्रजी भाषेवर त्यांचे कीती प्रभुत्व होते? आपणास इंग्रजीचे कीती ज्ञान आहे?

६) भोजनात बलरामपुर नरेश कोण-कोणते मांस आवडीने घ्यायचे? आपले भोजन काय होते?

७) जो इंग्रज त्यांचे कडे वारंवार येत असे त्याचे काय नाव होते?

८) महाराज घोडदौड (घोड्यांची शर्यत) प्रतियोगिता करीत असत किंवा नाही? जर प्रतियोगिता आयोजित करीत होते तर काय कधी शिवपुरा कडे राहणाऱ्या व्यक्तिला विजेता घोषित केले होते?

९) आपली पत्नी जीवंत असतांना आपण लग्न का केले? हिन्दु विवाह कायदा १९५५ नुसार आपणा दुसरे लग्न करू शकत नाही. लग्नात महाराणी सम्मिलित झाल्या नाही व त्यांनी कोणतीही उत्सुकता दाखविली नाही, काय कारण होते?

१०) जर आपण महाराजांच्या संपत्तीवर आपला हक्क अगर अधिकार प्रकट केला आहे? जर आपण या दृष्टिने पाऊल उचलले नाही तर त्याचे काय कारण? काय बलरामपुर स्टेट तर्फे या दृष्टिने प्रारंभ झाला आहे?

या व्यतिरिक्त अजुनही काही प्रश्न आहेत जे आवश्यकता भासल्यास प्रस्तुत केल्या जातील. आपण कृपया वरील प्रश्नांची उत्तरे द्यावीत म्हणजे पुनर्जन्माच्या सिध्दांताशी महाराजाचे जीवनाचा पुन्हा मेळ बसविण्याचा व त्याचा तपास करण्याचा प्रयत्न करता येईल.

हा आरोप सर्वथा अन्यायपुर्ण व चुकीचा आहे की मी माझ्या पत्रिकेच्या स्वस्त लोकप्रियतेच्या हेतुने आपले विचार प्रकट केले आहे. वास्तविक मी अनेक दृष्टिने ह्या संपूर्ण प्रश्नाला समजून घेत आहे. व या प्रकरणाला समजण्याची प्रक्रिया आजही सुरू आहे. मी पूर्वाग्रह आणि संकुचित वृत्तिचा पक्षधर कदापिही नाही.

आशा आहे या महान कार्यात आपण सहकार्य कराल आणि सर्व तथ्य लिखीत रूपाने प्रत्युत्तरात प्रस्तुत कराल, म्हणजे वास्तविकता समोर येईल आणि स्पष्ट होईल.

समाप्त